





# ।। श्री मार्तण्ड महिमा ।।

# गुरुमूर्ति





।। काही थोडे दिसांकरिता । स्वामींचा वास गृही होता ।
बाळ मार्तण्डानें मोहिले चित्ता । वासुदेव स्वामीरायांच्या ।।

।। श्री गणेश-दत्त-गुरुभ्यो नमः।।

।। अथ श्री मार्तण्ड-महिमा।।

# अथ प्रथमोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

।। श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य वासुदेवानन्दसरस्वती गुरुदेवाय नमः। श्रीगजाननसद्गुरुनाथाय नमः।। ॐ नमोजी वेदरुपा। अपारा अगोचरा अरूपा। अनाद्यनन्त चैतन्यस्वरुपा। सद्गुरुनाथा गजानना।।१।। अव्यक्तांतील निरंगपण। टाकूनी धरिलेंस रूप सगुण। आम्हां लेकुरांचें अजाणपण। निवटोनी निजरूपीं न्यावया।।२।। सच्चिदानंदा आनंदकंदा। मोक्षज्ञानाच्या मकरन्दा। आपुलिया चरणारविन्दा। लपविलेंस तूं गणराया।।३।। तूं सकळ मंगलांचें माहेर। निःश्रेयसाचें महाद्वार। सकळारंभी चराचर। आठविती तुज अनन्यपणें।।४।। तूं कल्पवृक्षाचा कृपामोहर। सकळ विद्यांचें आगर। अनन्त वेदांचा गंभीर। तुझिया चरणीं विसांवला।।५।। तुझिया स्तुतीचे पवाडे। गातां झाले वेद वेडे। तेथें मी हें उणें वांकुडे। काय बोलूं मंगलमूर्ते।।६।। तूं मांगल्याची अथांगगंगा। तुझ्या पात्री न्हाऊनी श्रीरंगा। तुलाच अर्पीन ओंजळअर्घ्या। तुझ्याच पावन जळाची।।७।। तूं शब्दब्रह्माचा तेजोराशी। ओवाळीन तुला आरतीसी। चिमुकल्या हृदयनिरांजनेंसी। लावोनियां सद्भावें।।८।। वंदूनियां साष्टांगभावें। विनवितों हृदयीं बैसावें। लेखनीं माझ्या दर्वळावें। चिन्तामणि

रुप तुझें।।९।। आतां वंदीन विश्वंभरा। आदिजननी ओंकारपरा। प्रतिभा प्रज्ञा ऋतंभरा। हंसवाहिनी वाग्जननी।।१०।। तुझिया विलासें वाक्चातुरें। विश्व चित्सौंदर्ये विनटलें। वीणानादें मोहरलें। चराचर सकळ।।११।। विवेक हंसावरी विसांवली। सात्विक स्फटिकाची माला करीं। ओंकारनादें झंकारली। चतुर्थी वाणी मूर्तमती।।१२।। वाहूनी माझें हृदयकमल। विनवितों व्हावें करुणा-कोमल। अंबिके आलें अजाण बाळ। अनन्य शरण चरणांवरी।।१३।। आतां फुलवावी कृपावेल। त्यांतून उमलावे शब्द कोमल। संतचरणीं परम निर्मळ। ओंजळ त्यांची वाहीन मी।।१४।। श्रीमंत माझें पूर्वप्राक्तन। जेणें लाधले संतचरण। त्या कुळींचें स्मरतों ऋण। मनीं आठवोनि कुळदेवांसी।।१५।। श्री लक्ष्मीरमणा व्यंकटेशा। जगदात्मा तूं जगदीशा। कुलस्वामी श्रीनिवासा। राखिसी आपुल्या लेकुरांना।।१६।। तुळजापूरवासिनी जगन्माते। अंबे अपर्णे कुलदेवते। भवभयहारिणी कृपासरिते। माथा माझा चरणीं तुझ्या।।१७।। उदोकारें गर्जती सकळ। तुजला भवानी चामुंडामंडळ। आनंदानें नाचे भक्तकुळ। कवडीमाळ मिरवोनियां।।१८।। जननीजनकांचे पवित्र चरणीं। ठेवोनी मस्तक त्रिकालवंदनीं। गातों त्यांचे आशीर्वचनीं। गुरुरायाचें गहन रूप।।१९।। माझ्या तीर्थरूपांचे श्रीगुरुदेव। दत्तरूप श्रीमद् वासुदेव। माझ्या सकळ वैभवाची ठेव। स्वामीराया तुज वंदितों।।२०।। आठवीन आतां पाय। सकळ संत माझी माय। चौफाळूनी पसरीन हृदय। पाउलीं तुमच्या।।२१।।






निश्चळ निवृत्ति ज्ञानदेवा। सोपान मुक्ताबाई नामदेवा। गोरोबा चोखोबा चांगदेवा। अत्रिजनार्दना एकनाथा।।२२।। भक्तांची जननी जनाबाई। तुकोबा माझी अभंग आई। रामदासगुरु वेणाबाई। सांभाळावें लेंकुराला।।२३।। सकळ संतांना सिध्दांना। मुनिजनांना भक्तांना। अनन्य माझी वंदना। साष्टांग भावें करोनियां।।२४।। तुमच्या कृपेनेंच येऊनी धीर। बोलेन मायबापा चार बोल। येरवी अज्ञानगर्ती खोल। विवेकहीन पडलों मी।।२५।। बालपणापासौनी धरिला। एकचि हेत अन्तःकरणाला। हृदयीं बैसवावें निर्मळा। साधुचरणां अमृतमय।।२६।। या ध्यासापोटीं वाढली। अंतरीं संतभक्ति दृढावली। गजाननाला दया आली। दासाची या।।२७।। त्या शेगांव ग्रामीचें सांवळे। योगिरायाचें रूप हृदयीं ठसलें। त्यांतून ऐहिक जिणें विकासलें। आजवेरी।।२८।। गजाननांच्या कृपेनें। घडलीं अनेक संतदर्शनें। जेणें हृदया लेवविलें लेणें। परमानन्दाचें।।२९।। कांहीं पूर्वसुकृताचें देणें। म्हणोनी घडलें उज्जयिनी येणें। जेथ दृष्टीस पडलीं पुण्यचरणें। सद्‌गुरुस्वरूप नानांचीं।।३०।। एका पावन गुरुवासरीं। मूर्ती नानांची लोचनां दिसली। आणि हृदयसंपुटीं विसांवली आनंदमुद्रा।।३१।। क्षणार्धांत अंतर मावळलें। भेदाचे अडसर उडाले। गजानन स्वरूपांत पाहिलें। मार्तण्डरूपा।।३२।। साधु भासती वेगळाले। परी ते स्वरूपांतीं एकले। हें समर्थवचन आठवलें। उकलिलें हृदय नानांजवळी।।३३।। त्या दिवसापासौनी। नित्य

मार्तण्डचरण आठवोनी। ध्यानीं आणावे प्रातःस्मरणीं। हाची माझा नित्यक्रम।।३४।। अगाध लीला दैवाची। इच्छा कैसी गुरुरायाची। कथा गावी मार्तण्डाची। प्रेरणा दिधली चित्ताला।।३५।। परी हें कैसें घडावें। या चिंते हृदयीं झुरावें। दारिद्र्याचे जिरावे। हेत अवघे मनांतचि।।३६।। वाटे संतचरित्रा गावें। हें सामर्थ्य तुज कैसें यावें। तूं दुर्बळा अजाणा बडबडावें। अपूर्ण ज्ञान जगतातलें।।३७।। श्रीधर महिपती दासगणूंनी। गायिली गोड संतकथा पावनी। त्या वाग्जान्हवीमध्यें न्हाऊनी। पवित्र झाली कुळें आमुचीं।।३८।। माझ्या हृदयींची आर्त विनवणी। ऐकतील का संत कोणी। भिजेल का नित्य वाणी। त्यांच्या गुणानुवादें कधीं।।३९।। त्या अवघ्या संतकवींना। होती माझी सदैव याचना। याल का हो माझ्या लेखना। चरित्र होवोनी एखादें।।४०।। माझा गुरुराज कृपाळु केवळ। त्यानें आणविली ही सुयोग सुवेळ। मार्तण्ड चरित अद्भुत सोज्वळ। माझ्या मुखें गावयाची।।४१।। ठेवोनीयां पाऊलांवरतीं। विनम्र माथा केली विनंती। हे मार्तण्डा! श्रीगुरुमूर्ती। चरित्र वदवावें आपुले कृपें।।४२।। आपुलें आपणचि वदाल। मी तों केवळ निमित्त होईल। जैसें सांगाल तैसें लिहील। लेखणीचें भाग्य माझें।।४३।। गुरुकथेची नाव करीं। आमुच्या द्यावी भवसागरीं। सुखें जावया पैलतीरी। चरणस्मरणें।।४४।। आतां परिसावी पुण्यकथा। नानांची पावन जीवनगाथा। एकाग्र करोनियां चित्ता। पाय त्यांचे स्मरावे हो।।४५।। होळकरांच्या






राज्यांतरीं। तराणे गांव निर्धारीं। तेथ उगवले मार्तण्ड राऊळीं। भक्तांचें भाग्य उजाडलें।।४६।। आम्हां अजाण लेकरांला। तारावयासी अवतार घेतला। तराणे ग्रामीं दत्तदयाळा। कृपावंत होऊनियां।।४७।। अत्रिअनसूयेच्या नंदना। दत्तात्रेया त्रिवदना। श्रीपाद श्रीवल्लभ योगिराणा। श्रीनृसिंह सरस्वते।।४८।। तुम्ही प्रगटलां अक्कलकोटीं। स्वामी समर्थ होऊनी मठीं। माणिकप्रभूंचे भेटी। आपुलें एकपण दाविलें प्रभो तुम्ही।।४९।। तीच चित्कळा साईनाथा। तुम्हीं दाविली त्रिजगता। श्रीमद्वासुदेवानंद स्वामी विख्याता। तुमचीच काया त्रयमूर्ते।।५०।। सकळ योगियांचा तूं राव। दिधली आत्मकळेची खेंव। नानांचे रूपीं विसांवली ठेव। दत्तमूर्ते दिगंबरा।।५१।। पैठणास शोभावे एकनाथ। तैसे तराण्यासी मार्तण्डनाथ। होऊनी भक्तांची करुणा मूर्त। नानामूर्तींत सांठली जणुं।।५२।। श्रीगुरु घराण्याची परंपरा। मुद्दाम वर्णिली मनोहरा। श्रीवासुदेवानंद स्वामी सोयरा। गुरुमाऊली नानांची।।५३।। या तराण्यासी धर्माधिकारी। शंकर शास्त्री प्रख्यात बाहेरी। विद्वान् विरागी सदाचारी। तीर्थरूप नानांचे।।५४।। सात पूर्वजांपासौनीयां। वसतीस होते 'जोशी' म्हणोनियां। स्वधर्माचरण करोनियां। धर्मास लाविती इतरेजनां।।५५।। पूजा भक्ती देहांतरीं। नांदत होती सर्वतोपरी। म्हणोनी रमला श्रीमुरारी। भक्तराणा पंढरीनाथ।।५६।। पंढरीनाथाचें मंदिर। होतें यांचें पूर्वापार। पूजा अर्चा साचार। पूर्वज अवघे करिताती।।५७।।

मंदिरासी उत्पन्न म्हणून। सहा एकर शेत जमीन। त्यावरी घडतसे उदरभरण। संतोषानें त्या काळीं।।५८।। शंकर शास्त्री ज्ञानमूर्ती। वेदशाळा चालविती। अनेक विप्र आदरिती। त्यांचा निर्णय एकमतें।।५९।। ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदी। कठोर कर्मठ आचार शुध्दी। निर्लोभी असोनी राहणी साधी। ज्ञानयज्ञांत मग्न असे।।६०।। काव्य शास्त्र व्याकरण। मीमांसा न्याय वेदपठण। ज्यांत रुचि ज्यांस अधिक जाण। शिकवितसे विप्रवृंदा।।६१।। वाटे वसिष्ठ अवतरला। ज्ञानसमुद्र सांठला। श्रुति सत्य करायाला। आदानं हि विसर्गाय।।६२।। शंकर शास्त्रींचे सोज्ज्वळ जीवनीं। लक्ष्मी गृहलक्ष्मी होऊनी। अनसूयेसम सती पावनी। एकरूप होती संसारी।।६३।। अत्रि - अनसूयेपरी। स्वधर्म सांभाळोनि सर्वतोपरी। भक्ती उमलली संसारी। त्या शुध्द दांपत्याच्या।।६४।। तो अन्तःसाक्षी आदिनाथ। सर्व कौतुक असे अवलोकत। प्रसन्न चित्तें मनीं आणत। शुध्द संकल्प अपुल्या कृपेचा।।६५।। गंगाधर म्हणोनियां। जेष्ठ पुत्र होई तया। अघटित जाणोनी माया। शांतचित्त शंकरशास्त्री।।६६।। तदुपरी द्वितीय पुत्राचे अवसरीं। अद्‌भुत चालत आले घरी। त्याची पाऊले वाजली दारी।" दत्त दत्त " म्हणोनियां।।६७।। पूर्व सुकृतांची ऋणें। फळणार आतां शतगुणें। याची देखिली लक्षणें। विप्रश्रेष्ठ शंकरांनी।।६८।। दत्त गुरूंची उपासना। गायत्रीची आराधना। कर्मठ स्वधर्म चाळणा। सगुणरूपें फळणार।।६९।। श्रीमद्‌वासुदेव






स्वामींचा प्रसन्न। ज्या शंकरांवरी कर कृपापूर्ण। त्यांचे पोटीं साक्षात् अवतरण। घडणार होतें दत्तांचें।।७०।। त्याची प्रतीक्षा स्वामीराव। करीत होते वासुदेव। हृदयी धरोनी भक्तिभाव। अनंत भक्तही तिष्ठले।।७१।। ते एकनाथांचा अवतार। शांत मूर्ती प्रसन्न गुण साकार। नागपंचमीचा पाहूनी गुरुवार। नानामहाराज जन्मले।।७२।। शके अठराशें अठरा पूर्ण। श्रावण शुध्द पंचमी दिन। कन्या राशिगत चंद्रमा जाण। मंगलसिध्दि योगावरी।।७३।। शांत मूर्ती नानांची। कुंडली कथितों तुम्हां साची। मूस जणूं अध्यात्माची। दैवी संपत्ति एकत्रित।।७४।। ज्ञान तेज संपत्तीचा। योग विलक्षण रविगुरूंचा। केंद्री शोभतो कुंडलीच्या। कर्कलग्नीं जन्मघटीं।।७५।। द्वितीय स्थानीं बुध ज्ञानी। वेदांत गूढ सांगतो जनीं। वैभव वैराग्य समान दोन्ही। शुक्र केतु समवेत।।७६।। चन्द्रमा झळके तृतीय स्थानी। चतुर्थातला उच्च शनी। भक्त जनांना तुष्टवूनी। कृतोपकार करिती जग।।७७।। लौकिकासाठीं विवाहासी। करणें आलें मार्तण्डासी। मुक्त होईल देवकार्यासी। योग ऐसा कुंडलीचा।।७८।। पाहूनी बाळमूर्ति गोजिरी। प्रभा चैतन्याची फांकते साजिरी। आनंद दाटला घरीं दारीं। नाम ' मार्तण्ड' ठेविलेंसे।।७९।। शुक्ल पक्षींच्या इंदूपरी। बाळ वाढलेंसे परोपरी। शंकर शास्त्रींच्या मानसमंदिरी। भविष्यदर्शी वाणी वदे।।८०।। हें बाळ नोहे केवळ। हें तों सकळ भक्तांचे माहेर। कर्म-भक्तीचा जयजयकार। करावयासी अवतरले।।८१।। धन्य मातेची

कूस। जिथें उपजलें चैतन्य प्रत्यक्ष। धरुन सगुणपणाची आस। उद्धरावया भूमंडळ।।८२।। पित्याची तपस्या सफळ। कीं मातेची सात्विकता सबळ। श्रीगुरुंचें कां कृपाबळ। एकवटलें मार्तण्डांत।।८३।। ' मार्तण्ड ' नांव पाळण्यांतले। परी 'नाना 'कौतुकानें ठेविले। तें सार्थ आज ठरलें। भक्तहृदयांत प्रतीती पहा।।८४।। पित्याचे कर्मठ आचार। बाळ पाहतें कुतुहलानें फार। तों तराण्यासी पातले साचार। वासुदेवानंद स्वामी मूर्ती।।८५।। उज्जयिनीस दंड घेण्याआधीं। स्वामी आले तराण्यामधीं। शंकर शास्त्रींची कीर्ती अवघी। होती श्रुत आधींच स्वामींना।।८६।। शास्त्रीबोवांसी स्वामींचा। निरतिशय संबंध स्नेहाचा। त्याचा परिपाक गोड साचा। अनुग्रह दिधला शंकरांना।।८७।। आधींच भूमी शुद्ध अती। तेथें वर्षला अपांपती। त्यांत फुलली सत्त्वसंपत्ती। फळली कृपेनें स्वामींच्या।।८८।। काहीं थोडे दिसांकरितां। स्वामींचा वास गृहीं होता। बाळ मार्तण्डानें मोहिलें चित्ता। वासुदेव स्वामीरायांच्या।।८९।। नित्य त्यांचे जवळी बैसावा। उल्हासें त्यांनीही प्रसाद द्यावा। मार्तण्डाला थोपटावा। आनंदानें स्वामीरायें।।९०।। मनुकांचा प्रसाद मिळतो। बाळ सदैव अंकी बसतो। स्वामींचे हृद्‌गत जाणोनी हंसतो। पिता संतृप्त अंतरीं तो।।९१।। पांच वर्षांचा असतांना। स्वामींचा सहवास घडला नानांना। आशीर्वाद देऊनी त्यांना। स्वामी गेले उत्तरेकडे।।९२।। मुलें खेळती परोपरी। ना रमतें चित्त त्यां भीतरीं।





मुलांसवे जाऊनी दुरी। एकलाच बैसे वृक्षातळीं।।९३।। पिताही सूक्ष्म दृष्टीनें। वाढवीतसे हें चैतन्य देखणे। अभ्यासाचे सदा सांगणें। नानालागीं होतसे।।९४।। इतर भावंडें खाऊसाठीं। लागती आईचे पाठीं। परी मार्तण्डें मात्र पाटी। अभ्यासाचीच धरावी।।९५।। ऐसा आग्रह पितयाचा। कठोर संस्कार ज्ञानाचा। आकार घेत होता साचा। घडा पूर्ण ब्रह्माचा हा।।९६।। भासे आकृति लहान। परी जगदाकार चैतन्य पूर्ण। अन्तर्निष्ठांचे अधिकारी लोचन। ओळखावया लागती त्या।।९७।। सामान्यांसी वाटे नाना। लहान कुमार गोजिरवाणा। चार चौघांचा सोबती जाणा। कनिष्ठ पुत्र शंकरांचा।।९८।। परी पित्यानें जाणिलें गूज। आलें पोटीं ब्रह्म सहज। करावया भक्तकाज। लीलामात्रें अवतरोनी।।९९।। म्हणोनी हृदयीं भावोनी। अति दक्षतेनें सांभाळोनी। शिशुरूप नानास शिकवोनी। पितृकर्तव्य आचरीतसे।।१००।। इतुक्याही बालवयांत। मार्तण्डासी नाम भजनांत। अति उल्हास वाटोनी नाचत। नामघोषें आनंदोनी।।१०१।। प्रभातवेळीं पाठान्तर। तरलतेनें होई सत्वर। पहांटेचा होता प्रहर। उठवी पिता नानालागीं।।१०२।। एकदां घडला अपराध। लौकरी नाना न होई सावध। नावरला पित्यासी क्रोध। आपटिलें शिर खांबावरी।।१०३।। झाली शिक्षा पण घडलें जीवन। त्या दिवसा पासौन। आजही नानांसी त्याचें स्मरण। उठती तीनच्या समयाला।।१०४।। ऐसा कडक आणि कर्मठ। पिता होता निष्ठावंत।

अंतःकरणें कोमल पवित्र। सांभाळितसे आप्तजनां।।१०५।। नानांचे चरित्र अद्‌भूत। विचार करितां होतो चकित। तेचि भरविती घांस मुखांत। आपुल्या मधुर लीलांचे।।१०६।। श्रवणें जयांच्या निववे अन्तर। रूप हृदयी प्रगटोनी मनोहर। वैखरीनें व्हावें सादर। नामगायनी नानांच्या।।१०७।। श्री गजाननांच्या प्रेरणें। नाना गुरूंच्या आशीर्वचनें। मार्तण्ड-महिमा उमलणें। विजयमुखें उत्तरोत्तर।।१०८।। शुभम् भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते प्रथमोऽध्यायःसमाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।

अध्याय २रा - सद्गुरुप्राप्तीसाठी तळमळ



। नको पाहू रे अंत आता । हे करुणाघना बा अवधूता ।
अनसूयासुता श्री गुरुदत्ता । आर्त टाहो ऐक माझा ।।

# अथ द्वितीयोऽध्याय:।

।। ॐ श्रीगणेशाय नम:। ॐ श्रीसरस्वत्यै नम:। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नम:।।

श्री मेघश्यामा श्रीरामा। भक्तजनांच्या विश्रामा। मंगलाच्या मंगलधामा। आत्मारामा पाहि माम्।।१।। तुझ्या दारींचा याचक। विनविती व्हावें कारुणिक। तूंचि जननी आणि जनक। प्राणसखा तूंच माझा।।२।। नसे ज्ञान नाही भक्ति। पूर्व पापांसी नाही मिती। अजूनी ना ठसलें चित्तीं। मोक्षदायी रूप तुझें।।३।। निश्चय न टिके क्षणभर। धांवोनी यावें रघुवीर। छेदावे षड्‌रिपुवासनाजाळ। आपुल्या प्रतापी बाणानें।।४।। सीतापते दाशरथे। शरणांगत लेखक विनविते। पदरी घ्यावें दीनातें। करुणावत्सल होऊनियां।।५।। मागील अध्यायी बाळपण। नानांचे भजनानुसंधान। स्तोत्रपाठ दैनंदिन। अध्ययन चाललें गृहीच।।६।। आठव्या वर्षी शंकर शास्त्री। मौंजीबंधन नानांचे करिती। मंत्रराज गायत्री देती। स्वमुखें द्विजोत्तम मार्तण्डासी।।७।। थाटांत झाली मौंज अति। बाळबटु पाहूनि संतृप्त होती। अवघे देवऋषी अदृश्य असती। आशीर्वाद द्यावयासी।।८।। श्री दत्तराज माऊली स्मरोनी। हृदयसंपुटीं मंत्र सांठवोनी। दिव्य ब्रह्मचर्यांत प्रवेशोनी। धन्य होई मार्तण्ड बाळ।।९।। पवित्रोत्तम गायत्री मंत्र। शुध्द सात्विक मार्तण्डचित्त। ऐकतां होई पुलकित। तेजांत तेज मिसळलें।।१०।। मौंजीबन्धन घडतां नाना। अंगिकारिती

नव्या आचरणा। त्रिकाल संध्या जप अनुष्ठाना। करवुनी घेती शास्त्रीबुवा।।११।। इकडे गृहींची वेदशाळा। चालली होती तिथें मिळाला। नवा विद्यार्थी शास्त्रीबुवांला। वरचढ बुद्धिगुणांचा।।१२।। आपुलें नित्यकर्म आटोपूनी। बैसावें छात्रांमध्ये नानांनीं। पाठ घ्यावे श्रध्देनी। जें जें शिकविती पितृदेव।।१३।। लौकिक शिक्षणाची गोडी। नव्हती नानांलागीं परी धाडी। पिता शाळेंत सोंगडी। इतर जाती तैसेच।।१४।। चार इयत्तेपर्यंत। नानाही शिकले निवान्त। परी एके दिनी घडले विचित्र। आणि थांबले शिक्षण।।१५।। मुख्य शिक्षकाचे खोलीसमोर। उभे होते नाना साचार। चौकशी प्रित्यर्थ कोणी बाहेर। येती पुसती मार्तण्डाला।।१६।। सांगती पाचारावें गुरुजींना। आंत जावोनी सांगण्याला। मार्तण्ड गुरुजींपाशी गेला। कथिली वार्ता बाहेरची।।१७।। तों मुख्य गुरुजी होते आंत। ते वदले हंसत हंसत। 'सांगावें जा नाही येथ। मुख्य गुरुजी आमुचे'।।१८।। नव्हतें त्यांना भेटायाचें। निमित्त करणें टाळायाचें। म्हणोनियां असत्य वाचे। वदविती मुखें नानांच्या।।१९।। इथे पहिले आश्चर्य, बाळ। मार्तण्डाला वाटलें अपार। ऐसे कैसे गुरुजी सरळ। असत्य सांगती वदावया।।२०।। मी पाहतों हे असती आंत। आणि बोलेन जरी असत्य। होईन धनी पापाचा खचित। हें न जमणें माझ्याने।।२१।। त्या बाळरूपी मार्तण्डाला। पहा सत्याचा कैसा कनवाळा। स्पष्ट नम्रतेनें नकारा। दिधला त्यानें गुरुजींना।।२२।। मी असत्य न सांगणार।





सांगणार। द्यावी हवी ती शिक्षा घोर। सत्य धर्म नाहीं सोडणार। कदापिही गुरुराया।।२३।। ते शिक्षक असते यथार्थ। तरी करिती कौतुक निश्चित। पण घडलें मात्र विपरीत। क्रोधाविष्ट झाले अति।।२४।। पुनः पुन्हा मार्तण्डाला। त्यांनी धाकानें बोलायाला। असत्य सांगाया, परी न ढळला। निश्चापासौनी सत्यमूर्ती।।२५।। अखेर मार्तण्ड उबगला। उचलिलें पाटी दप्तराला। तडक येवोनी गृहाला। विनवी आपुल्या पित्यासी।।२६।। जें शिकवी मज असत्य भाषण। ऐसें नको मज ताता शिक्षण। पुनश्च नाहीं जाणार शरण। ऐशा बिगारी शाळेलागीं।।२७।। पित्यानें घातली समजूत। परोपरीनें परी न सोडत। आग्रह अपुला, चित्तांत। तिरस्कार होता असत्याचा।।२८।। संपलें तिथें लौकिक शिक्षण। पित्यानेंही न आग्रहिलें जाण। वेदविद्या सबीज समर्पून। केला यथार्थ सुसंस्कृत।।२९।। पहा कैसी सत्यप्रीती। बाळ नाना मार्तण्डाच्या नांदे चित्तीं। जिथें भले थोरही चळती। स्वार्थापायी सत्याहून।।३०।। ऋजुता केवळ सगुण होऊन। आली वाटे आश्रया लागून। नाना देहीं विसावून। शांती तेजें शोभली।।३१।। लौकिक शिक्षण नव्हतें भाळी। कारण श्रीगुरु चंद्रमौळी। होणार अंकित सदाकाळीं। भाग्य होतें मार्तण्डाचें।।३२।। शक्ति चक्राचा गोसावी। अष्टसिध्दी ज्याची गाती ओंवी। कशास त्यानें ऐकावी। विद्या लौकिक पोटभरू।।३३।। देहाची चिंता करणें ज्यासी। त्याने गोंधळ करावा सत्यासत्यासी। परब्रह्मनिधी स्वयंप्रकाशी। हातीं असे ज्याचिया।।३४।। तो कशास करील पर्वा। ज्याच्या अंकित माधव बरवा। इतरांनी

खुशाल सांभाळावा। पिसारा लौकिक शिक्षणाचा।।३५।। येणें रीती मार्तण्डाचें। तुटलें लौकिक शिक्षण पुरतें। जप अनुष्ठाना परतें। नव्हतें कसलें आकर्षण।।३६।। इंदूरच्या वेदशाळेंत जाणते। नरहर शास्त्री विख्यात होते। नाना गेले अध्ययना तेथें। वेदमूर्तीच्या शिष्यत्वें।।३७।। अमरकोष कौमुदी व्याकरण। झालें अवघें गृहींच जाण। महाकाव्य संहितापठण। घडलें साक्षेपें इंदूरासी।।३८।। इंदुरासी जे प्रख्यात। तांबे स्वामी आज समाधिस्थ। ते नानांचे सहाध्यायी असत। इंदूरासी त्या काळीं।।३९।। अकरा वर्षांचें होतें वय। नानांसी लागली तळमळ। मूळ रूपाचें स्मरण सकळ। होऊ लागलें तीव्रतेनें।।४०।। या बाळवयीं उदास झाली। कोंवळी नानामूर्ति चिन्तावली। रामदासांसम व्याप्त झाली। चिंतेनें अवघी नानामुद्रा।।४१।। नाथांना पांचवे वर्षी सबळ। गुरुकृपेची लागे तहान गलबल। होतां हृदयी धांवलें बाळ। जनार्दन चरणांसी।।४२।। तीच स्थिती नानांचीही। होऊं लागली लवलाही। उदास खिन्न हृदय व्यथा ही। कोणापाशीं बोलावी।।४३।। कधीं गुरुराज भेटेल। कधीं निमेल हृदयज्वाळ। कधीं वर्षेल मेघश्यामल। संतप्त चित्तीं अखंडपणें।।४४।। जीव जाई वेडावून। चाललें सारें पूजाअनुष्ठान। परी आस चेतली आंतून। गुरुकृपा व्हावयाची।।४५।। प्रल्हादाचे बालवया। आठवावे ध्रुवाचे दृढ निश्चया। हे करुणाघना दत्तात्रेया। धांव पाव माऊले तूं।।४६।। धीर करोनियां चित्तीं। बाळ पुसे पितयाप्रती।





बाबा, अनुग्रह मजवरतीं। कराल कां हो कृपामूर्ते।।४७।। आपण माझे जन्मदाते। वेदविद्येचे अधिकारी जाणते। वासुदेवमूर्ति कृपांकिते। आपणावरी प्रसन्न।।४८।। गायत्री मंत्र देवोनी आपण। दिधलें मजला पवित्र द्विजपण। करोनी गुरुमंत्र प्रदान। कृतार्थ मजला करावें।।४९।। आपुली कीर्ती सर्वतोपरी। गाजते जगांत श्रेष्ठ यापरी। धन्य माझे भाग्य खरोखरी। छत्र आपुलें लाभे मज।।५०।। आपण करोनी अनुग्रह मजप्रत। दाखवावी मोक्षवाट। जेणें सफल होते नीट। येरझार संसाराची।।५१।। आपुल्या आज्ञेंत वर्तेन। किंचितही ना उल्लघेन। विनविलें मार्तण्डें शिर ठेवुन। विनम्रतेने चरणावरी।।५२।। पित्याने पाहिले बाळासी। गहिंवरला अंतःकरणासी। बाळा, तुझ्या हृदयेच्छेसी। जाणतों मी परिपूर्ण।।५३।। धन्य तुझी तळमळ। ज्या वयांत इतर बाळ। खेळणें स्वैर ठाउक केवळ। तेव्हां तुज इच्छा अशी।।५४।। परी अनुग्रह देणें तुला। हें ईश्वरी इच्छेविरुद्ध बाळा। दत्तात्रेयांचा आदेश मजला। तुम्हांसी नाहीं अधिकार।।५५।। देईन अनुग्रह इतरांसी। परी तुम्हांसाठी नसे आमुची। योजना वत्सा देवाची। तुझे गुरुराज निराळे।।५६।। व्याकुळला मार्तण्ड मनीं। कैसे भेटतील ते सांगा जनीं। कोठें शोधुं काय अनुष्ठानी। साध्य होईल गुरुराया।।५७।। अकरा वर्षांचे असतांना। मांडिली तप कडक साधना।श्रीगुरुचरित्र ग्रंथ आराधना। सांगितली गुरुप्राप्तिस्तव।।५८।। ती अनुष्ठानाची पावनसुंदर। कथा ऐका होऊनी सादर।

प्रल्हाद नामदेवासम मार्तण्ड बाळ। भासे मज मार्तण्ड हा।।५९।। दत्तमंदिराजवळीच। होतें नानांचे गृह सात्विक। खोली सारवोनी तेथ एक। मूर्ति मांडिली उपास्याची।।६०।। होते वृक्ष मनोहर। लिंब अश्वत्थ औदुंबर। मागील बाजूस हिरवेगार। प्रदक्षिणेच्या वाटेवरी।।६१।। श्रीदत्तांच्या माथ्या वरतीं। छाया त्यांच्या अखंड झुलती। हृदयामाजीं ऊर्मी उठती। मंगल पवित्र आनंदाच्या।।६२।। पहांटे लवकर उठोनी। संध्या जप आवरोनी। पूजा सविधान करोनी। नाना बैसती सप्ताहास।।६३।। एकान्त होता पूर्ण तेथ। आंतूनी लावुनी द्वार निवांत। वाचतो बाळ श्रीगुरुचरित। अतिप्रेमें गुरुसाठीं।।६४।। समोर एक रिकामें आसन। मांडोनीयां ठेविलें जाण। शेजारीं सर्व साधन। पूजनाचें पवित्र पहा।।६५।। एक वाटी दुधाची। एक लहान तुपाची। पवित्र ती ही गाईची। शेजारीं ठेविली भरोनियां।।६६।। उत्फुल्ल ताजीं खुडलीं सुमनें। प्रतीक्षिती श्रीगुरु चरणें। शांत नंदादीप आपुल्या लोचनें। पाहतो मार्तण्ड मूर्तीला।।६७।। बारा दुपारचे जधीं होत। आटोपावा अध्यायक्रम निश्चित। करोनी सकळ आरती मंत्र। येई मार्तण्ड बाहेरी मग।।६८।। संध्यासमय होतां पुन्हां। सायंसंध्या करूनी नाना। धूपारती शेजारती पदांना। गात असे आनंदानें।।६९।। करोनी भूमिशयन। घ्यावी रात्रीं विश्रांती जाण। पूर्णतः सकळ नियम पाळून। विनवितो अखंड दत्तगुरू।।७०।। पूर्ण पहिल्या सप्ताहांत। राहोनियां केवळ नक्त। एक वेळ अल्पहार फक्त।





नाना घेतसे दुपारचाची।।७१।। वाचनापूर्वी साष्टांग दंडवत। घालोनी पितृदेवांप्रत। सिद्धांचा आशीर्वाद घेत। वाचण्या आधीं उल्हासानें।।७२।। लक्षांत घेतां वयासी। अपार कौतुक वाटे हृदयासी। पाहोनियां दृढ निश्चयासी। बाल तपस्वी मार्तण्डाच्या।।७३।। संपला पहिला सप्ताहकाळ। केली सांगता सशास्त्र सकळ। परी चित्तांतरीं व्याकुळ। गुरु माझा गवसेना।।७४।। पुनश्च त्यानें दुसरे दिनीं। द्वितीय सप्ताह आरंभ करोनी। अखंड ध्यासं मनीं जागवोनी। मांडिलें अनुष्ठान मार्तण्डें।।७५।। सगळें यथासांग पूर्वीप्रमाणें। याही सप्ताहांत केले तयानें। परी दोन्हीं समयीं उपोषणें। आरंभिलीं या वेळीं।।७६।। उपवासाचे अल्प पदार्थ। खावेत रोज नाम मात्र। काया वाचा मनें मात्र। दत्त नाम गर्जतसे।।७७।। औदुंबराच्या वृक्षातळीं। बैसावे नाम गात सांज वेळीं। भक्तीचिया प्रेमजळीं। मानसानें विहरावें।।७८।। संपला 'दुसरा सप्ताह' जरी। चौदा दिवसांचे अवसरीं। मार्तण्डचित्त ना थांबे तरी। मांडिला सप्ताह तिसरा तयें।।७९।। पिता सर्व न्याहाळितो। कौतुकें सगळया संमति देतो। दत्तगुरूंना विनवितो। घ्यावें पदरांत बाळकाला।।८०।। तिस-या सप्ताहीं दुग्धाहार। क्वचित करावा फलाहार। मार्तण्ड बाल तपस्वी साचार। शुध्दकाय होतो रोज।।८१।। न चुकतां दुधाची वाटी। समोर ठेवावी आसनापुढती। रित्या आसनीं जणुं गुरुमूर्ति। येवोनियां बैसणार।।८२।। सर्व यथोचित नियम पाळोनी। ब्रह्मचर्य कडक सांभाळोनी।

‘ दिगंबरा दिगंबरा ’ मंत्र मुखानी। अविरत जपणें बाळाचे।।८३।। संपविले तृतीय सप्ताहास। पूर्ण झाले एकवीस दिवस। फळली नाहीं मार्तण्ड आस। व्याकुळता अंतरांत तीव्र उठे।।८४।। परी शांतचित्तें तयानें। न ढळतां निश्चयाचे बळानें। मांडिला चौथ्या सप्ताहानुष्ठानें। लगेच तिसरा संपल्यावरी।।८५।। जणुं हट्टासी पेटला नामदेव। घेईन साध्य करूनी देव। सांडिला जरी माझा जीव। नसे त्याची पर्वा मला।।८६।। चौथ्या सप्ताहीं अपुल्या वरचीं। केलीं बंधनें अधिक स्वयेंचि। गोरस पिऊनी अल्पमात्रचि। दिवस त्यानें कंठावा।।८७।। घरांतील अवघे जण। आश्चर्य करिती मनांतून। बाळ कसला महाव्रती जाण। शुकाचार्य तपस्वी हा।।८८।। लक्ष्मीमाता सात्त्विकचित्तें। रोज त्रैलोक्यरमण दत्तातें। काकुळती होऊन विनविते। हांक ऐका गुरुराया।।८९।। संपला चौथाही सप्ताह सकळ। परी वाढलें बाळाचें सत्त्वबळ। आतां गुरुकृपेवांचूनि केवळ। कांहीं न मजला आवडेल।।९०।। येईल जेव्हां गुरूसी दया। तेव्हाच मीही थांबेन पितया। हे योगिराया दत्तात्रेया। तारीं अथवा मारीं अतां।।९१।। सप्ताहांत क्षीणतेनें। सांडिली जरी तनु प्राणानें। आनंदानें श्रीगुरुचरणें। अंती करीन जवळी मी।।९२।। आरंभोनी पांचवा सप्ताह तत्पर। आर्त हांक मांडिली सत्वर। फक्त सकाळीं वाचनानंतर। करावें दूध प्राशन।।९३।। पूर्ण मार्तण्डाची काया। शुद्ध तेजःपुंज व्हावया। लागली तपोबलानें सगळ्या। हळूहळू दिनें दिनें।।९४।।





पंचकोषांची अंतरशुध्दि। होऊं लागली मंत्रसिध्दी। संपला पांचवा निर्मल बुध्दी। सहावा सप्ताह आरंभला।।९५।। सहावा-सातवा मार्तण्डानें। केले सप्ताह त्याच निष्ठेनें। केवल तुलसीदल-प्राशनें। श्रीचरणींच्या तीर्थासवें।।९६।। एकूण पन्नास दिवस जाहले। त्रिविध परींचें तपचि घडलें। उपोषणें क्षीणपण आलें। वाढलें परी तपोबल।।९७।। अखंड दत्तनामें वैखरी। एकटवल्या अंतःकरणीं नादलहरी। अखेरचा सप्ताह, दिवस अखेरी। उजाडला तपस्येचा।।९८।। क्षीण क्षीण झाला देह। कालवती हृदयीं सात्विक भाव। अपार आंसवें लोचनीं धांव। घेती आक्रंदते अन्तःकरण।।९९।। समोर नित्याप्रमाणें। मांडिलें होतें पूजना आसन। होतें ठेविलें जाती लोचन। अधीरतेनें त्याकडे पुनः।।१००।। हे गुरुराया कृपामूर्ति। कां रे कोपलास बाळकावरती। आई! तुझ्यावीण शून्य जगती। धांव घेईं वत्सले गे।।१०१।। नको पाहूं रे अन्त आतां। हे करुणाघना बा अवधूता। अनसूयासुता श्रीगुरुदत्ता। आर्त टाहो ऐक माझा।।१०२।। ऐसी काकुळती चालली। दृष्टी अवघी थिजलेली। ओंवी मागून ओंवी चालली। नसे दर्शन सद्गुरूंचे।।१०३।। बाळकाया कोमेजलेली। अखंड श्रमानें शिणलेली। केविलवाणी दिसूं लागली। अखेर घटिका तपाची ही।।१०४।। आई वेगळें असावें वत्स। तैसें हुरुहुरतें चित्त उदास। गुरुदर्शनाची कैसी आस। क्लेश कैसे विलक्षण।।१०५।। ती तळमळ हृदयाची। हृदयानेंच जाणावी साची। उत्कट

वेड्या अनुभूतीची। आर्तता जाणे साधकचि।।१०६।। धन्य मार्तण्ड उच्च साधक। दाटला हृदयीं भक्ति उद्रेक। जिंकिता झाला श्रीगुरुनायक। आपुल्या भावबळानें पहा ।।१०७।। तो वृत्तांत अद्‌भुत मनोहर। ऐका श्रोते! सावध तत्पर। वर्णीन पुढीलाध्यायीं सुंदर। नानांच्याच कृपाबळे।।१०८।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। नानांच्या आशीर्वचनें। मार्तण्ड-महिमा उमलणें। विजयमुखें उत्तरोत्तर।।१०९।। शुभम् भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते द्वितीयोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।

## अध्याय ३रा - सद्‌गुरुप्राप्ती



।। भ्रूमध्यावरी नानांच्या साची । टेकिली तर्जनी गुरुराजाची ।
शुद्ध हरपली बाळशिष्याची । क्षणार्धात त्या वेळी पहा ।।

# अथ तृतीयोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ जय जय श्रीरुक्मिणीवरा। श्रीनिवासा श्रीधरा। पांडुरंगा तूं उदारा। पाहि मां दीनबन्धो।।१।। एकेका तुझिया अवतारी। दुर्जनकंदने संतकुळे राखिली। तेजमात्रें सर्वत्र भरली। भक्तमानसें तूंचि पवित्र।।२।। शापादपि शरादपि। रक्षिलें त्वां भक्तकुळासी। अखेर विश्वात्म्या वाळवंटासी। पुंडलीकासाठी आलास तूं।।३।। अनन्त योगी मुनी रमले। ध्यानांत समाधि विसरले। त्यांनाही ना भावले। तुझी पाऊलें तीं पंढरीसी।।४।। या पाऊलीं विसावली। सकळ संतभक्ती उचंबळली। नामघोषे दुमदुमली। राऊळें तुझिया देवराया।।५।। ठाउक मजला माझी किंमत। लाजलों मी येतां द्वारात। परी दयामृतघना तुझ्यांत। भेद नाहीं सान थोर।।६।। आकाश अनन्त ओंजळीनें। दान ओतितें जलनिधीनें। न पाहतें रंक राणे। टाकतांना मोजुनियां।।७।। तैसे तुझे कृपा करणें। ज्ञानी अज्ञानी ना देखणें। अनन्ता गोपाळा पदरीं घेणें। लाचार मज लेंकुराला।।८।। श्रोते! व्हावें सावधान। मागील कथेचें अनुसंधान। सप्ताहाचा अखेरचा दिन। होता बाळ मार्तण्डाचा।।९।। चालली होती काकुळती। कंठी दाटल्या शब्दपंक्ती। असहाय मनानें फिरत होती। नजर ओव्यांवरुनियां।।१०।। तो कार्तिकाचा शुभद मास। पौर्णिमेचा पावन

दिवस। आला भास्कर माथ्यास। ऐन बारा दुपारचे।।११।। होतें खोलीचें द्वार बंद। आंतून नित्यासारिखें शांत। गलबललें हृदय अखेर आर्त। झाली ओंवी अखेरची।।१२।। तरीही ना कोणी आलें। कळवळोनी बाळ रडूं लागलें। आसवांचे पूर दाटले। नेत्रांमध्यें नानांचिया।।१३।। आणि ऐका! सावध होउनी। प्रगटला श्रीसद्‌गुरु - शिरोमणी। अकस्मात उभा तो आसनीं। द्वार बंद तैसेंचि।।१४।। ‘ बाळ! ’ मारिली कोमल हांक। अतीव शांत मधुर पीयूष। जणुं चांदणे वर्षिलें देहास। मार्तण्डाच्या तळमळत्या।।१५।। तों उघडिली लोचनें त्यानें। देखतां अद्‌भूत आनंदी न्हाणें। हें सत्य कीं स्वप्नचि पाहणें। उभें मूर्त संकल्प सिध्द।।१६।। पाहिला तो योगिराणा। स्वामी गुरु श्रीवासुदेवांना। अनिवार पूर लोटला नयनां। उचंबळले प्रेमजळ।।१७।। ती आनंदाची परमश्रेणी। दिङ्‌मूढ झाली मम लेखणी। मूर्ति दिसतां मानसलोचनीं। पुण्यमयी मार्तण्डाची।।१८।। बाळ मानस बेभानलें। आनंदाचे कंद उमलले। हृदयीं भरतीचे बांध फुटले। सांडलें हृदय डोळयांतुनी।।१९।। ‘बाळ!’ पुन्हा हांक येतां। भानावरी आले तत्त्वतां। लगबगले झाले संभ्रांता। काय करावें आकळेना।।२०।। सुहास्य मुद्रे स्वामींनीं पुसिलें। वत्सा! कशास पाचारिलें। कां हें उग्र तप मांडिलें। काय इच्छा अंतरींचीं।।२१।। होऊन हृदय सद्‌गदित। नाना करिती साष्टांग प्रणिपात। कर जोडुनी विनवुनी पाहत। श्रीगुरुचरण-कमळाकडे।।२२।।



दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

।। श्रीमार्तण्डमहिमा ।। तृतीयोऽध्यायः

श्रीगुरो! आपुल्याच भेटीसाठीं। हृदयीं तळमळ दाटली होती। तुम्हांविण नीरस अवघी सृष्टी। निर्जन अवघें जगत् मला।।२३।। देवा, मी पापी तुम्हांला। आक्रोशुनी इथवर आणिला। गुरुमाऊले कोण लेंकुराला। घेईल तुजविण पदरांत।।२४।। स्वामी वदती बैस आतां। जाणिली तुझी हृदयव्यथा। आलों धांवत तुझिया करितां। ब्रह्मावर्तापासौनियां।।२५।। श्रीदत्तांचे तूं लाडकें लेकरुं। तुमच्यासाठींच ब्रीद थोरू। स्मर्तृगामी म्हणती मनोहरू। दत्तराणा त्रिगुणात्मक।२६।। गहिवरले नाना हृदय। घट्ट कवळिले श्रीगुरुपाय। आरंभली पूजा सदय। आसवांच्या अभिषेकें।।२७।। मग ठेविलेल्या आसनावरी। जी पूजा आजवरी राहिली। ती सकळ सांग मार्तण्डें केली। हर्षोत्फुल्ल वदनाने।।२८।। धांवत जावोनी आणिले पित्यासी। ते हर्षले पाहतां गुरूंसी। समजलें सकळ चित्तासी। अन्तर्ज्ञानी साधक ते।।२९।। उभयतांही श्रीगुरूंची। आदरें आरती करिती साची। पुढें ठेविती नैवेद्याची। वाटी दूध-तुपाची ती।।३०।। संतुष्टला श्रीगुरुराज। प्रसन्न होऊनी दिधला वर। अखंड मोक्षश्रियेचा सुखद। स्वामी होई बाळका तूं।।३१।। आपुली छाटी स्वामींनीं। नाना भोंवती पांघरोनी। आणि एकान्तीं बोलली कानीं। चैतन्यमयीं मंत्राक्षरें।।३२।। ती अक्षरें कसलीं सौदामिनी। ज्या हृदयीं होते स्वामिनी। तिथें कैवल्यही लोळतें चरणी। सहज समाधि जडोनियां।।३३।। सगळया मनाचे करोनी कान। सांठविला अमृतमंत्र जाण। शक्तिस्त्रोत तो

अखंड निर्वाण। मानवजीवनीं पूर्णतेचा।।३४।। भ्रूमध्यावरी नानांच्या साची। टेकिली तर्जनी गुरुराजाची। शुध्द हरपली बाळशिष्याची। क्षणार्धात त्या वेळीं पहा।।३५।। डोलती निजानंदांत। उन्मन होवोनी नाना स्वरुपांत। शब्दातीत निर्द्वंद्व अवस्थेंत। विहरती शिवरूप होऊनियां।।३६।। कांहीं काळ गेला ऐसा। स्वामी मनीं हंसले तत्त्वतां। टाळूवरी नानांच्या थोपटतां। आले देहावरी सवें।।३७।। स्वामी बोलले कानांत। अहो, तुम्हां कार्य करणें बहुत। प्रगटायाचें या प्रांतांत। समाधीत ना रमणें तुम्ही।।३८।। दत्तनाम गर्जत गर्जत। जागवावें सुप्त भक्तमानस। भक्ती ज्ञान कर्मयोगास। आचरोनियां असावे जी।।३९।। सर्व जनांसी सुलभ गोमटा। भक्तिमार्ग दिसतो मोठा। तोचि अंगीकारोनी वर्ततां। भक्त हृदयें तुष्टतील।।४०।। अन्तःकरणीं परा वाणी। गाईल दत्तयोगाची वाणी। अनाहताचे नाद ऐकुनी। तल्लीन व्हावी शक्तिकळा।।४१।। कलियुगीं योग निषिध्द मानिला। भक्तीचा पथ उजळून निघाला। त्या पथीं होई दीपक बाळा। आपुल्या शुध्द चैतन्यानें।।४२।। आंत प्रदीप्त अग्नि योगाचा। एकंकार अजपाजपाचा। लय निरंतर ब्रह्ममय वृत्तीचा। हृदयातळीं जागृत असो।।४३।। गंभीर सागराचें रूप शांत। बाह्यता ल्यावें लौकिकार्थ। आपुलें अथांगपण यत्किंचित। उमगूं न द्यावें कोणालाही।।४४।। सदा अंतःकरणीं चेतलेला। चैतन्याचा लखलखता जिव्हाळा। बाह्य रूपाचा थाट निराळा। त्रिगुणात्मक हा मायामय।।४५।।





आपुली गहन परंपरा। आदिनाथापासौनी निघते बाळा। श्रीपाद श्रीवल्लभ सोयरा। योगियांचा ईश्वर जो।।४६।। वर्णाश्रमधर्म पाळोनी। भक्त अंतरें निर्वाळूनी। ठायीं ठायीं जागवोनी। मंगलमय संकीर्तन।।४७।। लक्षावधी सिद्ध देहांत। लाभते ऐसें एखाद्या क्वचित। तें भाग्य तुझ्या ओंजळींत। अर्पिलें बाळा दत्तरायें।।४८।। त्याची जपणूक करावी भावें। भूमंडळी शरणांगतां रक्षावें। दत्तनामाचे जयघोष गावे। आनंदानें विश्वांगणीं।।४९।।आपुल्या मधुर बोलांनीं। मार्तण्डा निवविला स्वामींनीं। मस्तकावरी ठेवोनी। वरदहस्त पूर्णतेचा।।५०।। सात सप्ताहांचीं स्पंदनें। दाटलीं होतीं खोलींत पठनें। तिथें चाललें अमृत स्त्रवणें। ऋतंभरा वैखरीचें।।५१।। तें गुरुशिष्यांचे अपूर्व मीलन। पाहती देवदेवता येऊन। ती अमृत घटिकाच महान। मार्तण्डाच्या जीवनीची।।५२।। त्या सोनियाच्या योगाला। कैसें उपमावें न कळे मजला। संकोचली शब्दकळा। दर्शन घडतां प्रसंगाचें।।५३।। धन्य धन्य शिष्यराणा। साध्य करोनी घेतलें जाणा। त्रैलोक्यस्वामी कैवल्यरमणा। सद्गुरुमूर्ति परमात्मा।।५४।। काय इच्छा आणिक तुझी। बोलावें वत्सा चित्तींची। ऐकतां वदला मार्तण्ड एकचि। तृप्त तृप्त मी गुरुराया।।५५।। नित्य हृदयीं वसावें। इतुकेंचि मागणें पुरवावे। तथाऽस्तु ऐसें बोलून सवें। स्वामी पावले अन्तर्धान।।५६।। श्रोते! या वेळीं ब्रह्मावर्ताला। स्वामींचा चातुर्मास चालला। मार्तण्डाचा हेत पुरविला। वायुवेगें येवोनियां।।५७।।

प्रगटले तैसे क्षणांत गेले। अदृश्यरूपें, कोणा न दिसले। कृतार्थतेचें भरितें आलें। इकडे पितृहृदयाला।।५८।। हृदयासी धरिलें नानाला। आशीर्वाद थोर दिधला। जयजयकार होवो बाळा। अखंड तुझा जगतीं या।।५९।। तप कठोर तुवां केले। आली त्यास मधुर फळें। आतां ब्रह्मरसानें भरलेलें। असो पुढील जीवन तुझें।।६०।। तो दिवस संपल्यावरी। आनंदें तपाची सांगता केली। हळूहळू फुलूं लागली। मार्तण्डजीवनीं कैवल्यवेल।।६१।। मात्र मंत्रदीक्षेनंतर। घडलें नानांत स्थित्यन्तर। वृत्ति अन्तर्मुख होऊन सकळ। तेजप्रभा उमलली।।६२।। निश्चळ झाल्या अवघ्या क्रिया। बाह्यरंगाकरितां उरल्या। चैतन्याच्या सात्त्विक कळया। बहरल्या हृदय-अंगणांत।।६३।। शान्त मधुर सात्त्विक मूर्ति। वाणी मृदु मवाळ रीती। दृष्टि जणुं वर्षते प्रीती। करुणामय वत्सलतेची।।६४।। आंत अखंड अनुसंधान। चित्त सहज समाधिमग्न। वरी उपचारापुरतें भान। लौकिक व्यवहारीं मार्तण्डाचें।।६५।। शिवलीलामृताचें नित्य पठन। नेमपूर्वक आन्हिक पूर्ण। स्मरावे करोनी मंत्रावर्तन। शुचिर्भूत नानांनीं।।६६।। वेदशाळेंतलें अध्ययन। याज्ञिकीचें दीक्षाग्रहण। चाललें होतें पित्याकडून। नित्यक्रम नानांचा।।६७।। वडील बंधू गंगाधर। नव्हतें गृहीं लक्ष फार। राहोनी फिरत बाहेर। यात्रा अवघी केली त्यांनीं।।६८।। म्हणोनी मार्तण्डाला सांभाळणें। नित्यानंतर चौकसपणें। होते कनिष्ठ बंधु जाणे। मोरेश्वर अन् महादेव।।६९।। परंतु





हें शान्तिब्रह्म। मुखीं अहर्निश दत्तनाम। संचितानें दिलेलें कर्म। आनंदानें आचरितसे।।७०।। गायत्रीचीं जपानुष्ठानें। चाललीं नानांची अतिनिष्ठेनें। घडत होतीं श्रीगुरुदर्शनें। स्वप्नांतरीं निमित्तमात्रें।।७१।। शास्त्रशुद्ध उपासना। करिती अत्यादरें नाना। पित्याच्या आशीर्वचना। शिरोधार्य मानुनियां।।७२।। प्रथम केली गणेशाची। मूलाधाररूपी ओंकाराची। अभिषेकें अथर्वशीर्षे साची। अखंड नाम मोरेश्वराचें।।७३।। मंत्र देवता बीज अनुष्ठान। अवघें निष्ठेनें आचरून। न्यास बीजें कीलक उकलोन। नाना देखती उपास्याला।।७४।। आळविलें नंतर रामराया। त्रयोदशाक्षरी मंत्रे सदया। रघुनाथाची रुपश्रिया। जडविली हृदयी नित्यासाठीं।।७५।। मेघश्यामल श्रीकृष्णाची। करुणावत्सल जगदीशाची। मूर्ति आराधिली नंदसुताची। एकचित्तें मार्तण्डानें।।७६।। तीन वर्षेपर्यंत सतत। देवता-उपासना आचरीत। मार्तण्डाचें हृदय शांत। पाळीत होतें ब्रह्मचर्य।।७७।। एकविधा निष्ठा त्यांची। जडली होती गुरुचरणांसी। बांधुनी विकारी चित्तासी। शुध्दब्रह्म चैतन्याला।।७८।। पूर्वी येतां तराण्याप्रती। वासुदेवानंद यती। आपुल्या हातें स्थापना करिती। श्रीदत्तमूर्ति मंदिरीं तेथ।।७९।। मूर्ति अतिशय मनोहर। पाहतां चित्त व्हावें विभोर। आग्रहें बैसविली साचार। वासुदेव स्वामींनींच।।८०।। त्या मूर्तीचें पूजन अर्चन। शंकरशास्त्रीच करिती प्रतिदिन। उत्सव कीर्तन अनुष्ठान। दत्तजन्मही करिती ते।।८१।। पुढें झाली पंचकमेटी। अधिकार

दिला शास्त्रीबुवांसी। तीच परंपरा नानाशास्त्रींशीं। सांभाळणें आलें हो।।८२।। अठरा वर्षे होतां पूर्ण। पित्यानें विचार चित्तीं करून। मार्तण्डाचें योजिलें लग्न। लौकिक रीत पाळावया।।८३।। पुत्राकरितां शास्त्रीबुवांनीं। निवडिली वधू सुलक्षणी। गोत्र प्रवर कुंडली पाहुनी। मंगल योग साधावया।।८४।। इंदूरासी 'जोशी' कुळाचें। होते मंदिर श्रीरामाचें। माहेर सात्विक वृत्तीचें। जया घरीं होतें हो।।८५।। ते शंकरराव डाकवाले। इंदूरचे गृहस्थ भले। त्यांची कन्या योजिते झाले। भीमाबाई म्हणोनीयां।।८६।। विवाह झाला तराण्यासी। शके अठराशें छत्तीसासी। मातापित्याच्या आनंदासी। पारावर उरला नसे।।८७।। गृहस्थाश्रम स्वीकारोनी। मार्तण्ड प्रवेशला नव्या जीवनीं। हौस सगळी पुरवोनी। आनंदानें आप्तांचीही।।८८।। म्हाळसाबाई सासरीं म्हणती। आली सून घराप्रती। संसाराची सोज्वळ ज्योती। फुलवावया मार्तण्डांची।।८९।। मार्तण्डानें अनासक्तपणें। आचरिला संसार शांतगुणें। लौकिक भोग जे जे भोगणें। प्राप्त होते देहासी।।९०।। देह नव्हतें अंतिम जीवन। हें तों परमार्थाचें प्रबल साधन। शुध्दात्म्याचें आवरण। परत फेड प्रारब्धाची।।९१।। म्हणोनी विवाह जरी जाहला। तरी अंतःकरणींचा दत्तजिव्हाळा। यत्किंचित्‌ही न थांबला। नामगजर मार्तण्डाचा।।९२।। विधिलिखिताची रेखा। कोण ओलांडू शके देखा। दोन वर्षे उलटतां ऐका। काळ आला पितयाचा।।९३।। आयुष्य अवघें भक्तिमय। काढिलें





शास्त्रीबुवांनीं निरामय। परी अंतकाळींचा येंता समय। ज्वरें वेढिलें तयांसी हो।।९४।। लोक बोलती 'आतुर संन्यास। घ्यावा आपण आतां खास'। वदती शास्त्री निग्रहें त्यांस। नसे गरज त्याची मला।।९५।। पूर्ण विद्वत्-संन्यासांत। आत्मा माझा आहे मुक्त। ओंकाराचा जप निवांत। मुखें त्यांचा चाललेला।।९६।। पित्याची सेवा श्रद्धेनें। करिती नाना आदरानें। दत्तचरणींचें तीर्थ प्राशिणें। हेंच त्यांचें औषध असे।।९७।। जेष्ठ मासांतली चतुर्थी। वद्यांतली उजाडली तिथी। शास्त्रीबुवांची मालविली ज्योती। प्राण-पाखरू उडालें तें।।९८।। अवघे वीस होतें वय। नानांचे हृदयीं लागला घांव। मदतीस आलें अवघे गांव। परि शोकावेग आवरेना।।९९।। सदैव जागृत मायेची। होती छाया पितयाची। मातेवरी आकाशींची। कु-हाड माथ्यावरी पडली जशी।।१००।। परी एकनिष्ठ पतिव्रता ती। खचत गेली रोज चित्तीं। मार्तण्डाची परीक्षाच होती। पाहात जणुं दैवदृष्टी।।१०१।। न कळे कैसें दैवविलसित। केवळ तीन मासचि जात। लक्ष्मीमातेचा करुण प्राणान्त। लागला पहावा नानांना।।१०२।। श्रावण वद्य अष्टमीसी। हे गेली माऊली पतीपाशीं। सोडोनियां प्रिय पुत्रांसी। दत्तप्रभूंचे पायांवरी।।१०३।। आपुल्या लहान भावां दोन्ही। आधार होते नाना-वहिनी। गिळूनी अवघें दुःख मनीं। धैर्य धरिती उभयतांही ।।१०४।। मार्तण्डासी एकचि उपाय। नित्य स्मरावे सद्‌गुरुपाय। दुःखसमुद्र तरोनी जाय। हेचि निष्ठा दृढ

त्यांची।।१०५।। त्या निष्ठेच्या नौकेवरी। तारील सकळांना श्रीहरी। हें उमजोनी अंतरीं। निश्चळ राहती संत सदा।।१०६।। कुटुंबांतील कर्तेपणा। धर्माधिकारी गांवचे जाणा। मंदिरांतली पूजा नाना। सांभाळूं लागले प्रेमभावें।।१०७।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनानांच्या आशीर्वचनें। 'मार्तण्ड-महिमा' उमलणें। विजयमुखें उत्तरोत्तर।।१०८।। शुभम् भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते तृतीयोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।

## अध्याय ४था - वामनबुवांकडून योगांग प्राप्ती



।। ते दिवशी वामनबुवांनी । समग्र योगगाथा निरुपणीं ।
विवरुनी कथिली विस्तारुनी । त्यातील अंगोपांगांसह ।।

# अथ चतुर्थोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ जय जयाजी सद्‌गुरुस्वरूपा। अगम्या तूं स्वस्वरूपा। श्रुतीही मौनावल्या बापा। वर्णू जातां तुजलागीं।।१।। सरस्वतीचे कंठमणी। ते तुझिया रूपगुणीं। शोधितां थकले भ्रमोनी। शब्दातीत रूप तुझें।।२।। जें संवेद्य परी अवाच्य। सर्वात्मक परी गौप्य। भोग्य असूनीही अदृश्य। घनदाट सर्वांभूतीं वसे।।३।। तुझिया तेजप्रकाशानें। लखलखित ब्रह्माण्ड तळपणें। सांडिलीं त्यांचीं कोंवळीं किरणें। जीवमात्राभीतरीं या।।४।। अगा, आत्मरूपा नभानीला। दिससी भाससी नीलकमला। चैतन्य सौरभ दरवळला। तुझा अखिल विश्वांतरीं।।५।। षट्‌चक्रांतील श्रेष्ठ जाण। सहस्त्रकमलदलविकसित पूर्ण। समाधीची परिसीमा गहन। परमोच्च परब्रह्म आनंदरस।।६।। तैसें तुझें रूप चैतन्य। सकळ देवांहूनी आगळें जाण। मिरविते अंगोपांगीं चिरंतन। सच्चिदानंदप्रभा।।७।। शुध्दातीत सोलींव सत्य। सरलें जेथें सत्यासत्य। आनंदाची स्वर्गंगा नित्य। स्वयंप्रभा होऊनी नांदते।।८।। सद्‌गुरूंचिया स्वरूपवर्णनीं। शब्द निःशब्द होऊनी। पाझरती मनींचे भाव लोचनीं। परीक्षावें ना बालकाला।।९।। मी अनन्य शरणांगत। मागतों तव पायांची संगत। अपारा तूं दाता जेथ। कां रे दैना करितोसी।।१०।। डोळियांना रूप दिसो।

मुखीं गोडनाम असो। हृदयांतरीं पाऊलें वसो। दीनदयाळा निरंतर।।११।। तुझिया अथांगतेचा। थांग कोण घेईल साचा। यादृशोऽसि सद्‌गुरो त्वं। तादृशाय नमो नमः।।१२।। हीच माझी वंदना। जोडोनियां कर जाणा। द्यावी कथेला चालना। पुण्यमयी नानांच्या।।१३।। नानांचे जीवनीं कसोटीयुक्त। काळ होता कष्ट सोसत। मातापितरें सोडिती नानांप्रत। ऐन तारुण्याभीतरीं पहा।।१४।। साधकावस्थेचा संकट काळ। सांभाळी नाना सावध सकळ। गांवांतील यजमान सरळ। येती नानागुरूंकडे।।१५।। शास्त्रीबुवांचा अधिकार। विख्यात होता सर्व दूर। म्हणोनी सहजचि त्यांचे नंतर। निमंत्रिती पुत्रासीही।।१६।। चालविती नाना वेदशाळा। स्वीकारिती आमंत्रणाला। यजमानाचे गृहाला। आनंद होई अनिवार।।१७।। परी विविध कार्यातले। प्रयोग बीज देवता सगळे। नव्हते अद्यापि अवगत झाले। नवीन शास्त्रीबुवांसी या।।१८।। इतर द्विज गांवांत असती। ते मार्तण्डा उणें लेखिती। येती मौज पाहण्याप्रती। टवाळी कराया निरर्थक।।१९।। परी मार्तण्डाचें भाग्य थोर। त्यासी होतें सद्‌गुरुबळ। आधले दिवशीं निजतां बाळ। आळवितसे सद्‌गुरूसी।।२०।। देवा! मज जाणे सकाळीं। मी अज्ञानी मज सांभाळीं। प्रयोग विधानें नाहीं जवळी। कैसें करूं मी गुरुराया।।२१।। ऐसी विनवणी करून। झोपतां मंदिरीं नाना जाण। मध्यरात्रीं स्वप्नीं येऊन। स्वामी सद्‌गुरू प्रगटती।।२२।। सांगती सकळ मार्तण्डाला। वदवूनी





घेती प्रयोगाला। आश्चर्यानें चकित झाला। लीन होऊनी शिष्यराणा।।२३।। निर्भय झाला नित्याकरितां। यजमानगृहीं येऊन बैसतां। घडघडा झाला बोलता। प्रयोग सकळ नानागुरु।।२४।। पुढें वेळोवेळीं सद्‌गुरुंनीं। नानांचे स्वप्नीं जावोनी। अडतां संकटीं सोडवोनी। राखिलेंसे अपत्यापरी।।२५।। पाहतां एकूण जीवनक्रम। शांत अनासक्त वृत्ती लेऊन। नाना राहती संसारीं पूर्ण। अद्यापिही तीच स्थिति।।२६।। श्रीवासुदेवानंदाचा जैसा। संसार आवरला अल्पवयसा। दैवयोगें नानागुरुही साचा। मुक्त झाला तयांतुनी।।२७।। म्हणूनी त्यांचें गृहस्थ जीवन। इतुकें शीघ्र गेलें संपून। कीं तयाची समग्र आठवण। न राहावी कोणासीही।।२८।। पित्यासमक्ष जें घडलें लग्न। त्या म्हाळसाबाई पतिव्रता पूर्ण। आज्ञेंत पतीच्या वर्तोन। राहत होत्या गृहीं जाण।।२९।। त्यांना जाहला पुत्र एक। पांच वर्षे उलटतां देख। आणि संपली जणुं संगत। ह्यांची पति जीवनातली।।३०।। शंकर नांव ठेविलें मुलाचें। असतां बाळक दों वर्षांचें। म्हाळसाबाईंसी देवाघरचें। आलें असे आमंत्रण।।३१।। सोडून लहानग्या मुलासी। आई गेली प्रभूपाशीं। नाना म्हणती मनासी। ईश्वरेच्छा बलीयसी।।३२।। मंदिरांतलें देवतार्चन। धाकट्या भावांचें शिक्षण। लहान मुलाचें संगोपन। करूं लागले नानागुरु।।३३।। घरांत नव्हतें बाईमाणूस।अतिथी अभ्यागत येती दारास। सकळ सांभाळितां नानास। कष्ट अति पडती पहा।।३४।। सर्व आप्तांच्या

आग्रहानें। नाना द्वितीय विवाहा जाणें। संमती देती तटस्थपणें। कां की ठाउक प्राक्तन पुरें।।३५।। सन एकोणिसशें चोविसासी। ‘भाले’ नामक तराण्यासी। असती त्यांच्या कन्येसीं। विवाह झाला नानांचा।।३६।। दुस-या पत्नीचेंही नांव। म्हाळसाबाईच ठेविती सर्व। दाखवावया आदरभाव। प्रथम पत्नीच्या स्मृतीसी त्या।।३७।। परी नाना गुरूची दिनचर्या। चालली पूर्ववत् समजोनी माया। दत्तात्रेयांच्या दिव्य पाया। अनन्यनिष्ठ होते ते।।३८।। गाणगापुरी श्रीदत्तांची। दैनंदिन पूजाअर्चा जैसी। तोच परिपाठ तराण्यासी। दत्तमंदिरीं होता हो।।३९।। पहाटे साडेतीनच्या समयाला। उठोनी आरंभिती पूजनाला। मंगल भूपाळी गाऊनी दत्ताला। उठविती नाना भक्तिभावें।।४०।। काकडारती पहांट होतां। ओवाळूनी पूजना बैसतां। अभिषेक सांग करुनी दत्ता। नैवेद्य अर्पिती माध्यान्हासी।।४१।। त्रिकालसंध्या करोनी। नित्याचा गायत्री जप आवरोनी। नाना बैसती भोजनीं। होतें कडक कर्मठपण।।४२।। सायंसंध्या झाल्यावरी। प्रभूची सायंपूजा सारी। करिती धूपारती साजिरी। प्रेमळ वाणीनें नानागुरु।।४३।। रात्रीं गाउनी भजनें अमित। करुणा त्रिपदीनें आळवीत। शयनारती करुनी नित्य। संपविती नाना दिनक्रम।।४४।। यांत दुपारच्या समयीं बैसती। वेदशाळीं पाठ देती। निमंत्रण येतां तेथ जाती। आनंदानें घरोघरीं।।४५।। पहा तीनच वर्षांभीतरीं। नव्हतें संसारसुख भाळीं। द्वितीय लग्न केलें परी। पुनः घडलें पूर्ववत।।४६।।





जाहली एक कन्या केवळ। आला पत्नीचा धावूनी काळ। क्रूर काळानें नेला कवळ। ओढोनियां पतिव्रतेचा।।४७।। पुनः नानागुरू एकाकी। होती हृदयांत विवेकी। अलिप्तपणें विलोकी। प्राक्तनाचीं फळें सर्व।।४८।। संसारार्थ नव्हता देह। सोडोनी सर्वसामान्य प्रवाह। एरवी कां असावें गेह। गृहिणीविना शून्य सदा।।४९।। विपत्तींचें आभाळ। आलें भरूनी भोंवताल। होती कन्या लहान कोमल। कुसुम पोरकी आईविना।।५०।। परी शांत गंभीर प्रेमळ। नाना झाले मायची केवळ। सदा कडेवरी घेउनी बाळ। थोपटिती मायेनें ते।।५१।। आपुल्या संसाराची गती। उमजली त्यांना पूर्णरीती। पुनः न मोहपाशाप्रती। नंतर त्यांनीं जवळिलें कधीं।।५२।। घरांतले बंधु दोन्ही। शिकावया जाती शाळेलागुनी। मुलगा शंकर कुसुम तान्ही। मुलें होतीं लहानची।।५३।। घेऊनी तिला मांडीवरी। नाना पूजा करिती गाभारीं। कधीं तिथेंच देहक्रिया सारी। तीच घडे वस्त्रांवरी।।५४।। पुनः करोनियां स्नान। तिला करूनी स्वच्छ पूर्ण। बैसती पूजेस अविचलमन। ठेवुनी आनंदे सोवळयांत।।५५।। परी कधींही ना रोषानें। ना आदळणें वा मारणें। सर्व सोसोनी प्रेमळपणें। वाढवीत होते मुलें दोन्हीं।।५६।। पुनः सर्व कर्माचरण। होतें त्या काळीं कडक पूर्ण। परगृहीं अन्नग्रहण। वर्ज्य करिती नाना सदा।।५७।। स्वतः सोवळयांत बैसोनी। आपुला पाक सिद्ध करोनी। नैवेद्य दत्तास दाखवोनी। करिती नंतर भोजन पहा।।५८।। मंदिर होते प्रशस्त।

गावांतील मध्यवस्तींत। म्हणोनी अवघे अभ्यागत। सहज उतरती दत्तमंदिरी।।५९।। त्यांची अवघी भोजन सोय। ठेविती आदरें नाना सांग। कीर्तन प्रवचन चाले अखंड। दत्ताचिया समोर तेव्हां।।६०।। तापसी नाना त-हेचे। येती आश्रयार्थ मंदिराचे। विशेषतः स्वामी वासुदेवांचे। अनुग्रहीत सर्व येती।।६१।। पुण्यवास स्वामींचा। चातुर्मासांत होता साचा। त्या त्या ठिकाणीं जाण्याचा। होता आदेश स्वामींचा त्यां।।६२।। त्या वेळची एक कथा। सांगेन तुम्हां अद्‌भुत आतां। एके दिनीं दुपारीं येता। जाहला एक तापसी घरीं।।६३।। तो होता ब्रह्मचारी। जटाभार होता शिरीं। वस्त्र एक अंगावरी। कमरेस होती लंगोटी।।६४।। काही दिवसांकरितां। आश्रय मंदिरीं देतां। उपकृत होऊं सर्वथा। ऐसें बोलती नानांसी ते।।६५।। आनंदाने मान्यता त्यांना। देती तत्काळ पाचारूनी नाना। नांव गांव पुसती जाणा। कुतूहलानें तयांना हो।।६६।। वामन बुवा ब्रह्मचारी। म्हणती देहास सर्व बाहेरी। आश्रम अमुचा ओंकारेश्वरीं। असे विख्यात तिथें सर्वां।।६७।। आम्हांलागी काहीं न करणें। भिक्षेवरी आम्हां वर्तणें। ऐकुनी नानांनी संतोषानें। दिली संमती राहावया।।६८।। दोन दिवस झाले परी। दोघेही आपापल्या व्यवहारीं। दिवसा व सगळया कामाभीतरीं। संभाषण ना झालें पुनः।।६९।। तिस-या दिवशीं रात्रीं उभयतां। निजले जवळच दोघेही तत्वतां। तो तीनचा समय होता। येतसे जाग नानांसी।।७०।। पाहती डोळे





परी येतो आहे ध्वनि पूर्ण। ऐकावया मजलागीं।।७१।।‘शिवोऽहं ’ऐसा नाद। चालला निकटचि गंभीर धुंद। ऐकती नाना होउनी मुग्ध। पाहती शेजारी आपुल्याच हा।।७२।। तो शांत स्तब्ध निद्रिस्त। होते वामनबुवा सत्य। त्यांचे श्वासांतूनी निघत। होता ध्वनि शिवरूपी।।७३।। अखंड चालला होता जप। ज्याचें नांव अजपाजप। देहांतुनी आपोआप। श्वासासंगें वाहात असे।।७४।। नाना पाहती चकित होवोनी। विचार करिती अपुले मनीं। तापसी नसे साधा कोणी। असावा अधिकारी खचित पहा।।७५।। पुसूं यासी खरें काय। परी होवोनी गेला आज वेळ। पहाट प्रहर आला जवळ। दैनंदिन पूजनाचा।।७६।। तो दिवस तसाच गेला। आतुरता लागली चित्ताला। कधीं विचारीन या देहाला। रहस्य सकळ साधनेचें।।७७।। त्या दिवशीं रात्र होतां। शयनारती सांग आटोपतां। रात्री कोणी न पाहून एकांता। मंदिरांत जेव्हां दोघेच।।७८।। धावत जाऊनी नानांनी। घट्ट धरिले चरण दोन्हीं। पाहतां वामनबुवांनीं। उद्‌गारती आश्चर्यानें।।७९।। ‘अरे, पंडित काय करितां। मी सामान्य अतिथि असतां। चरण माझे कशास धरितां।’ वदती त्यांस नाना गुरु।।८०।। तें असो आतां पाय। मी न सोडणार मुळीं माय। मज दावावी कांहीं सोय। ओळखूं न शकलों तुम्हांप्रती।।८१।। आधीं बरेंच वामनबुवांनीं। पाहिलें नानांना टाकूनी। परि दृढनिश्चय पाहूनी। उकलिलीं रहस्यें कृपाळूपणें।।८२।। एक आमुची तुम्हां विनंती। आपुला

परिचय केवळ रात्रीं। दिवसा मात्र आमुच्याप्रती। ओळखही न दावा यत्किंचित।।८३।। हा असे योगमार्ग। प्रगट करितां न हो सिद्ध। एकांती करावी साधना शुध्द। पवित्रशा मानसें हो।।८४।। ते दिवशीं वामनबुवांनीं। समग्र योगगाथा निरुपणीं। विवरूनी कथिली विस्तारूनी। त्यातील अंगोपांगांसह।।८५।। यम नियम आसन। प्राणायाम प्रत्याहार केला कथन। ही बहिरंग साधनें जाण। असती अष्टांग योगामधीं।।८६।। प्राणायामानंतरी। चित्तस्थैर्य साधल्यावरी। अंतरंग साधनांवरी। भर द्यावा साधकानें।।८७।। अष्टांग योगांतील साची। तीन साधनें अंतरंगींचीं। धारणा ध्यान समाधीची। स्थिति सांगती वामनबुवा।।८८।। महामुनी पतंजलींनीं। कथिला योग आठ पदांनीं। तो आचरूनी ओलांडुनी। जातां पुढें मग शिवस्थितीच।।८९।। यमनियमांची बीजस्थिति। पल्लवित प्राणायामप्रत्याहारें निश्चिति। फुलते पुढच्या साधनांतीं। सुफलित होई समाधींत।।९०।। पहाट होतां अवचित थांबले। वामनबुवा सांगतां भले। परी नाना विनवती धरुनी पाऊलें। करुनी घ्या हो माझ्याकरें।।९१।। कृपाळूपणें पाहुनी निश्चय। देऊं उद्यां तुम्हांस पाथेय। जेणें घडेल मनोलय। शिवरूपीं तुमचा देहींच या।।९२।। दुसरे दिनीं दिवसा भाषण। मुळीं न केलें नानांलागून। परी जातां लोक निघून। रात्रीं एकांतीं बैसले ते।।९३।। श्रोते! ऐसे दिवस पंधरा। होते ब्रह्मचारी दत्तमंदिरा। रात्रीं होतां दोन प्रहरा। पाठ देती नानांलागीं।।९४।।





त्यांची रीतीही अद्‌भुत। आणि नानासम शिष्य लाभत। योगांगे झालीं अवगत। याच समयीं सकळ सुयोगें।।९५।। होतां त्यांचें समाधान। वदले आम्ही परत येथून। ओंकारेश्वरीं येऊन। अवश्य आम्हां भेटावें तेथ।।९६।। पुढें अकस्मात दुसरे दिनीं। ब्रह्मचारी गेले निघोनी। मात्र नानांसी लागोनी। राहिली सादर उत्कंठा अति।।९७।। उलटतां यास कांहीं दिन। येतां त्यांची आठवण। तातडीनें नाना जाऊन। पोंचले ओंकारेश्वरीं पहा।।९८।। भव्य गंभीर नर्मदेच्या। माथ्यावरी पर्वताच्या। विख्यात तिर्थी त्रिवेणीच्या। कर्पूरगौर विराजें तिथें।।९९।। त्या प्राचीन सुंदर स्थानीं। अनेक सिद्ध तापसी मुनी। राहती आश्रम बांधोनी। नर्मदेच्या अंकावरी।।१००।। तेथें नाना जावोनियां। मठ सर्वत्र धुंडोनियां। पुसती ज्याला त्याला सदया। कुठें वसती वामनबुवा ते।।१०१।। विष्णुपुरी शिवपुरी। ब्रह्मपुरी अमलेश्वरी।। धुंडाळिली सर्व औंकार नगरी। परी न गवसे ब्रह्मचारी।।१०२।। सिद्ध वामनबुवा नामक। कोणी नसे इथें साधक। अथवा त्यांचा मठ आदिक। येथ नसे मुळींही देखा।।१०३।। मग मात्र चित्तांतरीं। प्रकाश पडला खरोखरी। वासुदेव स्वामीच आले घरीं। योगगाथा द्यावयासी।।१०४।। बळेंचि घेतला ब्रह्मचारी वेष। शिष्याकरितां नटला ईश। विचार करितां मनास। भरतें येऊं लागलें हो।।१०५।। पक्षिणीनें घांस पिलासी। तैसा भरविला योग मजसी। आमरण ऋणी मी चरणांसी। आपुल्या परब्रह्मा वासुदेवा।।१०६।।

बाह्यत: आज नानांचा। थाट भासला साधाची साचा। तरी अन्तर्यामी अजपाजपाचा। घोष चालतो अखंड।।१०७।। श्रोते। तुम्ही भाग्यवंत। ऐकता नाना-कथामृत। बोलविती सद्‌गुरू कृपावंत। होउनी मजवरी करुणेनेही।।१०८।। श्री गजाननांच्या प्रेरणें। नानागुरुंच्या आशीर्वचनें। मार्तण्ड-महिमा उमलत फुलणें। उत्तरोत्तर विजयमुखें।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते चतुर्थोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त।।



## अध्याय ५वा - मथुरेच्या यात्रेप्रसंगी श्रीहरींचे दर्शन



।। प्रसन्नतेने हंसत आली । समोर खडकावरी विसांवली ।

# अथ पंचमोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ जय जयाजी गिरिजावरा। नीलकण्ठा गंगाधरा। चंद्रशेखरा त्रिपुरहरा। आत्मलिंगा जगदीशा।।१।। हे देवाधिदेवा सदाशिवा। कालान्तका कालभैरवा। गुणातीता महारुद्रा। जरा-जन्म-निवारका।।२।। अपर्णाकांता आदिनाथा। पंचानना भूतनाथा। मदनांतका भस्मांकिता। तामसा लोहिता त्रिलोचना तुम्ही।।३।। देवा तुमची ज्योतिर्लिंगें। विराजती आपुल्या विरागें। शुभकराची प्राणलिंगें। नेती शिवरूपी उपासकांसी।।४।। नमोऽस्तु ते सोमनाथा। मल्लिकार्जुना शैल्यपर्वता। महांकाला अवन्तीनाथा। ओंकाररूपा अमलेश्वरा।।५।। कर्पूरगौरा केदारनाथा। त्र्यंबकेश्वरा गोदातटा। रामेश्वरा सेतुबंधा। वैजनाथी तूं शंभुदेव।।६।। कैलासराणा तूं घृष्णेशा। वाराणसीवासी विश्वेशा। भीमाशंकरा नंदिकेशा। श्रीनागेशा नागबन्धा।।७।। जगत्पालका जगदाधारा। युगान्तीं तूं प्रलयंकरा। निर्मिली माया संहारा। सहजलीलें नेतोसी।।८।। रघुनाथवरदा रामहृदया। स्वभावें लीन विष्णुपाया। विष्णु मिरवितो तुझी काया। माथ्यावरी आनंदानें।।९।। तूं योगीशा योगेश्वरा। सिध्दमुनिजनांचा आसरा। अखंड समाधि राजराजेश्वरा। आत्मरंगीं बुडालेला।।१०।। असूनी तूं स्मशानवासी। गजचर्मधारी एकांतवासी। नररुंडमाळा मिरविसी। कंठामध्यें नीलग्रीवा।।११।।

अभयंकरा नित्यमंगला। हिमशुभ्रकांति मनोहरा। शक्ति अंबिकेचा सोयरा। सुखदाता शरणागता।।१२।। भांडारी तुझा कुबेरासी। म्हणती अवघे त्रैलोक्यासी। तूं भक्तांना राखिसी। आधिव्याधी भयांतुनी।।१३।। आलों तुझिया चरणीं नाथा। निष्कांचन मी ठेवितों माथा। चिन्तामणि, तुझे चरण धरितां। चिन्तानळीं का जाळिसी रे।।१४।। अविचल भक्तियुक्त करावें। प्रपंचीं सर्वथा सांभाळावें। एवढें माझें राखावें। ब्रीद दयानिधे तुम्ही।।१५।। श्रोते! मागील अध्यायांत। योगगंगेचा हृदयीं स्त्रोत। कसा प्रगटला मार्तण्डांत। रहस्य त्याचें विशदिलें।।१६।। पाहतां नानामूर्ती आपण। बाह्य रूपीं जाऊं सहज भुलून। परी हृदयीं पूर्ण अनुसंधान। आत्मस्वरूपीं जडलेलें असे।।१७।। निळया शांत आकाशीं। व्हावी दाटी मेघांसी। सांडतां सारी जलराशी। निर्विकार गगन पुन्हा।।१८।। तैसे नानांच्या संसारीं। आलीं संकटें आरंभीं जरी। निर्विकल्प चित्तवृत्ती सारी। नित्य अविचल राहिली हो।।१९।। येऊनी सद्गुरु सोयरा। अंतरींचा ठेवा सारा। योगाचा देऊनी साजिरा। अंतर्धान पावलासे।।२०।। नानागुरूंचा दैनंदिन। विकसला योग-अभ्यास पूर्ण। परी न कोणाही लोकांलागून। यत्किंचितही उमजूं दिलें।।२१।। " या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी "। गीता अ.२. या वचनातें पाळूनी नाना। ऐन रात्री एकांतीं जाणा। करिती योगाच्या अभ्यासचिन्तना। परमात्मतत्त्वीं शिरोनियां।।२२।। दत्तमंदिरा निकटचि। रहात होती एक भगिनी साची। होती





प्रेमळ मनाची। कोंडुताई नामक जी।।२३।। तराण्यासी असतांना। आदेश मिळाला नानांना। कराव्या तीर्थयात्रा जाणा। बहु देशीं फिरोनिया।।२४।। नव्हतें घरीं सांभाळण्यासी। दोन्ही लहान पुत्रकन्येसी। देवोनी त्यांना कोंडुताईसी। निभ्रान्तपणें निघती नाना।।२५।। त्या वेळीं श्रीनानांची। सुदृढ यष्टी शरीराची। होती मजबूत बांध्याची। तेजःपुंज मनोहर।।२६।। धगधगीत वैराग्य जागतें चित्तीं। अवघ्या लीन होत्या वृत्ती। कडक कर्माचरणीं प्रीती। स्वाभाविक होती तेव्हां।।२७।। नव्हते नाना लक्षाधीश। म्हणोनियां तीर्थयात्रेस। निघती निष्कांचन निर्भय मनास। घेऊनीयां सांगाती ते।।२८।। सारा सोंपवोनियां भार। श्रीगुरूंचे चरणांवर। केल्या नानांनीं अपार। मनोहर तीर्थयात्रा।।२९।। फिरले नाना चहूं प्रांतात। घेतलीं तीर्थदर्शनें अमित। तीर्थयात्रेचे अनुभव सांगत। कधीं सहजलीलेनें ते ।।३०।। साधकावस्थेच्या काळांत। गेले एकटेच निवांत। नव्हतें कोणी सांगात। हिंडतांना बरोबरी।।३१।। मनस्वी होती दिनचर्या। अवधूतवृत्ती ठेवोनियां। तीर्थपंथा आचरावया। झाले नाना प्रवृत्त तेव्हां।।३२।। तीर्थराजाचे दर्शनाविना। न सोडिलें तें स्थान जाणा। दर्शनासाठीं प्राणही नाना। त्यजावया तयार होती।।३३।। अर्धोन्मीलित नयनांनीं। उन्मत्त भक्ति-लहरींनीं।' दिगंबरा-दिगंबरा ' मंत्रांनीं। नाना वाट चालताती।।३४।। अखंड सोबत मंत्राची। आणि वाट पायतळींची। ऐसी कहाणी नानांची। होती तीर्थयात्रेची हो।।३५।।

तीर्थयात्रेचिया उद्देशीं। प्रथम जाती काशीपुरीशी। त्या जगत्पिता विश्वेश्वरासी। मनोभावें वंदिण्याला।।३६।।' श्रीगुरुचरित्रीं ' जैसी वर्णिली। काशीयात्रेची पध्दती कथिली। त्याच क्रमाने संपूर्ण आचरिली। विश्वेश्वराची यात्रा त्यांनीं।।३७।। परी कोणी तरी तयांना। सहज वदलें घडेल दर्शना। जातां आनंदवनीं गहना। वाराणसीजवळील।।३८।। आनन्दवन हें अरण्यमय। विक्राळ भयाण वृक्ष समुदाय। आडवाटे जातां भय। वाटे सामान्य मानवासी।।३९।। त्या वनीं श्रीशंकर। देती दर्शन खचित सुंदर। ऐकतां हरखलें मानसमंदिर। दर्शनस्मृतीनें शिवाच्या।।४०।। निश्चय करुनी पुरता मनीं। शिरले नाना होऊन निर्वाणी। त्या भयाण निर्जन वनीं। मुखांत मंत्र श्रीगुरुंचा।।४१।। किर्र झाडी आंत होती। हिंस्र श्वापदें सहज विहरती। व्याघ्र सर्प मुक्त संचरती। भोंवतीं जवळूनी नानांचिया।।४२।। परी यत्किंचितही न दचकतां। मनांत मुळीं न डगमगतां। मुखानें मंत्र जपतां जपतां। नाना मार्ग क्रमिताती।।४३।। बराच समय उलटून गेला। परी दयाघन प्रभू न दिसला। अन्तर्यामीं धांवा मांडला। त्या भोलेश्वर शंकरांचा।।४४।। तों घडलें अद्भूत सत्य। समोर उभा मूर्तिमन्त। भव्य दिव्य पुरुष, हात। आजानुबाहू होते हो।।४५।। कर्पूरगौर होती कांति। धोंडा घेऊनिया हाती। नानांना मारण्या धावूनि येती। क्रुद्ध मुद्रेनें भयंकर।।४६।। ओळखोनी ती शिवमाया। साष्टांग दंडवत घालोनी तया। शरणांगत मी तुझिया पाया।





वदती नाना पाहि माम्।।४७।। चिमटींत धरोनी माती। भूमीवर नाना टाकिती। मृत्तिकेचे पाषाण बनती। हा भाव दावावया।।४८।। देह घडला ती ही माती। विश्वेश्वरा जरी मज मारिसी। खुशाल मारा हे कोणासी। भाग्य लाभे भगवन्ता।।४९।। ऐसें बोलतां दीनवाचें। सौम्य रूप धरिलें साचें। वदले न पुढें जावयाचें। कारण आतां उरलें तुम्हां।।५०।। परतावें आतां येथून। जाहली यात्रा सांग पूर्ण। पुरतील कामना संपूर्ण। इच्छित जें जें मनीं तुमच्या।।५१।। हृदयीं आनंद आला दाटून। कृतार्थ झालों, घडलें दर्शन। पुनः पुन्हां वंदून। परतले नाना स्वस्थानीं।।५२।। ऐशिया रीतीं नाना गेले। एकदां एकटेच निघाले। मुकुंद मुरारी शोधूं लागले। मथुरेमध्यें येऊनियां।।५३।। ध्यास होता एकचि साचा। अपूर्व अमृताहुनी गोड नंदाचा। नंदकिशोर यशोदामाईचा। पाहीन कान्हा श्रीहरी मी।।५४।। मथुरेजवळी बाळपण। कृष्णाचें गोजिरें घडलें पूर्ण। बाळलीलांचे आनंदनिधान। हृदय होतें गोपिकांचे।।५५।। बन्सीधर श्यामलमूर्ति। वेड लाविले गाईगुरांसी। लता वेली जळ लहरींसी। यमुनामाईच्या जयाने।।५६।। त्या सुरमुनिजनांचा प्राण। गाई गोपींचें देहभान। वसुदेव-देवकीचा बाळ पाहीन। ध्यास घेतला नानांनीं।।५७।। मथुरेमधील देवता भुवनीं। जाती नाना वेडे होऊनी। वृत्ति गेल्या हिंदोळुनी। कधीं पाहीन अमृतरूप।।५८।। ऐकिलें होतें कधींतरी। खेळतो तो श्रीमुरारी। गोपाळांसवें नदीतीरीं। बाळरूप

घेऊनियां।।५९।। भावविव्हल नानांनीं। मुलांमध्यें खेळोनी। पाहिलें तयाला शोधोनी। परी न मुळीं गवसला।।६०।। निराश होऊनी गोकुळीं। निघाले नाना व्याकुळली। भाववृत्ती बेभानली। आक्रोशली आर्तपणें।।६१।। गोकुळांतील रासलीला। पाहिली खेळली परि न दिसला। ये रे ये रे धांवुनी वेल्हाळा। एकदां तरी क्षणमात्रच।।६२।। वृन्दावनीं नानामूर्ती। जाऊनियां पुसूं लागती। कुठे भेटेल तो श्रीपती। इथें तिथें खेळलेला।।६३।। त्याच्या चरणरजांनीं। पावन झाली इथली धरणी। भाळी नाना आपुल्या लावुनी। विचरती तिथें वेड्यासम।।६४।। नाही देऊळीं राऊळीं। न दिसला कान्हा गोकुळीं। धिक्कार करिती नाना अंतरीं। व्यर्थ तुझें जिणें होय।।६५।। त्या कृपेचिया मेघाला। कां न अजुनी जाग आला। आपुल्या खोट्या प्राक्तनाला। बोल लाविती नाना तेव्हां।।६६।। वेड्यासम तिथें भटकतांना। विसरून तहान भूक नाना। तीन दिवस पूर्ण उपोषणा। करिती एका धुंदींतच।।६७।। परी नव्हतें त्याचें भान। हृदयीं सांठवून नारायण। जनीं वनीं शोधशोधून। काया थकली नानांची।।६८।। अखेर धिक्कारूनी स्वतःला। निश्चय चित्तीं हाचि केला। या पापी माझ्या देहाला। यमुनामाईसी अर्पावें।।६९।। पसरत होत्या संध्याछाया। यमुनाकांठानें चालली काया। मनुष्य वस्ती सोडोनियां। दूर जावया विजन स्थलीं।।७०।। समोर संथ वाहते यमुना। मागें भयाण रान जाणा। दाटला अंधार चहूं दिशांना। नाना एकटे एकांतीं।।७१।।





सायंसंध्येची वेळ होती। म्हणोनी एक खडक निश्चिती। पाहूनी तीरामध्यें बैसती। नाना संध्येस नित्याच्याच।।७२।। आटोपली बैसोनी त्यावर। संध्या नाममात्र केवळ। आणि लय लावोनी नजर। मिसळली यमुना तरंगांतरीं।।७३।। शांत वाहत होता वारा। फुलती नभांत चंद्र तारा। मंद चांदण्याचा प्रकाश झरला। सोडला होता जळामध्यें।।७४।। लागली तन्द्री नयनांची। खिळली दृष्टी त्यावरी साची। अंतरांतल्या व्याकुळतेची। तरंगाकार झाली स्थिति।।७५।। मनीं चिंतिती अखेर नाना। हे जगदीशा नारायणा। न दाविलें तुझिया चरणां। त्यजीन काया निश्चयें ही।।७६।। कृपाळुवा सद्‌गुरु माऊली। आजवरी यथाशक्ति यात्रा केली। क्षमा करावी अमित घडलीं। पापें माझिया करांनीं या।।७७।। या चिंतनीं दंगलेली। होती नानामूर्ति कोमेजलेली। न कळे किती काळ बैसली। निश्चळतेनें त्या स्थळीं।।७८।। इतुक्यात घडलें अघटित। श्रोते! ऐका देऊनि चित्त। अवचित प्रकाश झळझळीत। कालिंदीच्या जळामध्यें।।७९।। नयनांत लकाकली ज्योती। नाना अंतरीं चमकती। चांदण्याची नव्हती निश्चिती। दिव्यप्रभा ही मनोहर।।८०।। या निवांत निर्जनस्थळीं। कोठून फुलली तेजकळी। मागून असावी म्हणोनी वळली। नजर सहज पाठमोरी।।८१।। तों काय दिसावें नानांना। रूप तेजःपुंज जाणा। मुकुंद मुरारी मनमोहना। बाळरूपडें गोजिरें अति।।८२।। मोरपीस खोंविलें शिरीं। सुरेख बन्सी वाम करीं। उजव्या हातीं

एक झारी। तीर्थे भरली होती हो।।८३।। अंगरखा भरजरी अंगाला। होतें धोतर, बांधलेला। शेला सुरेख कमरेला। गोपबाळ होता पुढें।।८४।। घमघमणारा सुगंध भोंवतीं। तेजाचे वलयीं कृष्णमूर्ती। उचंबळल्या सगळ्या वृत्ती। वेडावुनी क्षणार्धात।।८५।।"ठाडे रहियों पंडितजी !"। सुमधुर शब्द मुखामाजीं। वदले हंसत गोपालजी। भावविभोर नानांना।।८६।। प्रसन्नतेनें हंसत आली। समोर खडकावरी विसांवली। घट्ट धावूनी मिठी घातली। त्या दिव्य चरणारविंदा।।८७।। वदती श्रीहरी तीर्थ घ्यावें। ऐकतां नाना करिती भावें। समोर आपुले करतळ उजवे। स्वीकारीती भारल्यागत।।८८।। तेव्हां जवळील झारींतून। केवळ तीनच बिंदु टाकून। मागें झारी घेतां जाण। प्यालें तितुकें तीर्थ नाना।।८९।। तें अमृतमधुर तीर्थ। जातां उदरीं होऊन तृप्त। शीण उपोषणांचा क्षणांत। हरपोनी गेलाही नानांचा।।९०।। दिठीत सांठवली रूपश्रिया। हंसरी कोंवळी गोपमाया। आनंदाच्या अनिवार उसळ्या। येऊं लागल्या हृदयाला।।९१।। आणखी काय इच्छा पुसती। नानांसी, श्रीश्यामलमूर्ती। धारिष्ट करुनी नाना वदती। खासा न्याय जगदीश्वरा।।९२।।

" एक बात एकान्त में सुन लो जगदाधार।
तारे मेरे कर्म तो प्रभु का क्या उपकार ?।। "

अरे माधवा किती तळमळलें। व्याकुळलें मानस वेडावलें। राधेसम वणवण फिरलें।





तेव्हां दाविलीं पाउलें ही।।९३।। नको रागाऊं परी यांत। श्रेष्ठ तुम्ही कीं तुमचा भक्त। कर्मास त्याचीं फुलें येत। कुठें आपुलें थोरपण।।९४।। ऐकतां हें मानसवचन। हंसले श्रीहरी खळखळून। करावी क्षमा मजलागून। सद्गदित नाना विनविती।।९५।। पुनः न कधीं हें रूप दिसेल। जाणुनी पदकमल धरिलें सबळ। आंसवें आलीं घळघळ। नानांचिया नेत्रांतुनी।।९६।। कांहीं क्षण निवांत गेली। निमिषांत मूर्ती अन्तर्धान पावली। तटस्थ होउनी तिथेंच स्थिरली। दिङ्मूढ अवाक् नानामुद्रा।।९७।। निर्जन शांत रात्रीसमय। तृप्तावली काया भक्तिमय। गलबलते अजूनीही येतां सय। हृदय सकळ नानांचे।।९८।। तीर्थराज त्रिभुवनपालक। पाहतां जाहलें यात्रासार्थक। तें दिव्य दर्शनाचें सुख। हृदयसंपुटी सांठलें सदा।।९९।। नानाहृदयीं नित्यासाठीं। त्या रुपाची बैसली मिठी। सांगतां पाझरते दिठी। पुनः सकळ दिसोनियां।।१००।। मथुरा गोकुळ वृंदावनींचें। गोपीहृदय कमलकंदाचें। बालमुकुंद बन्सीधराचें। घडलें दर्शन साक्षात।।१०१।। कैसे भाग्यवन्त सद्गुरू नाना। नसे पूर्व पुण्यासी तुळणा। धन्य धन्य त्यांच्या लोचना। तृप्तविलें श्रीकृष्णांनीं।।१०२।। सांग करूनी यात्रा मग। परतले पुन्हां स्वगृहीं दंग। श्रीरंगाचा नामरंग। उधळीत पंथानें उन्मुक्तपणें।।१०३।। पुण्य पुरुष नाना खचित। वर्णिलें तयांनीं तसेंच लिहीत। अधिक उणें ना मुळीं सांगत। सत्य सत्य त्रिवाचा।।१०४।। तयांचें चरित मोहक अद्भूत।

मुखानें माझिया व्हावें मुखरित। हाचि दैवी दिसतो संकेत। स्वामी सद्‌गुरुरायांचा।।१०५।। सात्त्विक शब्द-कुसुमांची माळा। गुंफोनियां श्रीगुरुचरणांला। मागतों मी गुरुमाऊलीला। दान इतुकेंचि दयाळे।।१०६।। ही प्रेरणा लेखनाची। कळसास न्यावी तुम्हीच साची। रसभरित कथा सरितेची। भीक मला घालावी।।१०७।। न्हाऊनी संतांच्या कथाजळीं। निर्मळ व्हावीं मानसें सगळीं। प्रगटावी अंतरीं सांवळी। मूर्ति अद्‌भुत तयांच्याही।।१०८।। श्रीगजाननांच्या प्रेरणे। श्रीनानांच्या आशीर्वचनें। मार्तण्ड-महिमा उमलणें। उत्तरोत्तर विजयमुखें।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते पंचमोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त ।।

## अध्याय ६वा - नर्मदा परिक्रमा



।। नर्मदामाईचें तीर गंभीर । ठेवुनी नित्य नजरेसमोर ।
चालती नाना सत्वर । वाट अपुल्या प्रदक्षिणेची ।।

# अथ षष्ठोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ नमोजी आदिपुरुषा। अनंता अव्यक्ता सहस्रशीर्षा। जगदात्म्या तूं जगदीशा। ब्रह्माण्डाधीशा नमोऽस्तुते।।१।। जगत्पिता तूं जगदाधारा। अनादि अनन्ता निराकारा। योगमाये योगेश्वरा। शेषशयनीं पहुडलेला।।२।। भगवन्ता तुझे निःश्वास होती। ऋक् साम यजुर्वेदमूर्ती। ओंकाराची प्रणवशक्ति। आकारली सृष्टिरूपें।।३।। कमलनाभ तूं सर्वेश्वर। अनन्तकोटी ब्रह्माण्डगोचर। रचिली मायेनें केवळ। मायातीता मोहना।।४।। साक्षात् आपोनारायणा। सप्तसागरां सखोल गहना। भरविलें लीलया संकर्षणा। पद्मनाभा वासुदेवा।।५।। चिद्विलासा चित्सुखकन्दा। सदानन्दा श्रीगोविंदा। वैकुण्ठींच्या परमानंदा। पांडुरंगा परमेशा।।६।। शंखचक्रगदाधारी। तुम्हीं राखिलें भक्तांना मुरारी। शरणांगतां भवसागरीं। धांवोनी संकटी सोडविलें।।७।। गजेन्द्राचिया आकान्ता। धांवलास तूं रमाकान्ता। द्रौपदीच्या व्याकुळचित्ता। पाखर मायेनें घातिली।।८।। तुझा म्हणवितों मी दीन। अनन्य, पायीं तुझिया लीन। सर्वथा मज सांभाळोन। पैलपार न्यावें माधवा।।९।। झालीं जरी ठायीं एके। मूर्तिमन्त पंचमहापातकें। जाती सकळ तुझिया धाकें। निरसोनी, ऐसी कीर्ती तुझी।।१०।। ऐकोनी मी घोटाळतों। चरण तुझे न्याहाळितों। लाचार मनें वाट पाहतों।

तुझिया कृपाकटाक्षाची।।११।। वर्णिती त्या थोरपणासी। जो उदारपणें अपराधासी। पोटीं घालितो सर्वांसी। राखितो निज अपत्यापरी।।१२।। हीन गुणांचें असतां बाळ। माय अधिकचि मवाळ। देई कुशींत अपुल्या प्रेमळ। आसरा नित्य तयालागीं।।१३।। तैसा मी तुज नारायणा। हीन दीन पातकी जाणा। आशाळभूत तुझ्या चरणा। पाहतों वत्सले कृपासिंधो।।१४।। उपेक्षेनें मज अव्हेरिती। हंसती जन हे सदैव श्रीपती। न मानतों त्यांची क्षिति। पाहूनी गोपाळा तुझ्याकडे।।१५।। भक्तवत्सला दीनानाथा। द्यावा चरणीं ठाव आतां। माय बाप बंधु सर्वथा। तूंचि श्रीधरा सखा माझा।।१६।। कथेसी अनुसंधान द्यावें। चरितश्रवणा सादर व्हावें। म्यां पामरें काय गावें। मार्तण्डाचें अथांगपण।।१७।। मथुरा यात्रा घडतां पावन। तराण्यासी होते कांहीं दिन। परी उत्कटतेनें पुनः मन। ओढूं लागलें यात्रेसी।।१८।। या पुण्यभूमीवरी प्रसिद्ध। नद्या पुण्यसलिला शुद्ध। स्नानमात्रें भवबंध। मुक्त तत्काळ करिती साधकासी।।१९।। लोकमाता भागीरथी। यमुना सिंधु सरस्वती। कृष्णा गोदा ऐशा किती। वंदाव्या सरिता देवतातुल्य।।२०।। सहस्त्रवर्षापासौनी पोषिती। तटींच्या लेंकरांचें जीवन असती। सस्यश्यामला ही धरित्री। सुफलित समृद्ध करिती सदा।।२१।। पूर्वीपासौनी ऋषीमुनी। तीरीं नद्यांच्या राहोनी। वेदऋचांची अमर वाणी। गायिली उपनिषदें येथ अवघीं।।२२।। भरतखंडामाजी सरिता। नसती केवळ भौतिक सत्ता। परी या





चैतन्यमयी जलदेवता। लोकमंगला अन्नपूर्णा।।२३।। ऐसी श्रध्दा पुराणीं कथिली। अद्यापिही त्याची प्रतीती आली। अनेक सिद्धांनीं अनुभविली। दिव्य दर्शनें साक्षात।।२४।। या सरितांचा महिमा अगाध। पुण्यश्रेष्ठ सिद्धांचे सिद्ध। राहिले त्यांच्या सत्त्वें विशुद्ध। नित्यपावना जगन्माता।।२५।। कोणी तारिती त्रिकालस्नानें। कोणी उद्धरिती कठोर तपानें। कोणी केवळ दर्शनानें। संतोषिती साधकांना।।२६।। या तीर्थांचें अवश्य स्नान। करावें म्हणती पर्वणीलागुन। श्रीमन्त प्राक्तन असल्यावांचून। न घडे तीर्थसमागम।।२७।। विन्ध्याचळींची गंभीर गहना। प्राचीन सुंदर त्रैलोक्यपावना। नर्मदा माई सदा जलपूर्णा। अशीच अलौकिक सरिता असे।।२८।। साधकांची ही साक्षात् माऊली। तापसी जनांची विसांवा साऊली। वाहते आपुल्या विमल सलिलीं। सांठवोनी अमृतकळा।।२९।। नर्मदेची करितां प्रदक्षिणा। अपार शांति अंतःकरणा। लाधुनी अनेक सिध्दचरणां। कल्याण होतें साधकांचें।।३०।। म्हणोनी कर्ममार्गीच्या सिद्धांनीं। आणि अनेक साधकांनीं। सांग प्रदक्षिणा करोनी। संपादिली आत्मतृप्ती।।३१।। श्रीमद्‌वासुदेवानंदही वसती। मुद्दाम नर्मदातटीं करिती। गरुडेश्वरीं राहोनी शेवटीं। पावन होती स्वामिराय।।३२।। चिरंजीव प्रख्यात भुवनीं। श्रीवेदव्यास पुराण मुनी। तेही असती अदृश्यपणीं। नर्मदातटीं श्रुती ऐसी।।३३।। लोकपावना सरिता जगतीं। सिद्धागमनें आनंदित होती। साक्ष अवतारी संत देती।

कितीक अपुल्या चरित्रांत।।३४।। तराण्यासी असतांना। श्रीगुरु स्वामी वदती जाणा। आदेशमिषें नानांना। करावी यात्रा नर्मदेची।।३५।। प्रदक्षिणा ही नर्मदेची। अतिकठीण दुष्कर साची। न घडे कुणाही साधकासी। गुरुकृपा असल्याविना।।३६।। कोणत्याही एका स्थाना। प्रमाण मानोनी निघावें गमना। पूर्ण करोनी रेवाप्रदक्षिणा। परतावें स्थळीं त्याच पुनः।।३७।। पायींच करणें अवघा प्रवास। सोसुनी संकटें राखुनी सत्त्वास। कोठेंही नर्मदातीरास। साधकानें सोडूं नये।।३८।। प्रदक्षिणेचे प्रकार एकूण। असती प्रचलीत साधकांतून। विख्यात मात्र केवळ तीन। कपी, जलेरी, रुंडमुंड।।३९।। यांत अतिशय दुर्गम जलेरी। नाना गुरूंनी जी आचरिली। कडक बंधनें पाळुनी सगळीं। पूर्णतेप्रत नेली तिला।।४०।। जलेरीचे मुख्य असती। नियम, न त्यजावे साधकें निश्चिती। अंगीचे पंचकाश नर्मदा वाहती। नेत्रांपुढें असावी सदा।।४१।। अयाचित वृत्ती ठेवोनी नित्य। भाषणीं नसावें कदा असत्य। अनावश्यक कांहींच साहित्य। नसावें जवळी साधकाच्या।।४२।। तीन दिवसांपेक्षां अधिका। नसावा वास स्थानीं एका। अखेर कढई करूनी देखा। संपवावी प्रदक्षिणा।।४३।। ऐशी कठीण जलेरी यात्रा। नानागुरु अंगीकारी निर्भयता। चित्तीं बाणला निश्चय पुरता। सखा स्वामिराय माझा असें।।४४।। नर्मदामाई प्रचंड गहन। विन्ध्यारण्यांतून निघून। मिळते महासागरा जाऊन। शूलपाणेश्वरापाशीं।।४५।। नाभीस्थान नर्मदेचें। नेमाड





स्थाना म्हणती साचें। पुण्य सिद्ध गंधर्वांचें। विहाराचें तीर्थस्थळ।।४६।। नाभीस्थानापासौनी। आरंभिली यात्रा नानांनीं। प्रदक्षिणा, जवळी घेऊनी। नाममात्र तीन वस्तू।।४७।। एक लोटा पाण्यासाठीं। धोतर एक अंगावरतीं। नांवापुरतें पांघरण्यासी। होतें उपरणें खांद्यावरी।।४८।। सुदृढ बळकट शरीरानें। तेव्हां नाना सत्वबळानें। झळकत्या आत्मप्रभेनें। होतें मुख तेजोमय।।४९।। नर्मदामाईचें तीर गंभीर। ठेवुनी नित्य नजरेसमोर। चालती नाना सत्वर। वाट अपुल्या प्रदक्षिणेची।।५०।। न मागितलें कोणाही भोजन। प्रसंगी घडलें सतत उपोषण। परी पोटार्थ नियम उल्लंघोन। साधिली नाहीं मुळीं यात्रा।।५१।। नर्मदेचें निबिड कान्तार। हिंस्त्र श्वापदांचें जणु माहेर। सूर्यकिरणांसी कुठें न अवसर। शिरायला उरला असे।।५२।। मावळतीला दिवस येता। आपुले नित्य आन्हिक आटोपतां। टेंकवावी काया तत्त्वतां। कांठावरील देवळांत।।५३।। असलें गांव निकट जरी। कांठापासौनी निर्धारीं। न जावें नानांनीं परी। किनारा सोडून नर्मदेचा।।५४।। सदा मुखीं दिगंबराचा। जप चालला वैखरीचा। अवघड कडा प्रदक्षिणेचा। ओलांडूनी नानागुरु।।५५।। श्रोते! या प्रवासांतरीं। कितीक आपदा नानांवरी। घेती कठोर परीक्षाच खरी। सत्त्वगुणांची जणुं गुरुराज।।५६।। एकदां कोटेश्वरासंनिधाना। चालतां विश्रांतीस्तव श्रीगुरुनाना। टेंकले रात्रीस, मार्गक्रमणा। बळ यावें म्हणोनियां।।५७।। तों घाटावरी मठ होता।

भेटून तेथल्या वृद्धमहंता। राहिले नाना तत्त्वता। रात्रभरी त्या ठाई।।५८।। महंत होता शोधांत। पाहोनी एखादा सत्पात्र। शिष्य बैसवूं मठांत। कायम अपुल्या गादीवरी।।५९।। होते त्याचे अनेक शिष्य। परी अवघे पोटभरू सत्य। शिरापुरी झोडीत नित्य। कालक्रमणा करणारे।।६०।। वृद्ध महंतें विचार केला। दिसतो ब्राह्मण कर्मठ भला। तेजस्वी सोशिक करूं याला। मठाधिपती नित्यासाठीं।।६१।। अतिआग्रहें त्यानें दिधला। आसरा नर्मदा-पथिकाला। पूर्ण केलें आतिथ्याला। उणें न कांहीं पडूं दिलें।।६२।। परी भोळ्या सत्यवचनाला। नाना गुरुंना मुळीं न कळला। अंतरींचा भाव निराळा। महंताचा आरंभीं।।६३।। महंतें दिधले मुद्दाम दोन। शिष्य दिमतीस नानालागुन। जाती नाना, तिथें जाऊन। करिती अखंड सोबत ते।।६४।। दोन दिवस झाले परी। महन्त सोडीना नानांस क्षणभरी। वाटे आपत्तीच कठिण खरी। अडथळा परिक्रमेंतला।।६५।। तीन रात्रींहुनी अधिक। नसावा स्थानीं एका साधक। पुसती नाना काय मनोगत। महंतजींना विनयानें।।६६।। पळाले सारे किंतू व्यर्थ। कळला त्यांचे मनींचा हेत। नाना समजले मनांत। विकत घेतसे मजला हा।।६७।। विचार पडला त्यांना गहन। सुटावें कैसें या संकटातुन। राहुकेतुसम शिष्य दोन। सदैव पाठीं लागलेले।।६८।। महंतगादी सांभाळणें। हेंच का होतें माझें जिणें। गुरुवचनाला अंतरणें। या बंधनीं पडतों जरी।।६९।। जय नर्मदे अंबिके। कां कोपसी





माय उपासकें। प्रदक्षिणा अपुरी ठेवुनी एके। ठायीं, बांधतेस दासालागीं।।७०।। अखेर ठरविलें चित्तांत। त्यागावें मायाजाळाप्रत। न सांपडतां पाशांत। योजुनी युक्ति विलक्षण।।७१।। सांगितलें महंता,‘ माझी अनुमति। होईन निःशंक मठाधिपती। परी परिसावी एक विनंती। वचन द्यावें मजलागीं।।७२।। मजला अति आवडीचें। भजन नामसंकीर्तनाचें। गजर करावे मठांत सांचे। रात्रभरी आजदिनीं ’।।७३।। आनंदला महन्त ऐकून। बोलाविली भजनमंडळी दुरुन। घातला सुरेख मंडप पूर्ण। रात्री भजन आरंभिलें ।।७४।। आसपास अनेकपंथी। होती साधूंची समूहवस्ती। मृदंग टाळ खंजिरी खणखणती। घेऊनी आले भजनाला।।७५।। महंतें बैसविलें नानांला। मुद्दाम संनिकट आसना अपुल्या। सांगती अभिमानें सर्वाला। नवे शिष्य अमुचे पहा।।७६।। बहुतेक परिक्रमावासी। अवघे साधू नर्मदावासी। यांची प्रीती बहु भांगेसी। गांजावरी प्रेम भारी।।७७।। रात्रीं जल्लोष चाललेला। भजनें घाट अवघा दुमदुमला। मध्यरात्रीं महंतें सर्वाला। दिली यथेच्छ भांग जाणा।।७८।। कोणी गांजाची चिलीम ओढिती। कोणी आनंदे भांग प्राशिती। भजनीं अवघे धुन्द होती। रात्र होती उलटत।।७९।। नानांनींही खड्या आपुल्या। आवाजांत सुरु केला। घोष हिंदुस्थानी पदांला। देवोनियां प्राधान्य तिथें।।८०।। ते ऐकतां स्फुरण चढलें। इतर भजनी मंडळींही भले। तन्मय होऊनी गाऊं लागले। एकामागून एक जथे।।८१।। सुमारें तीनचा समय

होता। चढली भांग अनेक भक्तां। मिटूं लागले नेत्र तत्त्वतां। चेले भोलेश्वराचे ते।।८२।। कांहीं पेंगती निद्रेनें। कांहीं डोलती भजनानें। कितीकां घेरिलें समाधीनें। दिव्य धुन्दींत गांजाचिया।।८३।। ही साधूनीयां संधि अखेर। पाहिलें नानांनी चौफेर। दावुनी दोन बोटें साचार। खुणेनें वदले महंताला।।८४।। जाऊनि येतों बहिर्दिशेसी। सांगुनी ऐसे मंडपासी। तत्काळ सोडुनी, नर्मदेसी। नाना आले धांवतचि।।८५।। नर्मदेंत मारिली बुडी। उत्तररात्र उरली थोडी। अनन्यपणें आईस जोडी। आपुले लीन करद्वय।।८६।। क्षमा करावी मज माऊले!। असत्य बोलणें मुखीं आलें। निरुपाय पडला नित्यमङ्गले!। होतो अन्यथा व्रतभंग।।८७।। लोकपावने विमलगंगे। क्षमा करीं अपराध माझे अवघे। न्यावी प्रदक्षिणा कळसास वेगें। अनन्य तुझें लेंकरूं मी।।८८।। ऐसें विनवुनी मातेला। निघाले तेथुनी नमस्कार केला। दुरुनी अवघ्या मायेला। भेटून तेथल्या वृद्धमहंता। राहिले नाना तत्त्वता। रात्रभरी त्या मंडपीं बैसल्या महंतासी।।८९।। ओल्या चिंब वस्त्रानिशीं। पळत निघाले कांठासी। येते झाले कोटेश्वरासी। पहांटेच्या समयाला।।९०।। सोडिला सुटकेचा निःश्वास। निघालों आपत्तींतून खास। श्रीगुरुराया दासास। सांभाळावें ऐसें सदा।।९१।। आलीं ऐशीं संकटें अपार। परी त्यांतून झाले पार। धैर्य अंगी, होतां थोर। आशीर्वाद श्रीगुरुंचा।।९२।। शूलपाणेश्वरापाशीं। भयंकर गहन अरण्यासी। चालावें लागे साधकासी।






कंटकमय तो मार्ग असे।।९३।। तेथें स्वतःस पुत्र साचे। म्हणविती नर्मदामाईचे। विचरत असती भिल्लांचे। तांडे वसती करोनियां।।९४।। पांथस्था पाहोनी एकटा। खुशाल मारिती तीरकमठा। लुटोनी त्याला पुरता। करिती छळ अनिवारपणें।।९५।। परी असला जरी साधक शुद्ध। सत्यवचनी कोणी सिद्ध। न आणिती मार्गे बाध। विघ्न कसल्याही प्रकारचें।।९६।। मात्र लपवोनी कांहीं माया। पोटभरु पाहती भुलवाया। पुरतें प्रायश्चित्त तयां। भिल्ल देती लबाडीचें।।९७।। नव्हते नाना दांभिकमती। करोनी त्यांचा सत्कार अति। भिल्ल रानींचे आधार देती। पीठ शिधा पुरवोनियां।।९८।। कधीं मिळे चालतांना। पूर्ण अन्न पांथस्थांना। केव्हां कोरडें कांहीं जाणा। देई कोणी दाता भला।।९९।। परी अन्नासाठीं याचना। मुळीं न कुणा करिती नाना। होऊनि अवचित कुणा प्रेरणा। देती आणुनी खावयासी।।१००।। नर्मदेचें शांत निर्मळ। प्यावे कधीं ओंजळीनें जळ। पोटांतील वैश्वानरजाळ। चालतां शमवावा तयानेंच।।१०१।। रेवामाईचा कधी घाट। कधीं एखादा महंत-मठ। केव्हां पाहोनी वृक्ष दाट। शिणली काया टेकविती।।१०२।। निसर्गरम्य नर्मदामाई। कधीं न व्यर्थ जाऊं देई। सेवा प्रदक्षिणे ठाई। पडूं न देई उणें कधीं।।१०३।। खरोखरीं जागृत वत्सला। परीक्षोनी साधकाला। अंतर्बाह्य राखुनी, संकटाला। निवारिते प्रेमें सदा।।१०४।। निःसीम निष्ठा ठेवोनियां। प्रदक्षिणा करी खचित तया। देते दर्शना प्रगटोनियां।

मानवीरूपें नर्मदामाता।।१०५।। सद्‌गुरुस्वरूप नाना सत्य। होते आचरीत सकळ नित्य। नियम पाळुनी व्रतानिमित्य। पूजिती उपास्य मनोभावें।।१०६।। म्हणोनी नर्मदा जगदंबेनें। राखिलें तयां प्रेमळपणें। अखेर आपुल्या दिव्य दर्शनें। तृप्तमानस केले पूर्ण।।१०७।। तो अद्‌भुत कथा-प्रसाद। उधळीन पुढिलाध्यायीं अगाध। होती जयाच्या श्रवणें शुद्ध। अन्तःकरणें भक्तांची।।१०८।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनानांच्या आशीर्वचनें। मार्तण्ड-महिमा उमलणें। विजयमुखें उत्तरोत्तर ।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते षष्ठोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय ७वा - धनदेश्वर येथील शिवमंदिरात ब्रह्मसमंधाला मुक्ति दिली.



।। धन्य नानांची धीरवृत्ती । तपस्या-सत्त्वें मुक्ति देती ।
ब्रह्मसमंधाला सोडविती । जिवंत नरकयात्रेतुनी ।।

# अथ सप्तमोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ जय जयाजी परब्रह्मा। निर्विकारा निर्गुणा स्वयंप्रभा। अपारा अगोचरा अनाद्यारंभा। शुध्दानंदा स्वयंवेद्या।।१।। अभेदा अद्वैता एकंकारा। इच्छामात्रें सृष्टिपसारा। निर्मिला त्रिगुणमायेनें सारा। महाभूत समूह आधीं।।२।। होतें केवळ सर्वत्र भरुन। एक अपार अमर्याद गहन। शांत निश्चल असतां गगन। वायू निर्मिला नभापोटीं।।३।। वायू अनळ प्रसवला। अनळापासौनी उत्पत्ती जळा। जळा आतौनि पृथ्वी सकळा। आकारली असे देखा।।४।। चौदा भुवनें लीलामात्रें। निपजिलीं अवघीं प्राणिमात्रें। खेळवी तया मायासूत्रें। तूंचि सगुण ईश्वरा।।५।। त्रिगुणातीता जगच्चालका। नटविलें या विश्वनाटका। युगायुगीं तूंच जगन्नायका। अवतारमिषें प्रगटोनियां।।६।। मत्स्य होवोनी नारायणा। तारिले जळांत बुडत्या जना। वराहमूर्ते पृथ्वी गहना। तळीं जातां काढिली त्वां।।७।। कूर्मावतारीं अपुल्या पृष्ठीं। धारण केली निखिल सृष्टी। बळीस धाडुनी पाताळीं शेवटीं। दशांगुळे उरलास वामना तूं।।८।। उग्रसत्वा भार्गवरामा। कीर्ती प्रताप विश्रामा। जामदग्ने तुझा महिमा। बाहुबलें त्वां गाजविला जगीं।।९।। भक्तासाठीं तुम्ही दयाळ। दुष्टांकरितां क्रूर केवळ। स्थळीं जळीं टाळूनि त्रिकाळ। स्तंभीं प्रगटला नृसिंहमूर्ति।।१०।। शांत दांत

चारित्र्यवंता। पराक्रमी धनुर्धारी भगवंता। रघुवीर राम झालां नाथा। सीतापते दाशरथे।।११।। करोनी दुर्जनांचें कंदन। होवोनी तुम्ही नंदनंदन। देवकीगर्भा येऊन। सोडविले सकळ भूभार।।१२।। कर्मकांडाची अखेर होता। बौध्दावतारी शांतिगाथा। गायिली तुवां येणें आतां। कलंकी होवोनी भूमीवर।।१३।। दशावतारी दशरूपका। विराटरूपा प्रलयान्तका। धन्य धन्य भक्तरक्षका। धर्मस्थापनार्थ येतोसी।।१४।। येतां भरूनी धर्मग्लानी। अधर्म दिशेनें अवघी अवनी। धर्मसूर्या तुम्ही प्रगटोनी। तेजाळितां विश्वास या।।१५।। ऐसा तुमचा कीर्तिडिंडिम। ऐकिला म्यां पुराणीं पूर्ण। आतां मात्र साक्ष देऊन। राखावें आपुल्या धर्माला।।१६।। येरवीं आतां विचित्र कठीण। सत्य धर्मासी धिक्कारोन। उन्मादानें अवघे जन। जवळ करिती अनीतीला।।१७।। धांवोनी यावें श्रीहरी। राखावें आपुलें वचन मुरारी। त्राहि भगवन् म्हणते सारी। पोळलेली सृष्टीमाता।।१८।। निर्मळ भक्तीचा चंद्र नाना। पौर्णिमेचा पाहोनी जाणा। येतें भरतें माझ्या मना। उचंबळोनी वैखरी जळ।।१९।। चालली होती प्रदक्षिणा। रेवामाईची शांत गहना। करीत पंथानें नामगायना। लुटीत आनंद नेत्रांचा।।२०।। कधीं जाती श्वापदें पुढून। सळसळती सर्प पाचोळ्यांतून। परी नेती पूर्ण तारोन। दयाळू स्वामी नानांना।।२१।। पथीं एकदां अवचित आलें। विचित्र संकट जीवावरलें। नाना निर्भय म्हणोनी वाचले। आपुल्या सात्त्विक तपोबलें।।२२।। परिक्रमेच्या पंथावरी। सिन्नोर नामक गांव निर्धारी। लागतें आहे जवळी। मंदिर अनसूया मातेश्वरीचें।।२३।। खळाळत्या





जळाभीतरीं। एका सुरेख बेटावरी। उभी अनसूया सती सुंदरी। नाना गेले वंदावया।।२४।। ते पवित्र निर्मळ स्थान। राहिले नाना मुद्दाम म्हणोन। तीन दिवस पुरते जाण। स्थानमहिमा समजोनीयां।।२५।। राहणे घडतां तीन दिसांचें। ‘ श्रीगुरुचरित्र ’ पुण्यग्रंथाचें। करिती पारायण नाना साचें। मनोभावें मंदिरीं त्या।।२६।। करोनी पारायण आपुलें पूर्ण। अनसूयेचें आवडतें अन्न। खिचडीचा नैवेद्य समर्पून। निघती नाना तेथूनीयां।।२७।। सिन्नोर ग्रामीं विख्यात होती। एक राहात दिव्य विभूति। चिदानंद स्वामी अवघे म्हणती। आले तयांच्या दर्शना नाना।।२८।। सायंकाळची होती वेळ। येतां नाना आश्रमाजवळ। स्वत: स्वामी येती बाहेर। दारांत सामोरे नानांनाच।।२९।। स्वामी पूर्ण अंतर्ज्ञानी। नाना येणार ओळखोनी। त्यांच्या स्वागतार्थ येऊनी। बाहेर उभे होते हो।।३०।। आपुलीच होतों पहात वाट। यावें स्वामी आपुले स्वागत। म्हणती चिदानंद नानांप्रत। नेती प्रेमानें आश्रमीं जाणा।।३१।। थोडा काळ आश्रमी नाना। बैसले वंदोनी स्वामीचरणा। दूध थोडें दिधलें त्यांना। स्वामींनीं आग्रहें प्यावयाला।।३२।। मावळता सूर्यनारायण। वदती नाना निरोप घेऊन। जातों आम्ही मुक्कामालागून। रेवातीरीं कुठेंतरी।।३३।। कुठें रात्रीं निजणार आपण। पुसतां स्वामी नानांलागून। घाटावरल्या शिवमंदिरीं राहीन। वदती तयांस तत्काळ हे।।३४।। ऐकतां हंसले स्वामी नुसते। परी न कांहीं नानांस उमगतें। येतां रेवातीरातें।

अंधार दाटला सभोंवतीं।।३५।। घाटावरी होतें प्रशस्त। शिवमंदिर जुनें पुराणे सत्य। नव्हता चहाळ अजिबात। ओसाड भयाण भासतसे।।३६।। संध्या करोनी तीरावरी। गेले नाना आंत मंदिरीं। आसन लाविले ओट्यावरी। जेथून दिसे नर्मदाजळ।।३७।। तेथ अस्तमानीं येतां झाला। मंदिराचा पुजारी भला। तेलवात उजळायाला। शिवासन्निध गाभारीं।।३८।। तो पाहोनियां नानांला। आश्चर्यानें सांगता झाला। जावें आता अंधार झाला। बंद करीन दारें अवघीं।।३९।। नाना वदती आम्ही पांथस्थ। आजची रात्र निजूं येथ। पहांटे आम्हा प्रवासार्थ। जाणें आहे दुसऱ्या स्थळीं।।४०।। ऐकोनी नानावचन, विनविलें। पुजा-यानें स्पष्ट कथिले। 'अहो, येथ राहणें नसे चांगलें। शापित असे स्थान जुनें।।४१।। येथे ब्रह्मसंमंधाचें। असतें रात्री राज्य साचें। सकळ वर्जिती रात्रीचें। राहण्यालागीं मंदिरांत'।।४२।। आजवरी जे जे राहिले। फक्त त्यांचें सामान उरले। विक्राळ समंधानें झपाटलेलें। असे स्थान हे भीतीदाई।।४३।। नाना बोलले शांत वाणीनें। अनेक मागे समंधानें। त्यांत एक मलाही मिळविणें। मी न सोडीन स्थानासी।।४४।। निरुपाय होऊनी पुजारी गेला। बैसले आसनी नाना आपल्या। दैनंदिन स्तोत्रपाठ चालिला। होता मुखीं निरंतर।।४५।। रात्र चालली चढत उलटत। घाट अवघे निर्मनुष्य शांत। होती नर्मदा स्तब्ध वाहत। निजलें सारें गांवही जाणा।।४६।। मध्यरात्रींचा समय होता। नाना आसनीं जागे





तत्त्वतां। तो अंधारी ज्वाळा निघत्या। जाहल्या विचित्र भयानक।।४७।। क्षणांत दिसाव्या लुप्त व्हाव्या। भेसूर ध्वनी ऐकूं यावा। गदगदां सगळा हलोनी जावा। पावलांचा आवाज ऐसा।।४८।। विक्राळ भयंकर उंच विकट। खदखदोनी हास्य करीत। येऊं लागला समंध निकट। नानांचिया दिशेनेंच।।४९।। तें दृष्य होतें भयद विचित्र। असला जरी धैर्यवन्त। पडावा भीतीनें मूर्च्छित। असे अमानुष रूप होतें।।५०।। मारू लागला क्रोधानें। आपुल्या तीक्ष्ण त्रिशूळानें। नानांच्या छातीत खुपसणें। इच्छा होती अनिवार।।५१।। परी शान्त निर्भय सद्‌गुरुनाना। मुखीं दिगम्बराचा जप जाणा। करीत, निश्चळ रोखुनी नयना। पाहत होते लीला त्याच्या।।५२।। पवित्र आसनीं मंत्रावर्तनाचें। कवच होतें भोंवतीं नानांचे। म्हणोनी प्रहार समंधाचे। व्यर्थ ठरले त्यांचेपुढें।।५३।। कठोर केला होता त्राटक। होते नाना अधिकारी साधक। चिडला समंध ओरडोनी देख। भिववूं लागला नानांना।।५४।। वदती नाना गंभीरपणे। "कोण असाल ते समोर येणे। ऐसे आडून प्रहार करणें। बरें नसे तुम्हांलागी"।।५५।। तों विक्राळ वदता झाला। "यावें सोडूनी आसनाला। गिळूनि टाकीन इथेंच तुला"। करकरां दांत खावोनियां।।५६।। न सोडिलें आसन। न हालले मुळींच तेथून। संतप्त झाला समंध पाहोन। देऊं लागला त्रास अति।।५७।। धैर्यदुर्ग मनोभूमीचा। अचल राहिला नानागुरुंचा। अखेर होउनी दीनवाचा। शरण आला समंध तो।।५८।।

अति कृश अस्थिपंजर। घेतला वृध्दाचा क्षीण आकार। ब्रह्मसमंध जोडोनी कर। विनवूं लागला लीनतेनें।।५९।। सहस्त्र वर्षे मला जाहलीं। अनंत पापें मजकरें घडलीं। स्वामी महंता वृत्ती विटली। मुक्त करावें मजलागीं।।६०।। आजवरी जे इथें राहिले। त्या अवघ्यां मी विनविलें। असमर्थ दिसतां प्राण हरिले। क्रूरतेनें कितीकांचे।।६१।। आज दिसलीं मला माऊले। दिव्य तुमची महंता पाऊलें। शापित माझें जिणें वाहिलें। मुक्तिदाते व्हावें अतां।।६२।। ऐकतां त्याची आर्त विनंती। पाझर दयेचा फुटला चित्तीं। नाना आपुली दिव्य विभूति। मंत्रोनी देती तयाचे करीं।।६३।। लावावी ही सर्वांगाला। तत्काळ जावें नर्मदेला। अर्पावें आपुल्या कायेला। मिळेल मुक्ती निश्चयेंसी।।६४।। ऐकोनी हें अमृतवचन। केलें समंधें साष्टांग वंदन। अंगीं विभूति चर्चून। उडी घातिली नर्मदेमध्यें।।६५।। श्रोते! त्या वेळीं भयंकर। वीज कडाडल्यासम विक्राळ। दीर्घ आरोळी देऊनी शरीर। त्यागिलें नर्मदेत समंधानें।।६६।। पहाटें पुजारी मुद्दाम येतां। वदले नाना व्हावें आतां। निर्भय निःशंक ठेवुनी चित्ता। राहावें मंदिरी यापुढें हो।।६७।। धन्य नानांची धीरवृत्ती। तपस्या-सत्त्वें मुक्ति देती। ब्रह्मसमंधाला सोडविती। जिवंत नरकयात्रेंतुनी।।६८।। समूळ गेली भीती जनांची। त्या शिवमंदिरा संबंधीची। जीर्णोद्धार होऊनी लोकांची। भरूं लागलीयात्रा तिथें।।६९।। ऐसी किती संकटें आलीं। परी स्वामीरायांनीं निरसलीं। होती मायेची





छत्र साऊली। नानांचिया माथ्यावरी।।७०।। मार्गी चालतां भयंकर। आपत्ती जैशा आल्या समोर। तैशाच रम्य दैवी सुंदर। पवित्र प्रचीती आल्या कांहीं ।।७१।। एकचि प्रसंग त्यांतील कथितों। खरोखरी महिमा अगाध असतो। सत्पुरुषांना कसें राखितो। अन्तर्बाह्य परमेश्वर।।७२।। शुलपाणेश्वराचें गहन। चालतां लागलें जेव्हां अरण्य। कांहीं न मिळे खावया लागून। नानागुरूंना मार्गान्तरीं।।७३।। नर्मदामाई शीतळ निर्मळ। पिऊनी केवळ तीर्थजळ। नाना झाले अतिव्याकुळ। कोणी दाता भेटे पथीं।।७४।। स्वयें जरी घेती मागून। तरी होता व्रतभंग जाण। झाले ऐसे तीन दिन। कष्टले अति नानागुरु।।७५।। अखेर चालतां होऊनि म्लान। वृक्षातळीं ग्लानी येऊन। निजले रात्र पडली गहन। सुमारें समय अकराचा।।७६।। कोणी नव्हतें आसपास। रान पसरलें चहुंबाजूंस। एकांत होता निर्मनुष्य। गच्च अंधार दाटलेला।।७७।। तेव्हां एक दिव्य स्त्री आली। अलंकारांनीं नटलेली। डोईवरी होती भरली। चरवी लहान दुधाची।।७८।। वदे नानांना येऊनियां। “ पंडितजी आप थक गये लाया। आपके लिये दूध भिजवाया। राजाजीने यहां के”।।७९।। मृदुभाषिणी ती दिव्यांगना। विस्फारित नयनें पाहती नाना। लोटा स्वीकारुनी त्यांनी चरणां। साष्टांग वंदन केलें तिला।।८०।। वंदन करितां लुप्त झाली। निमिषामाजीं देवता भली। अगाध सुंदर रेवा आली। दर्शन द्यावया साधकाला।।८१।। पाहुनी व्याकुळता मनीं द्रवली। दूध

घेऊनियां आली। खरोखरी ही वत्सल माऊली। नाना उमजले मनांतचि।।८२।। धन्य धन्य नर्मदामाई। तुझ्या दर्शनें कृतार्थ आई। नानावृत्ती तल्लीन होई। मुखें चाललें स्तवन तिचें।।८३।। श्लोक।।“ विन्ध्याटवी तूं प्रगटोनि माते। देवाङ्गने दर्शनें मोक्ष देते। सदैव तोषोनि स्वभक्तचित्तें। श्री नर्मदे देवि नमो नमस्ते।।१।। लक्षावधी तारिसी जीवमात्रे। तूं निर्मले नित्य जळीं पवित्रे। नीलाम्बरी रम्यनिसर्गकान्ते। श्री नर्मदे देवि नमो नमस्ते।।२।। मनस्विनी चंचल तीव्रवेगा। जलप्रपातें करि अद्रिभंगा। तूं दुग्धधारे सुविशालमूर्ते। श्री नर्मदे देवि नमो नमस्ते।।३।। तुझ्या तटी वास करोनि शुध्दे। संतुष्टले सिध्दमुनी प्रसादें। सिद्धेश्वरी ईप्सित साधकां दे। श्री नर्मदे देवि नमो नमस्ते।।४।। तुझ्या गभीरे सलिलीं प्रशांत। निःशेष होई कलिदाह शांत। शुभंकरे नित्य अथांगनीरे। श्री नर्मदे देवि नमो नमस्ते।।५।। परिक्रमा आचरिताती भावें। दैवी तुझें रुप तयां दिसावें। साक्षात तूं माउली अन्नपूर्णे। श्री नर्मदे देवि नमो नमस्ते ”।।६।। ऐशी करोनी स्तुती अपार। प्राशिती नाना गोड मधुर। आटीव दूध पीयूष केवळ। होतें अप्रतिम चवीला जें।।८४।। जो लोटा आईनें दिधला। तो सुवर्णाचा होता भला। शांत तृप्त जीव झाला। व्याकुळलेल्या नानागुरूंचा।।८५।। विचार केला त्यांनी चित्तीं। लोटा जरी ठेविन निश्चितीं। कृतज्ञता न होईल ती। जिनें दिला अर्पीन तिला।।८६।।“ हर नर्मदेऽ”घोष केला। लोटा सोन्याचा जळीं सोडिला।







लावोनियां तीर्थ नेत्रांला। मनोभावें श्री नानांनीं।।८७।। दुस-या एका समयीं ऐशी। मायाळूपणें आणून मधूरशी। दिव्य गोड फळांची राशी। दिधली नर्मदें नानांलागीं।।८८।। तंतोतंत हें सत्यवचन। आपुल्या एकनिष्ठ साधकालागुन। कधींही नर्मदा ठेवी न जाण। उपाशी अथवा भुकेलेला।।८९।। अनेक उपासकांना दिधली। नर्मदेनें साक्ष आपुली। संतृप्तता येती झाली। लोचनांना नानांचिया।।९०।। नर्मदेचा महिमा अपार। गाती सर्व मुनीश्वर। स्वर्लोकींची देवता सुंदर। पुण्यगंगा भूतळींची।।९१।। गरुडेश्वरीं जावोनियां। वंदोनी आपुल्या सद्गुरुपायां। आराधिले उपास्या सदया। तीन दिवस पुरतेपणी।।९२।। श्लोक।। “ नर्मदे हर संभूते हरलिंगार्चना तटे। हरलिङ्गार्चिततटे जयाघं नर्मदे हर।। नर्मदेऽऽहर।।” ओवीं।। गात पंथानें ऐसी स्तुती। आजही तिच्या तटीं विहरती। कर्मठ साधक पवित्रमति। येते नर्मदा साहाय्यार्थ।।९३।। नानागुरूंची रेवायात्रा। अद्भुत अवघी सांगूं जातां। आले परतोनी नेमाड-तटा। परिक्रमेचें आरंभस्थान।।९४।। इथें करुनी पूर्ण कढई। संतुष्टिली नर्मदामाई। सांग झाली परिक्रमा ही। दिव्य सद्गुरु नानांची हो।।९५।। आले परतोनि तराण्यासी। पुनः आपुल्या ग्रामासी। दैनंदिन कर्तव्यासी। आचरावया लागले नाना।।९६।। नाना होते शांत मौनी। न कधी वर्णिली अपुली कहाणी। तराण्यासी जनांलागुनी। आनंदे वा अभिमानेंही।।९७।। कोणी विचारितां खोदून। त्यासीच अंतःकरण उकलून। सांगती सकळ विवरून। पाहूनि जिज्ञासा मनांतील।।९८।। वाचाळाशीं व्यर्थ वाद।

न करिती उगा वांझ संवाद। आत्मस्थितीची पुनः दाद। मुळीं न लागूं देती हो।।९९।। अनेक यात्रा केल्या त्यांनीं। कधीं पायी अग्निरथांनी। बद्रिकेश द्वारकापुरीसी जावोनी। जगन्नाथा वंदिलें त्यांनी।।१००।। सांगूं नावें ऐसीं किती। अवघ्यां तीर्थस्थळाप्रती। आहे जाऊनि अगाध रीती। योगक्रियें नानागुरु।।१०१।। प्रत्येक यात्रेमधीं तत्त्वतां। अनेक अनुभव अवघे सांगतां। अपार होईल खचित गाथा। संक्षेपाची क्षमा असो।।१०२।। योगियांच्या कळा अवगत। आहेत साऱ्या नानांप्रत। सूक्ष्मदेही कधीं जातात। यदृच्छेनें कोठेंही।।१०३।। त्यांच्या गतीस तुळणा नसे। मज पामरा सामर्थ्य कैसें। गहन खोल डोहासरिसे। अंतरंगी अगम्य मला।।१०४।। अंगी सांठल्या अलौकिक कळा। ऐसे संत जगीं विरळा। भाग्य आपुलें आपणा दिसला। सद्‌गुरु नाना संतश्रेष्ठ।।१०५।। सदैव लीनतेनें वर्तोनी। त्यांचेजवळी बैसोनी। साधोन घ्यावें निर्वाणी। हेत आपुल्या मानसांतील।।१०६।। नानागुरूंच्या यात्रेमधील। विशेष गोड श्रवणीय सुंदर। गंगोत्री जमनोत्री गिरनार। पर्व अद्‌भुत घडलें असे।।१०७।। त्या पर्वाची कथा कथीन। पुढिलाध्यायीं सावधान। तुम्ही धन्य संतकथा पावन। ऐकतां व्हाल खचितची।।१०८।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनानांच्या आशीर्वचनें। मार्तण्ड-महिमा उमलणें। उत्तरोत्तर विजयमुखें।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते सप्तमोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय ८वा - गंगोत्री यात्रेचे वेळी सिद्धपुरुषाचे दर्शन



।। सत्-चिद् आनंदाचें । स्वरुप समजोनी द्यावें साचें ।
ऐकतां त्या महात्म्यांचे । चित्त फुलले आनंदे ।

# अथ अष्टमोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ जय जय श्रीआत्मारामा। परंज्योति परंधामा। विश्वाचिया विश्रामधामा। तूर्यातीता कैवल्या।।१।। सच्चिदानन्दा श्रीरामा। सद्गुणसुंदरा सीतारामा। गाऊनि तुझ्या पावन नामा। तरले अवघे ऋषीमुनी।।२।। दाशरथे तूं रावणारी। येऊनि कौसल्येच्या उदरीं। बंधमुक्ता केली सारी। त्रासलेली सृष्टिमाता।।३।। क्षमारूपिणी वसुंधरेची। कन्या विदेही जनकाची। साक्षात् शक्ती राघवाची। स्वभावशुध्द सीतामाई।।४।। निमित्त करूनी दशानन। लंकानिवासी रावण। तुम्ही दंडिले दानव पूर्ण। धनुर्धरा तेजरूपा।।५।। नाममात्र अयोध्यावासी। होऊनी विरक्त वनवासी। नित्य भक्तांचे हृदयासी। अससी तूं रघुनाथा।।६।। पूर्ण केले मनोरथां। जे जे तुज ध्याती चित्तां। रावणाची ज्योती मिळतां। झाली अंतीं तुझिया रूपीं।।७।। युगायुगींची वाट पाहत। शिळा अहिल्या होती तिष्ठत। स्पर्शमात्रें तुम्ही मुक्त। केलें राघवा तिलाही।।८।। जनक आणि जननीची। ऋषींची अवघ्या सुरवरांची। सुग्रीव बिभीषण अयोध्याजनांची। संतृप्त केली इच्छा सकळ।।९।। तूं धर्माचें दिव्य निधान। पराक्रमाचें प्रतीक जाण। कर्तव्याचे कठोर वाण। बांधिलें करास रामराया।।१०।। सदा शांत दयामानस। जीवमात्र तुझिया पदास। अनन्य शरण

तुझा ध्यास। सीतापते लागो मज।।११।। बंधमोचका धर्मपालका। भवसागरींच्या सेतुबंधका। सकळाधारा सदैव साधकां। परमानंदी नेतोसी।।१२।। तुझे भक्त थोर थोर। देवा! मी तर क्षुद्र किंकर। अभक्तीनें मलिन अंतर। चंचल अजाण चित्त माझें।।१३।। रघुनंदना आलों तुझिया। लोटांगणें घालित दिव्य पायां। नसे पात्रता माझी व्हाया। दासांचाही दास तुझ्या।।१४।। परी अनाथा दीनबंधो। नुपेक्षावें करुणासिंधो। नाम नित्य हृदयीं नांदो। तुझें राघवा मंगलमय।।१५।। मागील अध्यायीं कथा सुंदर। कथिली नर्मदेची सविस्तर। द्यावें अवधान करीन सादर। आतां नवीन अमृत कथा।।१६।। पायीं हिंडोनी गेले नाना। एकदां बद्रीनारायणा। नव्हतें घेतलें जवळी कुणा। आज्ञा घेऊनी महाराजांची।।१७।। नगाधिराज हिमालयाचे। पायथ्याशीं भव्य साचें। विख्यात प्राचीन श्रीविष्णूंचें। महालय भव्य रम्य।।१८।। हिमवंताची शुभ्र प्रभा। झगमगणारी निसर्गशोभा। उत्तुंग गिरींचा माथा नभा। जाउनी टेकतो सहजचि।।१९।। अपार सिद्ध तेथे महान। गिरी गव्हरीं एकान्ती जाण। कर्पूरगौर हिमकडे गहन। रम्य स्वर्ग तो भूलोकाचा।।२०।। देवदार चिनार तरूंचें बन। निळसर धुकें सर्वत्र पसरुन। शांत शीतल सुगंध भरून। प्रसन्न वायू विहरतसे।।२१।। गंभीर भव्य दृश्य पाहतां। नेत्रांचें पारणें फिटूनी आसमंता। सोडोनी परतावें न वाटे चित्ता। विलोभनीय निसर्गानें।।२२।। नरनारायणांच्या दिव्य गाथा। घडल्या त्या श्रीबद्रिनाथा।





ऋषिवर्यांची जणु पावनता। आली खेळाया वसुंधरेशीं।।२३।। जे जे झाले वैराग्यभरित। कोणताही असो पंथ। रमलें पाहून त्यांचें चित्त। हिमवंताच्या कुशीमार्जी।।२४।। चारीधाम यात्रेमधील। आनंदधाम हें नित्यमंगल। पुण्यश्रिया ज्याची असेल। घडतें त्यासी आजही।।२५।। हें तपोनिधींचें निवासस्थान। अखंड समाधींत कितेक मुनीजन। ओंकाराच्या संनिधान। सदैव असती डुंबलेले।।२६।। बद्रीनाथा वंदोनिया। सांग पूजाविधी करोनियां। नाना निघती जावया। मानससरोवराकडे।।२७।। तों तयांना कोणी वदले। सिद्ध महात्मे असती रमले। अनेक येथे दिसती भले। भाग्यवंता दर्शन देती।।२८।। बर्फाच्छादित वाट पहाडी। क्रमीत नाना असतां दरडी। टाळूनी जातां पुढेंथोडीं। पाऊलें पडलीं दृष्टीस।।२९।। निर्भयतेनें एकटे नाना। जाऊं लागले पाहात खुणा। अकस्मात तेथें त्यांना। गुंफा दिसली मनोहर।।३०।। धीटपणें पुढें गेले। आंत डोकावुनी पाहूं लागले। तेथें महात्मा ध्यानस्थ बैसले। पाहिले त्यांनीं तटस्थपणें।।३१।। शांत दान्त मुद्रा होती। टपोरे होते डोळे अति। छातीवरी रुळत होती। शुभ्र दाढी मनोहर।।३२।। जावोनियां आसनानिकट। साष्टांग वंदन करोनी नीट। रोखुनी पाहती महात्मा चकित। कैसा पोंचला पथिक इथें।।३३।। गुंफा निवांत असून निर्जन। मनुष्यवस्ती दूर जाण। सद्गुरुबळ असल्यावांचून। न दिसती महात्मे लोकोत्तर।।३४।। नम्रतेनें पुढें ठेवून। बदाम दाणे अपुल्या जवळून। पाहती नाना न्याहाळून।

मुद्रेवरील भाव त्यांच्या।।३५।।‘ बच्चा! तुम यहां कहां आगये। चट्टी का रस्ता भूल गये। आम्हांस नारायण देतो स्वयें। परत न्यावें ठेविलेलें ’।।३६।। वदे महात्मा आज्ञापोनी। जावें आतां मुक्कामालागुनी। इथें विक्राळ श्वापदें वनीं। विहरताती उन्मुक्तपणें।।३७।। मानुनी दर्शनेंच धन्यता। निघाले नाना तिथून तत्त्वतां। पुनर्वंदना करोनी महंता। संध्यासमय होता तेव्हां।।३८।। पुढें केदारनाथाचिये मंदिरीं। सांब शिवाचे दर्शनोत्तरीं। इच्छा उपजली अंतरीं। जावें गंगोत्री वंदिण्यास।।३९।। तो पथ होता दुर्गम अति। कडे कपारी होत्या भोंवती। मनुष्यवस्ती विरळ होती। मध्यें अरण्य दुर्गम लागे।।४०।। एके ठायीं दों बाजूंना। मार्ग चालतां दिसले त्यांना। गंगोत्रीपथ सोडुनी नाना। लागले चुकीच्या पंथासी।।४१।। अवघा दिवस चालले पण। कुठेंही यात्रेकरू न दिसे जाण। न भेटती पंथांतून। पुसूं जरी कोणालागीं।।४२।। उलट भयंकर उतार मार्ग। कधीं खडकाळ कड्यांची रांग। खालीं पाहतां रुंद भेग। दिसूं लागे कंदरीसी ।।४३।। भलत्याच वाटे चाललों आपण। कळलें पुरतें निरुपाय होऊन। दिसेल पुढें कोणी अजून। दावील मार्ग चुकलेला।।४४।। चालूनि नाना आशेनें। थकले अखेर तहानेनें। कोरडला कंठ, भुकेनें। व्याकुळ झाले अनिवार।।४५।। दिवस अवघा उलटोनी गेला। प्राण कंठापाशी आला। ऐन संध्यासमयाला। दिसली अवचित दूर गुंफा।।४६।। मोहरून आनंदें मनांत।





गेले नाना धडपडत। गुंफेच्या मुखाशी पोंचत। नजर टाकली आंत त्यांनीं।।४७।। तों मिटले मात्र दोन्ही नयन। ओढवलें आतां खास मरण। दोन भयंकर व्याघ्र बसून। होते गुंफा-मुखांतचि।।४८।। आठविले मग सद्‌गुरुपाय। निर्वाणीचा आला समय। भयाण एकांतीं भक्ष्यसोय। होऊं वाघांची आज खचित।।४९।। परी धीर करोनी पाहती। तों आंत कुणी मनुष्याकृती। पालवली मनांत आशा येती। शब्द तात्काळ कानांवरी।।५०।।‘ कौन मानव यहां तक पहुंचा। सच्चा गुरु का तुम हो बच्चा। आवो ’ म्हणूनी आज्ञा होतां। नाना पाहती व्याघ्रांकडे।।५१।। हुकूम येतांक्षणीं आंतुनी। दूर झाले व्याघ्र दोन्ही। जैसे पाळीव श्वान वचनीं। राहती अपुल्या स्वामीच्याच।।५२।। आंत शिरतां दृष्टीस पडलें। भव्य विलक्षण रूप आगळें। व्याघ्रांसवें बैसलेले। होती धुनी पेटलेली।।५३।। पिंगट शिरींचा जटाभार। होता लोळत भूमीवर। भुंवया वाढोनी छातीवर। येऊनी विस्तारल्या होत्या हो।।५४।। घालोनियां सिध्दासन। अरुंद त्या गुंफेंत गहन। नव्हतें त्रिशूळ खडावावांचून। साहित्य तेथें कसलेहीं।।५५।। बाहेर आला झांकोळून। बुडतां दिवस अवघे अंधारून। गुंफेमध्ये होता भरून। प्रकाश थोडा धुनींतला।।५६।। पाहावया नानांकडे। उचलून पापण्या पाठीकडे। टाकिल्या रोखुनी रोकडें। उग्र तेज नेत्रांचें।।५७।। कोण तूं इकडे कैसा चुकला। संस्कृतामध्यें पुसती नानांला। दाविती कंठशोष झाला। पाणी द्यावें

सत्वर।।५८।। शब्द फुटेना वाचेसी। पाहुनी वदतो महात्मा त्यांसी। प्यावें यथेच्छ गंगामाईसी। असे निकटचि आपुल्या जी।।५९।। असें म्हणोनी दक्षिण करीं। भिंतीतूनी काढिला बाहेरी। पाषाणतुकडा लहान निर्धारीं। सहजलीलें महात्म्यांनीं ।।६०।। तों अद्‌भुत घडलें सत्य। शुभ्र धारा निघाली संतत। येऊं लागलें पाणी तेथ। नाना झाले स्तिमितची।।६१।। करूनीयां हातांची ओंजळ। शांत मधुर तें पिऊनी जळ। शमविती नाना तृषा सकळ। आली किंचित हुषारी त्यां।।६२।। वंदिले महात्म्यांचे चरण। कथिलें चुकलों वाट पूर्ण। गंगोत्रीसी मजलागून। जाणें होतें मुनिश्रेष्ठ।।६३।। भुकेनें तहानेनें व्याकुळलों। अवघा दिवस चालूनि थकलों। दर्शनें आपुल्या धन्य झालों। दावा वाट गंगोत्रीची।।६४।। ऐकोनी हंसले गंभीरपणें। महात्मा म्हणती आतां थांबणें। दूर बहुत गंगोत्री, दिसणें। कठीण मार्गही अंधारीं या।।६५।। घेऊन येतों खावयासी। बैसावें इथेंच म्हणोनी त्वरेंसी। घालोनी लांब त्या खडावांसी। निघती बाहेर जावयाला।।६६।। व्याघ्रांना त्या बजाविलें। अतिथी आज असती आले। रक्षण करावे त्यांचें भलें। गेले निघून महात्मा ते ।।६७।। आश्चर्ये दिङ्‌मूढ होऊनी नाना। पाहती हा प्रकार जाणा। तों शीघ्रचि आले परतोनी पुनः। महात्मा सिध्द आसनावरी।।६८।। होता सवें एक आणिला। कंद काढोनी कपारींतला। धुनीत विस्तवाखालीं झांकिला। राख पसरोनी त्यावर।।६९।।





श्रोते! नंतर बहुत झाल्या। सिध्दांनीं गोष्टी अनेक कथिल्या। अद्‌भुत आपुल्या चरित्राला। कथन केलें नानांसीं।।७०।। होते महात्मा द्वापारयुगींचे। महाभारत युध्दावेळचे। सैनिक एक कुरुक्षेत्रींचे। श्रीकृष्णाला पाहिलेले।।७१।। कृष्णाज्ञेनें वाट धरिली। हिमालयाची गहन पाहिली। गुंफा निर्मनुष्य अरण्यस्थळीं। येऊनि बैसले तपासी।।७२।। किती हजार वर्षे झालीं। नसे ज्ञान विश्वाचें मुळीं। कुठें चाले काय बाहेरी। कांही न ठाउक होते तयां।।७३।। दिव्य मंत्र श्रीकृष्णानें। देता कृतार्थ मनानें। समाधींत शांतपणें। विचरत होते काळ अवघा।।७४।। जितेंद्रिय त्या महात्म्यांनीं। दोन वाघ मुद्दाम पाळुनी। चुकूनही तेथे मानव कोणी। पोचूं नये म्हणोनियां।।७५।। होतें तुमचें उग्र गुरुबळ। म्हणूनी वांचलां तुम्ही केवळ। एरवीं हे व्याघ्रची काळ। भक्षिती तुम्हांस खचितची।।७६।। महात्मा पुसती नानागुरूंना। काय इच्छा तुमच्या मना। निःशंक होउनी सिध्दांना। वदती नाना नम्रतेनें।।७७।। सत्-चिद्-आनंदाचें। स्वरुप समजोनी द्यावें साचें। ऐकतां त्या महात्म्यांचें। चित्त फुलले आनंदें।।७८।। मग पुढें त्यांनी अस्खलित। प्रवाहासम शुद्ध संस्कृतांत। उपनिषदांचें केवळ मथित। ऐसें प्रवचन आरंभिलें।।७९। निवांत होती रात्र निर्जनी। दूर अज्ञात जगापासौनी। विचित्र अद्‌भुत गुंफेतूनी। स्त्रवत होती वाग्-गंगा।।८०।। केवळ नाना एकटे श्रोते। जोडूनियां करद्वयातें। आणोनी श्रवणीं अवघ्या मनातें। होते ऐकत लावुनी लय।।८१।। उकलोनि शब्दांचें

अभ्यंतर। दाविती पुराणप्रसिध्द अर्थ सखोल। अनुभूतींचें प्रचंड बळ। वाणीस होतें जयांचिया।।८२।। तो प्रसंग कथितांना। आजही सांगती सद्‌गुरु नाना। पुढें ऐकिलें कितीक प्रवचना। परी सर नाहीं त्या श्रवणाची।।८३।। तल्लीन होऊनियां वृत्ति। नाना आत्मानंदीं डोलती। साक्षात् जणुं वेदमूर्ती। सांगतो रहस्य वेदांचें।।८४।। उत्तररात्र संपते जैसी। तेव्हां थांबविलें प्रवचनासी। पूर्ण रात्र गेली कैसी। अवर्णनीय केवळ ती।।८५।। धन्य धन्य उद्‌गारती। नाना आनंदें माथा ठेविती। त्या दिव्य पाउलांवरतीं। सद्‌गदित होऊनियां।।८६।। तृप्त झाली माझी वृत्ती। अगाध आपुली सरस्वती। बिंबली वाणी हृदयप्रांतीं। मुनीश्वरा सदासाठीं।।८७।। सद्‌भाग्य माझे चुकलों पंथ। पडली आपुले दृष्टीप्रत। चरण दिव्य, हें ज्ञानामृत। दिलें आपण मजलागीं।।८८।। सिद्ध नानांसी हंसत वदती। उज्ज्वल तुमचें भाग्य निश्चिती। श्रीगुरुस्वामी मुद्दाम आणिती। आज इकडे भुलवोनियां।।८९।। उरला होता रामप्रहर। थोडाचि तेव्हां काढिती सत्वर। धुनींतुनी तो कंद बाहेर। शिजूनी फुलला होता भला।।९०।। एका वृक्षाच्या पानांवरी। महंत कंद चोळिती करीं। तों आंतील सुंदर कळया बाहेरी। सांडूं लागल्या रवेदार।।९१।। शुभ्र होत्या लुसलुशीत। गळून पडतां पानांत। विचार करिती नाना मनांत। अर्धे देतील आपणासी।।९२।। परी महंतें एकचि घांस। दिधला नानांच्या करास। वदले, बेटा पुरे इतुकाच। खुराक आठ दिसांचा हा।।९३।।





आश्चर्य वाटलें नानांसी। पुढें आलें प्रत्ययासी। खरोखरी आठ दिन पुरतें त्यांसीं। मुळीं न भूक लागली हो।।९४।। होत्या मधुर कंदकळया। निमाल्या अवघ्या भुकेच्या कळा। प्राशुनी तेथल्या गंगाजळा। तृप्त जाहलें मानस।।९५।। कोठें जाल आतां नानांसी। पुसते झाले सिद्धराशी। जाईन आतां गंगोत्रीसी। दिवस निघतां स्वामिराया।।९६।। तों हंसून वदती सिद्ध। कुठें राहिली गंगोत्री प्रसिध्द। चुकून तुम्ही आले विरुध्द। मार्ग पकडोनी आडवाटे।।९७।। बरें नेऊं तुम्हां गंगोत्रीसी। परी निःशंक होऊनि मानसीं। धरावें माझे दोन्ही चरणांसी। घट्ट नेत्र मिटोनियां।।९८।। उघडाल जरी नेत्र किंचित। पडाल कोठें गिरि कंदरांत। पडतां माझीं अक्षरें कानांत। उघडावे नेत्र तेथेंचि।।९९।। ऐकोनी हें नानागुरूंना। भरतें आले अंतःकरणा। पुनः कधीं या दिव्य पदांना। दैवदुर्लभ पाहीन मी।।१००।। म्हणोनी अखेरचे दंडवत। साष्टांग घातले सिद्धांस। धरिले भावें मिटोनी नयनांस। चरणकमळ मुनिवरांचे।।१०१।। क्षण कांहीं जाती न जाती। तोंच आले कानांवरती। शब्द ‘ उघडीं नेत्र ’ म्हणती। अंतर्धान सिद्ध तिथें।।१०२।। त्या वेगासी कसली तुळणा। क्षणांत आणोनी नानागुरूंना। सोडिलें घाटावरी जाणा। पवित्र निर्मळ गंगोत्रीच्या।।१०३।। पहांट उजाडत होती नुकती। लोक गंगेवर स्नाना येती। नाना बैसले पायरीवरतीं। होते कर ठेवुनियां।।१०४।। हें स्वप्न कीं सत्य घडलें। नानागुरु तात्काळ उठले। सद्‌गुरूंसी आळवूं

लागले। अद्‌भुत ऐशा कृपेमुळें।।१०५।। पुढें यात्रा करूनी सगळी। गंगोत्री पवित्र पाहिली। ऐशी दिव्य प्रचीती आली। खचित श्रेष्ठ नानागुरु।।१०६।। यापुढील कथा पाहीं। सांगेन मनोहर पुढीलाध्यायीं। अवधान द्यावें लवलाहीं। श्रोते, सादर चित्तें तुम्ही।।१०७।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनानांच्या आशीर्वचनें। मार्तण्ड-महिमा उमलणें। उत्तरोत्तर विजयमुखें।।१०८।।

।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते अष्टमोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय ९वा - गिरनार येथे अश्वत्थाम्याचे दर्शन



।। नांव सांगूनी अश्वत्थामा । गेला सत्वर निघोनी जाणा ।
धन्य मानिती स्वतःस नाना । घडले दर्शन अद्‌भुत कसें ।।

# अथ नवमोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ जयोऽस्तु ते सद्‌गुरुराया। हरोनियां अज्ञानमाया। प्रकाशाची चित्सूर्या। सर्वत्र अखंड प्रभा तुझी।।१।। भासते भवरूप निरसोनी। ब्रह्मानंदकंद उमलोनी। दिसावी नित्यता निर्गुणी। अपरंपार अगाधमयी।।२।। भक्ती ज्ञान योग गाथा। कांहीं न ठाऊक मजला नाथा। ठेवुनियां चरणीं माथा। विश्वासलों मी अनिवार।।३।। चंचलता हाची मनोधर्म। पुरता पदरीं त्वां बांधोन। धाडिलें येथें मजलागोन। जगावया जगामध्यें।।४।। त्या अचपळ मनालागीं। असूं द्यावी तुझी सलगी। तुझ्या चरणांचे उत्संगीं। ठेवावें या मायेनें।।५।। इतुकें जरी दिलें मज। अपार ऋणी मी गुरुराज। कृतार्थ होउनी जगीं आज। सदा आठवीन तुजलागीं।।६।।काया वाचा आणि मनाची। ज्ञात अज्ञात हेतूंची। सफळ विफळ मनोरथांची। वारी सरावी पायीं तुझ्या।।७।। पाय तुझे माझी पंढरी। मानसदिंडी चालली वारी। संकल्प विकल्प वारकरी। डोलती गुरुभजनरंगीं।।८।। चरणधुळी बुक्का भाळीं। लावितां सरते भ्रांति सगळी। भवमायेची विरते पुतळी। न्हातां चरण भीमाजळीं।।९।। हृदयी लेवोनी चरणकमळ। परब्रह्मभेटी आनंद अविकळ। मोक्षधामींचें चित्सुख सोज्वळ। साकारतें सगुणांतुनी।।१०।। कृपाळु वो श्रीगुरुमाये। करुणामय मूर्तिमन्त दये। केधवां घेशिल कडिये।

अजाण वत्सा तुझिया मज।।११।। गुरुकृपेची जया जीवनीं। पहांट येते मंगल फुलोनी। तयास श्रीहरी होवोनी। अंतर्बाह्य राखे सदा।।१२।। साक्ष याची सद्‌गुरु नाना। नको कोठें दूर पहा ना। उघडोनी सद्‌भावें अपुल्या लोचनां। पाहतां दिसेल साक्षातचि।।१३।। मागील अध्यायीं जें कथिलें। नाना एकदां एकलेचि निघाले। सौराष्ट्र प्रांतीं फिरत आले। गिरनार यात्रेमाझारीं।।१४।। गिरनार पर्वत गहन रम्य। जिथें प्रत्यक्ष श्रीदत्तचरण। अजून लागती रोज पावन। महान् सिद्ध क्षेत्र ऐसें।।१५।। जुनागड संस्थानीं पर्वत। गिरनार हा विख्यात। किर्र अरण्य दुर्गम दाट। माथ्यावरी जाण्यास्तव।।१६।। सात्त्विक रम्य शांत निर्जन। व्याघ्रादिकांचें लाडकें स्थान। नाथपंथींचे साधक जाऊन। मुद्दाम निवास करिती तिथें।।१७।। श्रीदत्तांचे पहाया चरण। अवघे भक्त जाती चढोन। उपासना आपली वाहून। आनंदें परतोनी येती घरां।।१८।। नानांनीही तेथ जाऊन। हृदयीं दत्तरूप सांठवून। घेतलें सांग दत्तदर्शन। परी न तृप्तलें मानस।।१९।। गिरनार गिरीचे शेजारील। कठीण दुर्गम एक स्थळ। ठाऊक होतें तयांना केवळ। न जाली कोणी सहसा जिथें।।२०।। नवनाथांची अवघी साधना। घडली जिथें पूर्ण गहना। त्या अगाध रहस्यस्थाना। पाहणें होतें नानांसी।।२१।। विचारावी जरी वाट। पायथ्याचे निवासी मुळीं न जाणत। सांगती न कोणी कधीं जात। अवघड कडे चढोनियां।।२२।। परी ऐकिलें आम्हीही खास। वरतीं





नवनाथांचा असे निवास। कधीं कोणी सिद्ध प्रयास। करिती तिथें जाण्यास्तव।।२३।। आम्ही न गेलों आजवरी। दुर्गम आहे मार्ग भीतरीं। प्राणी भयंकर असती निर्धारीं। सहजलीलें विचरत तिथें।।२४।। ऐकोनी त्यांचे सगळे बोल। न ढळलें अंतरीचें निश्चयबळ। चढूं लागले कडा सबळ। नाना, गुरूंसी आठवोनी।।२५।। विचित्र वांकडी वाट शोधित। नाना निघाले चढत चढत। वृक्ष पुराणे वाढले अमित। भोंवती झाडी दाटलेली।।२६।। कुठें राहिला दूर माथा। पंथ न दिसे मधेंच चालतां। कडकडीत आला तापतां। माथ्यावरी नारायण।।२७।। गवसलें ना एकही स्थान। अर्धा डोंगर झाला चढून। आटलें पायींचें बळ चालोन। नुरलें बळ परतावया।।२८।। एका दरडीवरी अखेर। टेकवलें श्रमलेलें शरीर। निरुपाय होऊनी सभोंवार। पाहूं लागले नानागुरु।।२९।। कोणीतरी मनुष्यमात्र। दिसेल म्हणुनी धुंडिती नेत्र। एकान्त भयाण सर्वत्र। होता भरूनी अवघा तिथें।।३०।। उरांत होती इच्छा आर्त। नवनाथांची पाहीन मूर्त। गेला दिवस उलटोनी येथ। तरी न परतेन दर्शनाविना।।३१।। सद्‌गुरुमूर्ति मनीं चिंतिली। पायीं बळ द्यावें माऊली। ठाकुरकी माझी सारी। असे तुमच्या कृपेवरी।।३२।। तों विचित्र घडलें अघटित। आली तेथें एक अवचित। मूर्ती नानांजवळी अवधूत। शुभ्र वेष घातलेली।।३३।। होती एक बंडी अंगीं। कमरेस शुभ्र होती लुंगी। हातीं छडी घेवोनी वेगीं। आली धावुनी नानांवरी।।३४।।

संतापूनी शिव्या घाली। छडीनें फटके मारूं लागली। कशास आलां येथवरी। नव्हतें जरी पायीं बळ।।३५।। शांत नाना जोडूनी कर। खाती न कांहीं बोलतां मार। विनविती दावावी सत्वर। वाट वरतीं जाण्यास्तव।।३६।। यथेच्छ आधीं दिल्या शिव्या। पुनः पुन्हा परतोनी जाया। परी एकचि हट्ट धरोनिया। नाना बैसती तेथेंचि।।३७।। मारणें योग्य वाटे जरी। खुशाल मग मजला मारीं। परी दर्शनाविण माघारी। मुळीं न परतेन इथून मी।।३८।। कांहीं समय जातां, भर। संतापाचा ओसरला अखेर। वदती अवधूत धरावे सत्वर। चरण माझे दोन्ही सवें।।३९।। घट्ट धरितां चरण दोन्हीं। नेलें अवधूतें क्षणांत उचलोनी। ठेविलें माथ्यावरी आणोनि। धुनीपाशीं नानांस।।४०।। आणि अवधूतमूर्ती लोपली। निमिषांमाजी गुप्त झाली। नानागुरूंनी तेथ देखिली। रम्य मच्छिंद्रांची धुनी।।४१।। निवांत दाटलेली शांतता। अगम्य दुर्घट गिरीचा माथा। मंदपणें धुनी तत्त्वतां। होती प्रज्वलित तशा स्थलीं।।४२।। निगूढ पुरातन सिद्धवास। येत होती त्याची साक्ष। एकाग्र होऊनी मानस। पाहती नाथश्रेष्ठ नाना।।४३।। धुनींतली घेऊनि विभूती। लाविली आपुल्या ललाटीं। तेथे नानागुरूंना दिसती। पवित्र आसनें नवनाथांची।।४४।। कृतार्थ होउनी श्रद्धेनें। वंदिली नवनाथांची स्थानें। भावफुलांचें चढवुनी लेणे। रम्य स्मृतीस नाथांच्या।।४५।। पहा श्रीगुरूंची कैसी रीत। अद्‌भुत केवळ अकल्पित। हट्ट अवघे पुरवीत। इच्छिल्या स्थळीं नेती






ते।।४६।। चित्तास आली दिव्य शांती। निमिषांत तृप्तल्या साऱ्या वृत्ती। तिथें घडलें ऐका निश्चिती। नवल एक कथितो तुम्हां।।४७।। परतावया जैसे नाना। विचार करूं लागती जाणा। उंच धिप्पाड पुरुष पुराणा। अवचित हिंडतां दिसे तयां।।४८।। तेल अथवा लोणी मजला। द्याल का हो पांथस्थाला। म्हणूनी याचना नानांला। करूं लागला पुरुष तो।।४९।। अश्वत्थामा शापित जीवन। घालवितो निर्जनी हिंडून। होतें ठाउक नानांलागून। म्हणून पुसती मुद्दाम तयां।।५०।। लोणी खडीसाखर। होती थोडी नानांबरोबर। ती अर्पूनियां साचार। पाहती साश्चर्ये।।५१।। नांव सांगूनी अश्वत्थामा। गेला सत्वर निघोनी जाणा। धन्य मानिती स्वतःस नाना। घडलें दर्शन अद्‌भुत कसें।।५२।। उतरती वाट शोधित असतां। पुन्हा अवधूतमूर्ति तत्त्वतां। येऊनी, सोडिले योग्य पंथा। पायथ्याशीं पूर्ववत।।५३।। याचि यात्रेमाझारीं। परतीच्या मार्गावरी। असतां अनसूया मातेश्वरी। आश्रमीं नाना निघताती।।५४।। मध्येंच एक सौभाग्यशालिनी। सुवासिनी सती समोर येऊनी। भेटे वदे निक्षूनी। आश्रमीं न यावें मुक्कामास।।५५।। केवळ दर्शन करणें जरी। चलावें दाखवितें आश्रम तरी। नाना चालती बरोबरी। तया अनोळखी स्त्रियेसवें।।५६।। तों श्रोते, पहा अद्‌भुत। आश्रमीं येतांच ती योगिनी सत्य। अंबा अनसूया माता साक्षात। प्रगट झाली नानांपुढें।।५७।। पूर्वी सिन्नोर ग्रामाजवळी। नानांनीं भक्तीनें तुष्टविली। अपुल्या हृदयीं नित्य

धरिली। जिर्चीं दत्तबाळकें तीन।।५८।। ती अत्रिमुनींची दिव्य सती। जिनें थांबविलें चराचर निश्चितीं। तपःप्रभावें सहजरीती।काळालाही लाजविलें।।५९।। ती अखिल विश्वाची माय। कारुण्याची मंगल सोय। नाना घट्ट धरिती पाय। अनन्य चित्तें उचंबळोनी।।६०।। वत्सा जयजयकार तुझा। सदा होऊं दे भक्तराजा। जावें आपुल्या पुढल्या काजा। सफल होवो उपासना।।६१।। दिधला थोर आशीर्वाद। पुन्हां सांठवीत पुण्यप्रद। गंहिवरती नाना, संवाद। घडतां आजही येविषयीं।।६२।। श्रीमत्स्वामी वासुदेवानंद। नानांचा सद्गुरुसोयरा आनंद। पूर्वी बालपणीं अनुग्रहें शुभद। उजळिली पहांट जयांनी।।६३।। त्या सद्गुरूंचें होय दर्शन। अनुग्रहसमयीं नानांलागून। तो कथाभाग तुम्हां कथन। केला पूर्वीच श्रोते हो।।६४।। तरी त्या प्रसंगानंतर। जरी जाहल्या यात्रा सकळ। तरी स्वामिचरण-कमळ। वंदिणें गेलें राहूनची।।६५।। ही खंत वाटे नानांना। परी आज्ञेवाचुनी पान हालेना। इकडे स्वामींनी वैकुंठीं प्रयाणा। केलें समाधि घेऊनीयां।।६६।। ते वेळींही नानांचे। दर्शन-मनोरथांचे। मांडे विरले मनींच साचे। खिन्न होती नानागुरु।।६७।। स्वामी समाधिस्थ होउनी जरी। गेली कांहीं वर्षे भीतरीं। परी न योग आला समोरी। नाना होती हताश बहु।।६८।। परी एकदां आज्ञा होतां। गुरुपुण्यतिथी साधण्या तत्त्वतां। गरुडेश्वरीं निघाले नाना स्वतः। एकटेच आले इंदूरासी।।६९।। तिथें उतरले गुरुबंधुंकडे। तांबेस्वामी विख्यात गाढे।





स्वामी वासुदेवांचे तेही वेडे। श्रेष्ठ कर्मठ शिष्यवर।।७०।। नानांचें स्वागत यथोचित। केलें, त्यांनी प्रसन्नचित्त। होउनी मांडिलें भजन अमित। दोघांनीही रंगोनियां।।७१।। त्या भजनरंगी दंग होतां। विसरले वेळेचें भान सर्वथा। उशीर झाला चुकली येतां। गाडी इंदूर स्थानकावरी।।७२।। रतलाम स्थानकावरी नाना। इंदूराहुनी आले पहा ना। परी गेली होती तिथेंही जाणा। गाडी तेधवां मुंबईची।।७३।। फ्रंटियर मेल रात्रीची। होती केवळ उरली साची। पोंचणें जरी गरुडेश्वरासी। वेळेवरी तिथीस त्या।।७४।। केला निश्चय नानांनीं। मुखीं दत्तनाम स्मरोनी। जाणें आता याच रीतीनीं। कसेंही श्रीगुरुचरणांप्रत।।७५।। येतां मेल फलाटावरी। तोबा गर्दी आंत बाहेरी। कुठें शिरावें यत्किंचित् तरी। मार्ग दिसेना नानांना।।७६।। पुनः, न थांबतां बहुत वेळ। दिली निघायाची शिट्टी सकळ। धांवती शिरावया करूनी बळ। प्रवासी अवघे बाहेरचे।।७७।। निघाली गाडी हळूहळू पुढोनी। स्वस्थ होते तोंवरी पाहुनी। अवघी गडबड मध्यें राहोनी। नाना होते निरखीत।।७८।। तों समोर आला डबा ऐका। प्रथम श्रेणीचा होता देखा। चटकन् शिरले पाहून बांका। प्रसंग ओळखून नानागुरु।।७९।। आंत कोप-यांत येउनियां। अंतरीं सद्गुरुस स्मरोनियां। नाना उभे होते तया। श्रीमंत डब्यामाझारी हो।।८०।। होता श्रीमान मंडळींचा। आंत जणुं मेळाच साचा। कल्पनाच करिता भीतीचा। येतो कांटा अंगावरी।।८१।। श्रोते! तिकीटावांचून।

प्रथम श्रेणीमधून। चालले होते नाना होऊन। अनन्य श्रीगुरुचरणांसी।।८२।। होती वेळ ती रात्रीची। डब्यांत अवघे पहुडण्याची। तयारीत असतां अकस्मातचि। घडे तेथें अकल्पित पहा।।८३।। अनोळखी पुरता देख। एक मद्रासी तिथें पथिक। वर गादीवरी निजला क्षणैक। गेली दृष्टी नानांकडे।।८४।। काय उदेलें त्याचे मनीं। तोच जाणे अथवा दत्तप्रभूंनी। अकस्मात स्फूर्ति तयालागुनी। दिली तयास कांहींतरी।।८५।। तो उठूनी आला खालतीं। विनविलें कर जोडूनी नानांप्रती। तुटक्या हिंदी वाणींत म्हणती। चलावें माझ्या जागेवरी।।८६।। महदाश्चर्य वाटलें नानांना। वाटे अविश्वास कळेना। अघटित अवघें घडतांना। परी मानिली सद्‌गुरुदया।।८७।। बैसले तयाच्या शेजारीं। जपमाळ अखंड चालिली अंतरीं। काय काय पुढें श्रीहरी। होणे आहे न कळे कांहीं।।८८।। एक एक मागें टाकून। स्थानकें, चाललीं भरधांव धावून। गाडी, बडोद्यालागून। येऊं लागली रात्रीं पहा।।८९।। मध्येंच एकदां तपासनीस। तिकिटांचा शिरला डब्यांत खास। पुसतां नानांस काढिला पास। सत्वर आपुला त्या प्रवाशानें।।९०।। तो होता रेल्वेंतला। अधिकारी कोणी दक्षिणेंतला। त्यास पास सगळीक ला। होता अवघ्या कुटुंबाचा।।९१।। हे तीर्थरूप माझे शेजारीं। त्यानें कथिलें दर्शवुनी अंगुली। नानांकडे पाहून पुढारी। गेला तिकीट-तपासनीस।।९२।। श्रोते! पहा अगाध माया। सद्‌गुरूंची केवढी दया। आपुल्या वत्सासी सांभाळाया। तत्पर असतो





देव किती!।।९३।। पुढें येतां बडोदा स्थान। नानांसमवेत खाली उतरून। त्या मद्रासी पथिकानें सांगून। इंग्रजीत कांहीं अधिका-याला।।९४।। नानांसी सुखरुप काढिलें बाहेर। अडविलें ना द्वारावर। करूनियां नमस्कार। पुनः बैसला डब्यामध्यें।।९५।। त्यानेंच बजावलें नानागुरूंना। तुम्हां गरुडेश्वरीं जायचें ना। स्थानकाबाहेर भेटेल जाणा। रामराव नामक टांगेवाला।।९६।। त्याचे सांगाती जावें पुढती। नेईल योग्य स्थळाप्रती। नाना बाहेर येतां पुसती। अनेक टांगेवाले तयां।।९७।। तों नांव सांगून स्वतःच म्हणाला। रामराव टांगेवाला म्हणती मला।सोडीन सुखरूप आपल्याला। प्रतापनगरा वेळेवरी।।९८।। हें वचन ऐकतां चमकले। नाना अंतरीं सावध भले। लगेच जाउनी बैसले। रामरावाच्या टांग्यामध्यें।।९९।। गोहागेट स्थानकावरतीं। नाना टांग्यातून खाली उतरती। देऊनी यथोचित रामरावाप्रती। पैसे तेधवां तृप्त मनें।।१००।। रेल्वेनें येती चांदोदला। तेथून पुढें गरुडेश्वराला। मध्यें ओलांडुनी नर्मदामाईला। जाणें होतें नावेंतुनी।।१०१।। स्नान आवरोनी नर्मदेवरी। नाना बैसले कांठावरी। वाट पाहत जाईल जरी। नाव एखादी गरुडेश्वरा।।१०२।। त्या काळीं चाळीसपत्रास। माणसें बैसवुन नावेस। ये जा करिती प्रवासास। भाडें आकारूनी नाममात्र।।१०३।। एकट्यानें करितां प्रवास। पु-या नौकेचें भाडें खास। द्यावें लागे प्रवाशास। अशक्य होतें नानांसी।।१०४।। म्हणून वाट इतरांची। पाहत बैसले नाना

तिर्थेंची। ज्यानें आणिलें इथवर तोची। मायाळू गुरू नेईल पुढे।।१०५।। माझा सर्व बंधु सखा। पिता माता गुरूचि देखा। आम्हांसी नाही तुजसारिखा। त्राता दाता सोयरा खरा।।१०६।। प्रभो, कोण कसा गाडींत भेटला। तुमची माया लखलाभ तुम्हांला। माझी अवघी मतीच निष्फळा। होते करितां विचारही।।१०७।। ऐसें चाललें चिंतन। काठांवरी निवांत बसून। तों काय घडलें तें करावें श्रवण। श्रोते! आपण पुढिलाध्यायीं ।।१०८।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनानागुरूंच्या आशीर्वचनें। दिव्य 'मार्तण्ड-महिमा' उमलणें। उत्तरोत्तर विजयमुखे।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते नवमोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय १०वा - गरुडेश्वर येथे सद्‌गुरुंचे दर्शन



।। निवासांत सद्‌गुरुस्वामींनी । अवचित दिली नानांलागुनी ।
भेट एकदां दूध आणुनी । दिधले गवळ्याचे मिषानें ।।

# अथ दशमोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

हे सद्‌गुरु समर्थ माहेरा। सकळ संतांच्या दातारा। हे पांडुरंगा रुक्मिणीवरा। पंढरीशा जगदात्म्या।।१।। अवघ्या भक्तांच्या विसांविया। सुरमुनिजनांच्या प्राणप्रिया। संतकथेची होऊन छाया। राखितोसि सदैव शरणांगता।।२।। तुझिया पाऊली विसांवतां। मिळते कथेस कृतार्थता। घेऊन आलों मी पण नाथा। अर्पावयासी कथा-सुमनें।।३।। धरावीं जी श्रीनिवासा। अविनाशरूपी अखंडपरेशा। संतकथेसी जगदीशा। हृदयीं आशा घेऊनी आलों।।४।। करावी कथेची पाठराखणी। जेणें होईल ती पवित्र त्रिभुवनीं। मधुर रसभावांची लेऊन लेणीं। मिरवेल रसिक चित्तांमध्यें।।५।। भक्तांना व्हावी तारक। संतोषावे ऐकून रसिक। परमार्थीचे पथिक अनामिक। उल्हासावे पथांतरीं।।६।। इतुकीच पुरवावी वासना। सद्‌गुरु स्वामी कृपालोचना। पीयूष पाझरावें सदैव नाना। आपुली कथा गात असतां।।७।। असो, मागील अध्यायीं श्रीगुरुनाना। नर्मदा तीरीं बसून चिंतना। आठवीत होते सद्‌गुरुचरणां। करीत प्रतीक्षा पन्हईची।।८।। तों मुंबईची कांहीं मंडळी। गरुडेश्वरी जावया निघाली। येऊन जवळी पुसूं लागली। नानांप्रती आस्थेनें।।९।। पंडितजी, आपणा गरुडेश्वरासी। जाणें तरी यावें आम्हांसी। पोंचणें तिथेंची पुण्यतिथीसी। श्रीमद् वासुदेवांच्या।।१०।।

होकार भरला नानांनी। आनंदें सर्व मंडळींनीं। घेतली नाव भाड्यानीं। ओलांडण्या नर्मदेसी।।११।। वाटेंत अकस्मात आलें संकट। तिलकवाड्यासी जैसी नाव येत। सांपडली एका भोंव-यांत। फिरूं लागली तिथेंची।।१२।। होता समय तिन्हीसांजेचा। पुढें प्रकाश मावळतीचा। हा प्रकार पाहतां सर्वांचा। जीव धडधडूं लागला पहा।।१३।। परी शांतिसागर नाना तेथ। वदती आठवावे सद्‌गुरुनाथ। करावा गजर दत्त दत्त। स्मर्तृगामी सांभाळी गा।।१४।। ऐकूनि नानांची मधुर उक्ति। सकळांनीं भजन केलें निश्चितीं। जीविताची भीति चित्ती। वसत होती सर्वांच्याच।।१५।। अखेर कांहीं वेळ जातां। लागली नौका पूर्ववत् पंथा। पोंचले गरुडेश्वरी रात्रीं तत्त्वतां। अंधार होता घाटावरी।।१६।। गरुडेश्वरीं तोंवरी श्रोते। विद्युद्दीप आले नव्हते। कंदील दिवे होते तेवते। मधून ओसरीत कोठेंतरी।।१७।। ठिकठिकाणाहून भक्त। जमले उद्यांच्या तिथीप्रत। नानांची अवघी यात्रा निश्चित। करवूनि घेती सद्‌गुरू पहा।।१८।। यथासांग केली पुण्यतिथी। राहून तिथें तीन रात्री। नानांनी सांठविली सजलनेत्री। रुपश्रिया सद्‌गुरूंची।।१९।। निवासांत सद्‌गुरुस्वामींनीं। अवचित दिली नानांलागुनी। भेट एकदां दूध आणुनी। दिधलें गवळयाचे मिषानें।।२०।। पटवूनि ओळख आपुली। अंतर्धान पावली माउली। यात्रा अवघी सफळ झाली। ते वेळींच नानांची।।२१।। पुढें सन एकसष्ठपर्यन्त। नेमाने पुण्यतिथीस नाना जात। मध्यें एकदां विचित्र





लाभत। वागणूक नानांसी गरुडेश्वरीं।।२२।। एके सालीं पुजा-यांनीं । वागविलें नानांस अनादरानीं। न बोलतां त्या सेवकांलागुनी। गेले नाना घाटावरी।।२३।। नर्मदा आईचे कांठीं। चित्तांत सखेद नाना आठविती। सदय सद्‌गुरूंना पुसती। प्रभो काय अपराध माझा।।२४।। रात्रीं तिथेंच ढाळूनी आसवें। दु:खित हृदयें म्हणती मनासवें। कृपाळू दातारा जरी न यावें। पुढे येथे म्यां पामरानें।।२५।। ऐसी तव इच्छा नाथा। असेल जरी परतेन सर्वथा। उद्यांच माऊले येथून आतां। आठवीन इत:पर गृहींच तुजला।।२६।। परी पहांटे श्रोते! अवचित। आले अवघे पुजारी शोधित। नाना उतरल्या स्थळाप्रत। मुद्दाम विनंती करावया।।२७।। रात्रीं स्वप्नीं येऊन। दटावलें स्वामींनीं सेवकांलागून। आदेश दिधला करावें पूजन। नाना नामक शिष्याचें।।२८।। मग पुजारी लीन मनानें। विनविती, विप्रवर, आपण चलणें। पूजनार्थ मंदिरी व्हावें येणें। या शुभ प्रात:काळीं।।२९।। आदेशानुसार नंतर त्यांनीं। नानांचें यथासांग पूजन करोनी। समाधीवरील छाटी देउनी। कृतार्थ केलें नानांना।।३०।। गुरुप्रसाद हा मिळतां। गद्‌गदून आलें नानाचित्ता। अगाध करुणामय अवधूता। दिगंबरा श्रीवासुदेवा।।३१।। पुढें यथानियम बासष्ट सालीं। नानांची यात्रा निश्चित ठरली। परी आदले दिवशीं स्वारी आली। दुर्धर तापाची नानांवरी।।३२।। प्रमाण भयंकर तापाचें। पाहून विचार करिती साचे। यंदा न जावें ऐसेंच मनींचें। हृद्‌गत श्रीगुरो दिसे

आम्हां।।३३।। चार दिवसांनी पुढें समजले। त्या वर्षी नर्मदेनें घेतले। अनेक बळी प्राणघातक घडले। अपघात चालत्या होड्यांना।।३४।। ताप देऊन घरींच रोखलें। गुरूनीच जणुं वांचविलें। पुढील अनर्थांतून काढिले। सुखरूप अपुल्या वत्सालागीं।।३५।। श्रोते! आता पुढील कथेसी। व्हावें सादर मनेंसी। कां कीं नानांच्या यात्रामहिम्यासी। पार नाहीं यत्किंचित्।।३६।। श्री दत्तांचीं लाडकी स्थानें। विख्यात जितुकीं तीं तीं पाहणे। नानाहृदयीं या छंदाविणें। आणिक कांहीं नव्हतें हो!।।३७।। याच रीती एकदां नाना। गेले गाणगापुरी दर्शना। श्रीपाद श्रीवल्लभनृसिंह पदांना। ध्यावयासी मनोभावें।।३८।। गुरुदत्तांचीं स्थळें कांहीं। नित्य भेटीची मिळते ग्वाही। करवीर माहूर करंजगृहीं। गिरनारी तसेंच गाणगापुरी।।३९।। म्हणोनी एकदां गेले नाना। गाणगापुरीं घडावी उपासना। घ्यावें श्रींचे पददर्शना। या हेतूनें मुद्दाम हो।।४०।। नाना जरी आज अनाग्रही शांत। तरी पूर्वकाळीं कडक आचरणांत। होते कर्मठ नेमवंत। व्रतपालनीं कठोर अति।।४१।। गाणगापुरीं साधक दशेंत। ही यात्रा होती घडत। 'गुरुचरित्राची' भक्तियुक्त। उपासना नाना वाहती तिथें।।४२।। पारायणें करिती एक्कावन्न। नित्य भीमाजळीं स्नान। भल्या पहांटे उठोन। आरंभिती वाचनपाठ।।४३।। पाहुनी धर्मशाळेमाझारी। माडीवरली एक ओसरी। निजण्याबसण्याचें आसन पसरी। साधकोत्तम निवांत हा।।४४।। तें श्रीगुरूंचे पवित्र परम। सिध्दांच्या निवासें होय





वैकुंठधाम। ऐसें निर्गुण पादुकांचें सप्रेम। आवडतें स्थान भक्तांचे जें।।४५।। अखंड विविध परींच्या। तिथें अर्चना-उपासना भक्तांच्या। चालिल्या असती नित्याच्या। भावें आनंदिती दत्तचित्ता।।४६।। तेथल्या निवासांत भलें। एकदां अखंड पारायण आलें। त्यांतही तेरा दिवस झाले। संमीलित नाना तेधवां स्वतां।।४७।। श्रीगुरुप्रतिपदेचा दिन। अतीव उल्हासें उत्सव जाण। करिती अवघे भक्तजन। सोंवळें ओंवळें कडक अति।।४८।। परंपरेनें पुजारीगण। करिती त्या दिनीं यतिपूजन। हा सोहोळा मंगलमय पूर्ण। होतो थाटानें आजही।।४९।। ते वेळींची तुम्ही कथा। विचित्र अद्‌भुत ऐका आतां। पुजा-यांसी रात्रीं दृष्टांता। देती पहा दत्तराय।।५०।। असती जरी अनेक सेवक। उपस्थित यात्रेमाजीं एक। तराणेकर मार्तण्ड नामक। साधक लाडके विशेष माझे।।५१।। त्या लागीं शोधून पाचारावें। उदयीक यतिपूजन करावें। गुरुचरणांना अभिषेकावें। त्यांचे करांनी आदरानें।।५२।। म्हणोनी असोनीही गृहस्थवृत्ती। दुसरे दिनीं श्रोते! पुजारी शोधिती। धर्मशाळेच्या माडींत येती। प्रेमानें विनविती नानांना।।५३।। आणि इतर यतींसवें मग। पूजन नानांचेंही सांग। थाटांत होय तो प्रसंग। साजिरा धन्य ते नानागुरु।।५४।। नेलें सादर गाभा-यांत। नानांसी धूतवस्त्रें जरी असत। अभिषेकावया श्रीपदांप्रत। ऐसें भाग्य कुणाचें हो।।५५।। पहा, पुजारी हो सोंवळयांत। जिथें प्रवेशती गाभा-यांत। ऐशा कडक नियमांत।

अपवाद केलें नानागुरुंना।।५६।। श्रीमन्महाराजांचे काळांतील। स्फटिक लिंग आंत पवित्र निर्मल। कोरलेलें सुरेख गोल। श्रीयंत्र जागृत त्यावरी।।५७।। त्या गुरुमाऊली-करांकित। पुण्यवान प्राणलिंगाप्रत। नानाहातें अभिसिंचन होत। रुद्रमंत्रांनीं त्या वेळीं।।५८।। तो शुभंकर सोहळा सोज्वळ। आठवतांही आज केवळ। येतें भरतें हृदयां कोमल। भक्तिभावें साधकांच्या।।५९।। श्रीगुरूच्या निर्गुण पादुका। आटोपतां रुद्रा अभिषेका। ठेविती पुजारी दोन्ही अंकांवरतीं । आदरें नानांच्या।।६०।। येणें प्रमाणें धन्य नाना। प्रत्यक्ष श्रीचरण जयांना। लाभले पुण्य स्पर्श पावना। श्रीदत्तांची थोर कृपा।।६१।। पूर्वी एकदां मथुरेला। नानांवरी तो घन:शाम वर्षला। कथा त्याची आपल्याला। निवेदिली म्यां मागेंच।।६२।। श्रोते! भाग्यवंत नानांचें। ऐसें सुकृत थोर साचें। दर्शन सौख्य अनेकांचें। दिधलें सद्‌गुरुरायांनीं।।६३।। जयाच्या दर्शनासाठीं। ऋषीमुनी अवघे आटाटी करिती। योगयाग, दृष्टभेटी। परी न होई जन्मांतरीं।।६४।। तो कौसल्येचा नंदन। सती जानकी मनरंजन। भक्तजनांचें पूर्ण निधान। भवभंजन रामराया ।।६५।। जी योगियांची विश्रांती। दिव्य कृपेची ज्योत जागती। पूर्णब्रह्माची आत्मदीप्ति। करुणावत्सल सीतापति।।६६।। तयाचेंही दर्शनसुख। लाभलें नानांसी भाग्य अलौकिक। ऐकतां हृदय-संपुटीं देख। हर्ष न मावे अनिवार।।६७।। चाललें असतां पर्यटन। एकटे अवधूत - वृत्ती ठेऊन। आदिवासी ‘ छाबडा ’ ग्रामालागुन।






नाना आले हिंडतांना।।६८।। तें खेडें ग्वाल्हेरकडील। पुराणे गांवढे लोक सकळ। होतें तेथ राममंदिर। पुरातन एक एकीकडे।।६९।। सायंकाळीं गांव लागतां। नाना करिती विचार चित्ता। रात्र काढोनियां तत्त्वतां। जावें पुढल्या मुक्कामासी।।७०।। म्हणोनी त्या विजनमंदिरीं। विसावली नानांची स्वारी। जावोनियां गाभारीं। वंदिली साजिरी राममूर्ती।।७१।। एकीकडे लावुनी कोप-यांत। नाना आसनीं बैसत। तों सांजवात लावण्याप्रत। आला वृद्ध पुजारी पहा।।७२।। करूनी धूपदीप आरती। हृदयी तुडुंबली होती भक्ति। भावमग्न पुजारी लाविती। दारें पहा गाभा-याचीं।।७३।। जैसा लागला परतावया। कोप-यांत नानांसी पाहूनीयां। अस्वस्थ क्रोधित होउनी तयां। बोलूं लागला, निघोनी जावें।।७४।। हात जोडोनी विनविती नाना। अनोळखी मी पांथस्थ जाणा। रात्रीपुरता राहीन चरणां। संनिध रामरायांच्या मी।।७५।। शांतमनें तो पुजारीही। सांगूं लागला नानांसी, नाहीं। निवासासी उचित मुळींही। मंदिर भयाण अवघें हें।।७६।। आम्हांसी नसे शंका भय। जवळी आहेत रामपाय। वदतां निक्षूनि निरुपाय। तेधवां जाहला पुजा-याचा।।७७।। वदे प्रेमळ वाणीनें तो। ‘ पंडितजी, रात्रीं येथें घडतो। साक्षात् रामलक्ष्मणांचा चालतो। खेळ स्वैर अनिवार ’।।७८।। मुद्दाम रोखिलें तुम्हांसी। कुलुपें घालीतों रात्रीं दारासी। न कळावें म्हणूनी कोणासी। यत्किंचितही यांतलें।।७९।।विकारी चंचल मानवी मन। असतें जाणतां आपण पूर्ण।

दिव्य विलास चाले आनंदून। इथें रात्रीं तेजाचा।।८०।। तें असह्य आत्मतेज। घवघवीत निर्मळ सगुणबीज। जणुं वाटतें खेळतें रोज। रामरूपें मंदिरीं या।।८१।। आपणही दिसतां अलौकिक। येरवीं रात्रीं कोणी पथिक। म्यां न देखिला, आला, सुख। भोगिलें आजवेरी एकट्यानें।।८२।। रात्रीं राहणे जरी येथ। राहावें परी असोनी निवांत। आड बाजूस बैसून फक्त। घडेल तें तें न्याहाळावें।।८३।। तुकविली मान नानांनी। आपण जावें निभ्रांत होऊनी। अस्तित्वाची न जाण देऊनी। निजेन शांत एकीकडे।।८४।। कुलूप घालूनी द्वाराला। स्वस्थमनें मग गृहीं गेला। श्रोते! पुजारी संतोषला। चहाळ नुरला बाहेर मग।।८५।। पाठचिंतन नित्याचें। करीत पहुडले नाना वाचे। दत्तनाम घेत साचें।सोत्सुक पाहती मंदिरांत।।८६।। रात्र उलटली दोन प्रहर। गाढ निद्रेंत गांव बाहेर। मंद चांदणें धरेवर। ऐशा समयीं दार वाजे।।८७।। तों पुजारी आला आंत। आंतूनि द्वारें लावुनी घेत। भावाकुलचित्तें गाभा-यांत। पूजा त्यानें आरंभिली।।८८।। यथासांग पूजाविधी।आरती गातां प्रेमसमाधी। लागली त्याची,थोडा अवधी। उलटून गेला यांत कांहीं।।८९।। बैसल्या जागेहूनी नाना। निरखीत होते सावधमना। ठेवूनियां क्षणाक्षणां।काय घडे तें समोर त्यां।।९०।। त्या पुजा-यासी ये काळीं। भान नव्हतें कोणाचेंही मुळीं। जणुं विस्मरला गोष्ट सगळी। संध्याकाळींच घडली जी।।९१।। चार मुक्तींत समीपता। आनंद अनिवार भक्तचित्तां।





देते म्हणून अवस्था भक्तां। आस असते जियेची।।९२।। देवभक्त सुहृदांपरी। नांदती जेधवां प्रत्यक्षापरी। तें भाग्य सोनियाचें जरी। लाभे कुणास धन्य तो।।९३।। नामदेव बालकें धरिला। पांडुरंग मूर्तीसी हट्ट आपुला। यावें नैवेद्य खावयाला। खालीं उतरोन देवराया।।९४।। ते वेळीं त्या भक्त सख्याला। होऊन सगुण समूर्त सांवळा। येणें भाग पडिलें हट्टाला। पुरविण्यासी वत्साचिया।।९५।। भक्त जधीं उपास्याची। वाहतो चैतन्यभावें चित्ताची। व्याकुळता अथवा सात्विकतेची। होय जेव्हां परिसीमा।।९६।। होणें लागे ईश्वरासी। जैसें रूप ये भक्तमनासी। तैसें विनटावें जगदीश्वरासी। लागतें हेत पुरवावया।।९७।। लडिवाळ कौतुक आपुला सखा। जैसें करील तैसें देखा। वाडे कोडे आपुल्या बाळका। आळवितो भक्त त्यासी।।९८।। तोच प्रकार इथल्या मंदिरीं। चालला होता, रावणारी। रामलक्ष्मणमूर्ती गोजिरी। होती अंकित पुजा-याचे।।९९।। तो पुजारी वृध्द अत्यंत। परी श्रीमंत पुण्यवान् सुकृत। होते आजीव राघव उरांत। नित्य निरंतर आठवोनि।।१००।। त्याची करावया पूर्तता। साकार हृदयींची आर्तता। देवचित्ता आली तृप्तता। पाहुनी साधना दासोत्तमाची।।१०१।। तो प्रसंग अपूर्व मंगल। पाहा नानांचेही भाग्य सबळ। कैसें मिळावें तेंची स्थळ। विश्रांतीस नानांलागीं।।१०२।। लोक गांवचे कितीक जरी। असतील आले त्या मंदिरीं। परी केवळ अनधिकारी। अंतरंगींचे मलिन मुळीं।।१०३।। चकोरें प्यावें चंद्रामृत।

तें इतरां कैसैं मिळत। कल्पतरूंच्या छायेंत। वसती केवळ भाग्यवंत।।१०४।। कमलतन्तूंचा कोंवळा चारा। राजहंसांनींच खावा न्यारा। चिखलांत गुंतला अवघा पसारा। वासनेचिया अमंगळा।।१०५।। नाना होते सद्‌गुरुसुत। नेती ओढुनी मंदिरीं अवचित। व्हायचें जेव्हां अघटित। अतर्क्य घडतें नकळतचि।।१०६।। ती सात्त्विक कथा रम्य। पुढीलाध्यायीं वर्णीन अगम्य। माधुरी जियेची अनुपम्य। वाटे आठवितां आजही।।१०७।। श्री गजाननांच्या प्रेरणें। श्री नानांच्या आशीर्वचने। श्रवणीं 'मार्तण्ड-महिमा' येणे। विजयमुखें भाविकांच्या।।१०८।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते दशमोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय ११वा - छाबडा गांवी प्रभू श्रीरामचंद्रांचे दर्शन



।। त्या रघुरायाची गोमटी गोजिरी । सुमधुर कोमल रेखीव रंगली ।
मूर्त मनोहर सवें मिळाली । अनुज अलौकिक लक्ष्मणाचीही ।।

# अथ एकादशोऽध्याय:।

।। ॐ श्रीगणेशाय नम:। ॐ श्रीसरस्वत्यै नम:। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नम:।।

ॐ नमो नमस्ते कुलदेवते। तुळजापूरवासिनी जगन्माते। अंबिके माऊले आम्हांतें। तुजविण कोण रक्षील।।१।। तूं सुरासुरांच्या रणकंदनीं। होऊन क्रूर महिषासुरमर्दिनी। लंकेमाझारी युद्धांत जननी। रामवरदा झालीस गे।।२।। अनर्थ घडतां अवनीवरतीं। तुवां राखिलें वत्सांप्रती। होऊन वत्सल कृपामूर्ति। विश्वकरुणा मंगलमयी।।३।। असावी अपार दया माते। तुझ्या कृपांकित बाळकातें। श्रीमंत प्राक्तन करितें। कृपादृष्टी केवळ तुझी।।४।। तूंच कुंडलिनी आत्मशक्ति। होउनी विलास करिसी चित्तीं। योगमाया मोहिनी युगांती। तूं शिवाची शक्ति अंबा।।५।। श्रोते! भाग्यवान गुरुनाना। राममंदिरीं न सोडितां आसना। खिळवुनी उत्कंठित लोचनां। पाहत होते गाभारीं।।६।। पुजाऱ्याची भावमग्नता। ओसरतां गाभारीं झगमगता। प्रकाश सांडला जणुं सविता। साक्षात् उदेला अवेळींच।।७।। मूर्तित्रय होतें तेथ। राम जानकी लक्ष्मण विलसत। हास्यमुद्रें करित प्रमुदित। दर्शनमात्रें भक्तमनें।।८।। त्या उभयबंधूंच्या मूर्ति। चैतन्यमयी तेजाकार होती। कुमाररूपें हंसत उतरती। येती बाहेर गाभाऱ्याचे।।९।। गाभाऱ्याचे लगेच समोर। होता सभामंडप सुंदर। तिथें पातले भक्तप्रभुवर। खेळावयासी आनंदें।।१०।। व्रजभाषेंत बोलणें। होतें

तिघांचेंही जाणें। चौक उजळला प्रकाशानें। लखलखीत लावण्यदीप्तीमुळे।।११।। माझी रचना केवळ दुबळी। रघुरायाची मूर्ति सांवळी। असेल कैशी ते वर्णितां लाजली। शरण माझी शब्दकळा।।१२।। वेदश्रुतीही वेडावल्या। कवीश्वरांतही पैजा लागल्या। चारही वाणी विसरल्या। भान स्वतःचे बोलतांना।।१३।। त्या रघुरायाची गोमटी गोजिरी। सुमधुर कोमल रेखीव रंगली। मूर्त मनोहर सर्वे मिळाली। अनुज अलौकिक लक्ष्मणाचीही।।१४।। विस्फारलेल्या नयनांनीं। रोमांचित तनु होवोनी। नाना पाहती स्तिमितमनीं। खेळ मंडपीं चाललेला।।१५।। सोबत्यांशीं जैसे रमून। खेळती मुलें तन्मय होऊन। पुजा-यासी रघुनंदन। बोलत होते तयेवेळीं।।१६।।'आज क्या खेलोगे रामजी?'। पुसतां पुजा-यानें झाले राजी।'गुल्ली डंडा'बोलती लक्ष्मणजी। तयार अवघे डावासी।।१७।। पहा अनिवार मुक्तपणें। चाले तेव्हां तिघांचें खेळणें। धावती गर्जती आनंदानें। गिल्ली उडतां इथें तिथें।।१८।। खेळ ऐसा विलक्षण। चालला श्रोते! वेळ उडून। कैसा गेला नानांलागुन। न कळे तेधवां यत्किंचित।।१९।। सुमारें साडेतीनचाराचा। असेल समय झाला साचा। थांबले अकस्मात परतण्याचा। मानस बोलिले राघव।।२०।। त्या वेळेचा डाव होता। उलटला देवांवरी पुजा-याचा। तो क्रोधित वचनें वदे कैसा। 'हे न बरवें रामचंद्रा।।२१।। माझा डाव द्याल पुरता। तेव्हांच सोडीन तुम्हां उभयतां। जरी न ऐकाल माझें आतां। मारीन दंडा





दोघांसीही।।२२।। मला न माना कच्चा चेला। घेईन पुरता तुमचा बदला। अर्धा डाव टाकूनि पळाला। सांगेन सर्वांना बंधुंनो'।।२३।। पहा दटाविलें देवासी। ही समर्थता भक्तासी। थांबविलें तेव्हां दोघांसी। खेळ पुरा करायातें।।२४।। अवघीच होती प्रभुलीला। घाईनें भक्तास डाव दिला। इतक्यांत वेळ जवळी आला। काकडारती पूजेचाही।।२५।। परतले तिघेही गाभारीं। साष्टांग वंदन करितो पुजारी। तेज विलोपुन, सौम्य हांसरी। मूर्ति झाले दाशरथी।।२६।। पुजारी तृप्त मनानें। गाऊं लागला भूपाळीगाणें। अंतर्बाह्य आनंदानें। न्हाऊनि निघाले नानागुरू।।२७।। धन्य तयांची पावन दिठी। मुसावली राममुद्रा हृदयसंपुटीं। निघतां केव्हां आजही गोष्टी। दिसे अवघें दृश्य तयां।।२८।। पुढें पुजा-यानें एक दिन। करितां राघवांचें पूजन। चरणांवरीच मस्तक ठेवून। झालें निर्वाण रामरूपीं।।२९।। ऐशा कथा असती अमित। नानांजवळी संग्रहीत। जलबिंदूंचा सागरांत। जेंवी सांठा अमर्याद।।३०।। कर्मकांडाचे व्रतपालनांत। मग्न नाना पूर्वजीवनांत। अनेक यज्ञ याग त्या काळांत। केलेत आचार्य होऊनियां।।३१।। जरी मंदप्रभ आज वेदधर्म। परी या काळींही ज्ञाते परम। करिती करविती यज्ञकर्म। सप्रचीत सांपडती मंत्र सारे।।३२।। यज्ञसंस्था मूलाधार। चतुर्वेदांचे कर्मसार। जीवनाचा पायाच सुंदर। ग्रथित असे जयामाजी।।३३।। आहुति अर्पिण्यामागली। त्यागभावना जेव्हां लोपली। विश्वात्म्याची कृपाही रुसली। तेव्हां पासुनी

अमुच्यावरी।।३४।। प्राचीन जाज्वल्य मंत्रशक्ति। मधल्या काळीं आम्हींच निश्चिती। मळविली आचरोनि स्वार्थवृत्ती। परी न अस्तंगत आजही ती।। ३५।। व-हाडांतील एक संत। श्रीनारायणगुरू नामें विख्यात। त्यांनीं आपुल्या जीवनांत। यज्ञ केले नानापरींचे।।३६।। माळव्यांत इथे श्रीनानांनींही। इतर उपासनांसवें यज्ञयागही। केले सद्‌गुरुकृपें सर्वही। जाहले संपूर्ण यशप्रद।।३७।। उल्लेखनीय बत्तीस तरी। घडले यज्ञ नानांकरीं। त्यां अवघ्यांमाझारी। भूषविती नाना आचार्यपद।।३८।। श्रोते! यज्ञांच्या आंतील पसारा। केवळ याज्ञिकच जाणे सारा। व्यर्थ आपण टीकेचा मारा। करूं नये कळल्याविण।।३९।। निमित्त असतो यज्ञांचा। यजमान श्रीमान् सात्त्विक साचा। सफल करितो अवघा त्याचा। संकल्प ज्ञानी आचार्य तो।।४०।। संपूर्ण यज्ञाचा शिरावर। ज्यावरी असतो यथार्थ भार। यज्ञांतील सकळ सान थोर। वागती जयाच्या आज्ञेमाजी।।४१।। तो वेदविद्येचा जाणता। पंडित शास्त्रज्ञ योगी पुरता। वावरतो समग्र यज्ञीं सर्वथा। आत्मा जैसा देहांत वसे।।४२।। क्रिया-प्रक्रिया यागांतील। प्रमादविस्मृती दोष सकळ। पापपुण्याचें ओझें केवळ। घ्यावें लागे जयालागीं।।४३।। ऐसें अवघड आचार्यपद। सांभाळिलें नानांनीं पुण्यप्रद। सकळ आपदा निवारूनी शुभद। यज्ञ केले बत्तीस पहा।।४४।। मुख्य आचार्य, ऋत्विज। ब्रह्मदेव, गाणपत्य, नेमून द्विज। चतुर्वेद पाठक द्वारीं सज्ज। असती यज्ञ-मंडपाचे।।४५।।







अनेक विप्र थोर थोर। असती आचार्यवचनीं तत्पर। यज्ञकुंडांचे किती प्रकार। वर्णिलेले शास्त्रान्तरीं।।४६।। विविध नांवांचे यज्ञयाग। कथिले ग्रंथांत सांगोपांग। अवघे करवुनी यथासांग। घेणें कार्य आचार्याचें।।४७।। कधीं कोणी पाखंडी वावदूक। उगाच करिती विवाद अनेक। विघ्नहेतु घेऊनी कधीं लोक। शिरती यज्ञांमाझारी।।४८।। या सकळांचें समाधान। तर्क युक्तिवादेंकरून। करणें आचार्यालागून। शक्ति-सर्वस्व वेंचुनीही।।४९।। श्रोते! अनेक यज्ञांभीतरीं। नानांना शक्तिपातही जरी। करणें लागे अवश्य तरी। मंगल यशार्थ कार्याचिया।।५०।। विष्णुयाग, रुद्रयाग। शक्ति, स्वाहाकार, सूक्ष्म प्रयोग। अनेक स्थळीं घडले प्रसंग। नानांहातें विलक्षण।।५१।। तराणा, पचेटी. माकडोन कितीक। गांवें सांगावी सकळ लोक। विचार करोनियां एक। करिती संकल्प यज्ञांचा।।५२।। तेव्हांची अद्‌भुत कथा वेंचक। कथितों यज्ञांतील एक। माकडोन गांवींची अलौकिक। असे साक्षात् घडलेली।।५३।। वीस वर्षांपूर्वी नाना। वैशाख शुद्धान्तरीं जाणा। विष्णुयागार्थ आमंत्रणा। स्वीकारिती आचार्यपदा।।५४।। ग्रामपंचांनीं जमविली वर्गणी। लोक जवळील गांवांमधुनी। आले यज्ञास मुद्दाम दुरूनी। पंडित ब्राह्मण लहान थोर।।५५।। उदंड उत्साहें तेथ आलीं। पंधरा दिनांची सामग्री जमली। परोपरींची आयती झाली। अन्न-शांतीस्तव अवघ्यांच्या।।५६।। प्रत्यक्ष यज्ञाआधीं दिवस दोन। होई समस्त देवदेवतास्थापन। तृतीय दिनीं

ठेविला शोधून। मुहूर्त यज्ञारंभाचा।।५७।। रात्रीं यज्ञकुंडांत रचुनी। पंचपल्लव रानशेणी। नवसमिधांची रास भरोनि। केली सिध्दता पहांटेस्तव।।५८।। परी ऐन मुहूर्तावरी। मिळाला न विस्तव बाहेरी। न चाले कुठलाही कसातरी। यज्ञास्तव अग्नी प्रारंभींच।।५९।। नाना बैसले होते तेधवां। कुंडासमीपच म्हणती, 'धांवा। मुहूर्त मुळींही न टळावा। मुद्दाम पाहिला चोखटपणें'।।६०।। मिळाला न तरीही बाहेरून। हवा जैसा अग्नि, सर्व जण। चिंतित होय विप्रवृंद पूर्ण। टळतो मुहूर्त यथार्थ हा।।६१।। ते वेळीं श्रीगुरुनानांनीं। टाकितां दिव्यदृष्टी लय लावूनि। वैश्वानर प्रत्यक्ष प्रगटुनी। धूर झाला कुंडांत।।६२।। जयजयकार करिती सकळ। धन्य! धन्य!! वदती अद्‌भुत केवळ। सामर्थ्याचा पुण्यपुंज सोज्ज्वळ। म्हणती नानांसी खचित पहा।।६३।। या प्रसंगींचे लोक अजून। आहेत इंदुरांत, सांगती पूर्ण। घडला वृत्तांत अवलोकून। प्रत्यक्ष लोचनांनीं आपुल्या जो।।६४।। पुढील अनेक यज्ञांतरीं। मुद्दाम लोक पाहण्यास जरी। जमूं लागले जेथ साजिरी। आचार्यमूर्ति नानागुरु।।६५।। न केलें पुन्हां ऐसे कधी। टाळणें कटाक्षानें प्रसिध्दी। असोनी अवघी तत्त्वसिद्धी। दाविती न कधीं संत खरे।।६६।। अशीच ऐका दुसरी कथा। अपार खरोखरी मार्तण्डगाथा। भाविकांचा लवेल माथा। ऐकतां जरी श्रद्धेनें।।६७।। पचेटी नामक ग्राम लहान। तेर्थींचे असे आमंत्रण। कांहीं वर्षांपूर्वी नानांलागून। आचार्य होण्या यागाचे।।६८।।



दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

कुठलाही जरी असेल यज्ञ। आधीं त्या गांवीं जाऊन। करिती नाना यज्ञ स्थान। निश्चित योग्य पाहूनी स्थळा।।६९।। परिपाठाप्रमाणें पचेटीस। आले आधीं पंधरा दिवस। तेथें शक्तियागास। करणें होतें यथासांग।।७०।। शक्तियाग कठीण जगदम्बेचा। कडक विलक्षण धाक चंडीचा। कांहीं विपरीत होतां अंबेचा। क्रोध होतो अनिवार।।७१।। ज्या स्थळासी नानांनीं। निश्चित केलें तयालागुनी। गांवींचे लोक शंका काढुनी। सांगूं लागले नानांना।।७२।। जल, छाया, संनिध देवता। यज्ञस्थळाच्या भोंवतीं असतां। करिती निश्चित सामान्यतः। नानागुरु तेंचि स्थल।।७३।। इथें होत्या तीनही, परी। वदती नानांसी गांवकरी। इथल्या जगदंबेच्या मंदिरीं। देती बळी लोक नित्य।।७४।। घडते इथें हत्या नित्य। कशास लपवावें जी सत्य। करितील विघ्न कुटाळ व्रात्य। लोक कांहीं ग्रामींचे।।७५।। म्हणोनी आपणचि दुसरें। शोधावें स्थान हेंचि बरें। बळीस अटकाव करणारे। वडीलधारे कुणी न इथें।।७६।। शांत मनें ऐकिलें नानांनीं। कांहीं तरी अंतरीं चिंतुनी। उभे राहिले जावोनी। मंदिरात पुढें चंडीच्या।।७७।। अनन्य भावें आठविली। अंबिका हृदयीं वंदिली। बीजाष्टक मंत्रे ध्यायिली। आदिशक्ति उत्कटपणें।।७८।। आणि विनविलें तियेसी। माये! परीक्षा कां येथें घेसी। माझें मागणें वो तुजसी। इतुकेच ऐकावे सादर।।७९।। इथें कांहीं दिवसांनीं। शक्तियाग व्हायचा, हवनीं। जीवहत्या मुळीं न होवोनी। राखीं पावित्र्य स्थानाचें।।८०।।

आतां अंबे। पुढील सारी। जोखीम टाकून तुझ्यावरी। चुकला माझा शब्द तरी। बोल लागेल तुजलागीं।।८१।। ऐसें विनवुनी निघाले। गांवक-यांसी आश्वासिलें। तयारीस तुम्ही भले। लागावें जी भक्तीनें।।८२।। मुळीं न येईल विघ्न येथ। अंबा उभी प्रत्यक्ष जेथ। न होईल हत्या यापुढें सत्य। मानावें वचन माझें पहा।।८३।। ठरल्याप्रमाणें अवघी तयारी। शक्तियागाची जाहली सारी। आचार्य नानांची ही स्वारी। आली पहा उचित वेळीं।।८४।। तेव्हां कळे विचित्र एक। गोष्ट त्याजला विचित्र अलौकिक। ऐकुनी सगळी होती थक्क। मंडळी नाना-संगतीची।।८५।। त्या गांवींच्या दुष्टांनीं। मुद्दाम ठरविलें यज्ञालागुनी। भ्रष्टावयासी तया स्थानीं। बळी आणिला मिरवीत।।८६।। कुणा एका चांभाराला। मुद्दाम चिथवुनी आपुला। बेत अवघा तयास कथिला। द्यावा तुवां बळी एक।।८७।। आणिला त्यांनी मिरवीत। बोकडास रंगवुनी शेंदरें अमित। होता सवें चांभार चालत। वाजंत्रीं, लोक कुटाळही ।।८८।। ती मिरवणूक सर्वांची। वाजत गाजत मंदिरीं साची। येऊन पुढ्यांत अंबेची। करिती पूजा यथेष्ट पहा।।८९।। कांहीं क्षणांतच तो चांभार। घाव बक-याचे मानेवर। घालितो, इतुक्यांत भयंकर। विक्राळ आरोळी देतसे।।९०।। आणि श्रोते! दोघेही क्षणांत। असतां लोक सर्वही पाहत। किंचाळून भयानक, वेगें पळत। सुटले विचित्र अनिवार।।९१।। विलक्षण गतीनें पळाले। पाहतां पाहतां मुळीं न दिसले। आश्चर्यें





अवघेच थिजले। मूढ जाहले लोक सारे।।९२।। भर दिवसां दोघेही ते। अदृश्य होती परी न कळतें। अजूनीही अज्ञातची पुरतें। परतले न मुळीं आजवरी।।९३।। अविश्वास धरावा ऐसी। जरी सकळ कहाणी विचित्रशी। आहेत आजही ग्रामवासी। साक्ष द्यावया घटनेची।।९४।। तेथोनी आजवरी अजून। बंदच जीवांचे बलिदान। पूर्ण जाहलें तो दिन। आठवितो आज गावक-यांसी।।९५।। ही नानांची समर्थ वाणी। जगदंबेची सार्थ होय विनवणी। जें जें येई मुखालागुनी। सत्यता दे परमेश्वर।।९६।। पुढें शक्तियाग तेथील। यथासांग झाला सफल। मधली एक लहान केवळ। गोष्ट कथितों ऐका आतां।।९७।। यज्ञमंडप जिथें घातला। घनदाट छाया होती त्याला। वृक्षराई सुरेख शीतला। जवळच सभोंतीं दाटलेली।।९८।। त्या वृक्षांवरी अमित। मधमाशांची पोळीं सत्य। होतीं लागलेलीं परी न लक्षांत। आले पूर्वी नानांचिया।।९९।। धूर रोजचा जरी उसळत। धगधगत्या अग्निकुंडांत। मुळींही न डसली कोणाप्रत। एकही मधमाशी तेथील पहा।।१००।। लोक जमले असंख्यात। चहाळ दिवसारात्रीं मुक्त। उडाली न एकही तेथ। वरतीं माशा इतुक्या जरी।।१०१।। दोन तीन झाले दिवस। त्या यागाचे एकदां खास। बाईची दृष्टी मोहोळास। गेली प्रदक्षिणा करितांना।।१०२।। तिनें घाबरून नानांना। विचारलें,'या माशा पहा ना। मुळीं न उडत चावती जाणा। असून इतुका धूर इथें'।।१०३।। ही शंका येतां तिला।

लगेच कांहीं वेळ गेला। आणि माशीनें दंश केला। नेमका श्रोते! तिलाच पहा!।।१०४।। ओरडली ती, आली धावुन। नाना वदती तिला हंसुन। कां गे घेतली शंका पाहुन। अघटित अवघें दिसोनीही।।१०५।। ऐसा नानांचा अधिकार। काय वर्णू मी लाचार। करवितो अवघें श्रीगुरुवर। निमित्त लेखना केवळ मी।।१०६।। यज्ञांतील केवळ कथा। सांगता होईल विस्तार ग्रंथा। यज्ञ नारायणास आतां। वंदून जावे पुढीलाध्यायीं।।१०७।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनानांच्या आशीर्वचनें। 'मार्तण्ड-महिमा' उमलत फुलणें। विजयमुखें अखंडित।।१०८।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते एकादशोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय १२वा - पूजनीय नानांची नित्यानंद स्वामींबरोबर आध्यात्मिक चर्चा




।। 'पंडितजी! सर्वात्मक भगवंत । ऐसा असतो जाणा यथार्थ ।
जेथें पहावे तिथून येत । गंभीर शिवोऽहं हाचि ध्वनी' ।।

# अथ द्वादशोऽध्यायः ।

।। ॐ श्रीगणेशाय नमः । ॐ श्रीसरस्वत्यै नमः । ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ।।

ॐ आनंदाचे अपार गगन। सदा निश्चळ चिद्ब्रह्मगहन। निरामय अव्यक्त ओंकारपूर्ण। संतमूर्ती जगतांतील।।१।। ईश्वरही जयांची झेलतो वाणी। सर्व देवता धावधावुनी। लोळती सिध्दी चरणांलागुनी। हेत पुरवाया संतांचे।।२।। संत सद्‌गुणांचे गुणातीत अंबर। अकारण करुणेचे अपार सागर। अखिल सुरांचे चैतन्य झंकार। झळझळीत दीप्ति सत्तेजाची।।३।। मंगलतेचे कृपाळु माहेर। सहृदय क्षमेचें उदार भांडार। शुध्दातीत विशुध्द गाभार। सदा तत्पर वत्सांप्रती।।४।। अवचित जधीं सुवेळ उगवते। खरीखुरी संतभेटी तेव्हां होते। सद्‌भाग्याची खाण उघडते। भवदारिद्र्य निरसावया।।५।। पहा! सद्‌गुरु नानाजीवनीं। सोयरा वासुदेव येऊनी। ब्रह्मानंद अंतःकरणीं। बाळपणींच दिधला अजरामर।।६।। श्रीमंताच्या सुतासी। जैसे सकळ जन आदरेंसी। वागती पाहूनी पितयासी। सहज जगीं प्रेमानें।।७।। तेवी होतां सद्‌गुरुकृपांकित। अवघे त्यास आदरिती संत। प्रेमाचे जणुं भरिते येत। भेटतां त्यांस कोणालाही।।८।। किती नांवें म्यां सांगावीं। संतमहात्म्यांची चोखट बरवीं। दर्शनाची न सोडावी। संधी कधींही नानांनीं।।९।। अमित संतांची अचूक दर्शनें। अकल्पित अलौकिक संवादप्रवचनें। घडली नानांसी, परमादरानें।

वागविती अवघे भेटीमाजी।।१०।। आधुनिक जे जे विख्यात। आणि जुनेही तेव्हां हयातीत। आले नानाजीवनांत। संतमहात्मे अपार पहा।।११।। श्रोते! सांगेन रम्य गोड। उपजेल ऐकतां चित्ती आवड। खचित तुम्हांस मिळेल जोड। श्रीपदांची श्रवणमात्रें।।१२।। असतां नानागुरु तराण्यासी। स्वामी नित्यानंद आले गांवासी। होते मूळचे धारवासी। उतरले हिंदी डॉक्टरांकडे।।१३।। कर्मकांडावरी अति प्रीती। कर्मठ आचरण नानांचे अति। होती त्रिकालपूजा पद्धति। दत्तमंदिरी तये वेळीं।।१४।। मुक्काम स्वामींचा बराच घडला। तराण्यासी, जाती दर्शनाला। सवड लाभतां नानांला। भक्तिभाव धरोनी मनीं।।१५।। स्वहस्तें आपुले अन्न। दैनंदिन संपत अवघें अर्चन। नाना करिती सोंवळ्यांत पूर्ण। नियम होते कडक सारे।।१६।। एकदा अवचित स्वामींनीं। सांगितलें स्वतःच नानांलागुनी। भोजन करूं मंदिरीं येऊनी। करावे फुलके आमुचेसाठी।।१७।। हर्ष झाला अनिवार। दुस-या दिनीं येतां दिनकर। ऐन गगनाचे मध्यावर। स्वामी आले भोजनासी।।१८।। मांडिलें आसन नानांनी। फुलके वरण कढी वाढुनी। आणिलें ताट भरोनी। स्वामींपुढें विनयानें।।१९।। तृप्तमनें आशीर्वाद। देती नानांसी नित्यानंद। कांहीं वेळ संवाद। करिती प्रेमें अध्यात्माचा।।२०।। होते एकदां दोघेच मंदिरीं। पुसती पाहोनी घटिका साजिरी। 'पंडित, कांही आस अंतरीं। असेल तरी सांगावी हो'।।२१।। क्षणैक चिंतुनी मानसीं।







नाना विनविती नित्यानंदांसी। 'स्वामी सांगावे एका श्लोकासी। विवरणें स्पष्ट करोनी जरा।।२२।। श्लोक।। सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः। नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते।। अ.९.श्लो.१४।। या गीतावचनाचें वर्म। सांगावे जी उकलून सुगम'। ऐकतां पुसती स्वामी परम। उल्हासोनी नानांसी।।२३।।'कृती हवी कीं अर्थ केवळ। सांगूं श्लोकाचा पंडितजी,' प्रेमळ। स्वामी विचारिती, सोज्वळ। मानस हरखलें नानांचें।।२४।।'अर्थ वदती अवघेच परी। कृती दावावी अपूर्व खरी'। विनविती नाना-अंतरीं। आश्चर्य होतें दाटलेलें।।२५।। तों श्रोते! क्षणार्धांत। स्वामी बैसल्या आसनीं पावत। अन्तर्धान तेथेंचि स्तिमित। नानादृष्टी बावरली।।२६।। सभोंवार भिरभिरत। नजर नानांची शोधूं लागत। तों ध्वनि भिंतीतून सत्य। येऊं लागले समोरल्या।।२७।। 'पंडितजी! सर्वात्मक भगवंत। ऐसा असतो जाणा यथार्थ। जेथें पहावें तिथून येत। गंभीर शिवोऽहं हाचि ध्वनी'।।२८।। आश्चर्यमुग्ध नाना पाहती। कांहीं थोड्या क्षणांमागुती। पुनश्च स्वामी आसनीं दिसती। सुहास्यमुद्रें पुसती भले।।२९।।'काय तृप्तलें ना मानस?'। नाना जोडुनी दोन्ही करांस। वंदिती नित्यानंदस्वामींस। परमभावें आनंदुनी।।३०।। ऐसे अनेक परमसुखद। जीवनीं संत-भेटीचे आनंद। नानांच्या भरले, होई फलप्रद। गुरुकृपा बाळपणींची।।३१।। बडोद्यासी पूर्वी एक। गोहागेटचे स्वामी अलौकिक। असती कोल्हापूरींचे

सेवक। विख्यात कुंभारस्वामींचे ते।।३२।। वृत्ती मनस्वी यांची पूर्ण। सोंवळें कर्मिष्ठ कडक कठीण। न बोलती कोणाही सर्व जाण। इच्छा असल्यावांचून कधीं।।३३।। पत्नी शंकरराव संतांची। बडोद्याच्या विशेष साची। भक्त होती स्वामींची। पूर्ण कुटुंब भजनमार्गी।।३४।। एकदां नाना बडोद्यासी। पुसती नमूताई तयांसी। 'नाना याल कां दर्शनासी। स्वामींचिया मठामाजी'।।३५।। गोहागेटच्या विभूतीस सोज्वळ। 'लंगडेस्वामी' म्हणून सकळ। ओळखिती, स्वामींचे अर्धांग विकळ। कमरेखालील होतें पहा।।३६।। वेळ होती दुपारची ती। आले नाना मठाप्रती। सवें नमूताई गंगूताई असती। रोखिलें बाहेरच शिष्यांनी।।३७।। वदती ये वेळी न जाणें आंत। स्त्रिया म्हणूनी गेल्या घरांत। परी नाना शांतचित्तें स्वस्थ। बैसले बाहेर ओट्यावरी।।३८।। कांहीं वेळ जातांचि आला। शिष्य घाईनें पाचारूं लागला। 'चलावें आंत, आम्हांला। स्वामी रागें भरले हो।।३९।। तुम्हांसी कां ठेविलें बाहेर। आणावे आंतची सत्वर!'। वदती स्वामी, पहा अधिकार। कळलें अंतर्ज्ञाने तयां।।४०।। प्रवेशतां आंत नाना। स्वामी, प्रेमें वदती त्यांना। 'या पंडितजी!' जवळच आसना। बैसविती आपुल्या, सोंवळ्यांत जरी।।४१।। कुशल प्रश्न स्वामी करिती। कांहीं वेळ होतां निश्चिती। नाना उठावया लागती। कां कीं तेथील नियम तसा।।४२।। 'पांचदहा मिनिटांतच। उठावें नाना तुम्हीं हळूच'। सांगून झालें होतें घरींच। नमूताईद्वारा नानांसी।।४३।। तें आठवूनी





जेव्हां नाना। उठूं लागती तोंचि तयांना। खुणाविती स्वामी बसा ना। आणिक कांहीं वेळ जरा।।४४।। बैसले नाना स्थिरावून। स्वामी आंत शिष्यालागून। वदती, 'द्यावा चहा आणून। घेऊं आम्हींही यांचे सवें'।।४५।। आश्चर्ये थक्क जाहल्या। श्रोते! दोन्ही शिष्या भल्या। नानांसवें होत्या आल्या। परस्परां बोलती विचित्र सारें।।४६।। स्वामी कधींही न कोणाप्रती। अधिक समय बसूं देती। लगेच अर्वाच्य शिव्या येती। कानांवरी भक्तांचिया।।४७।। परी आज घडतें अघटित। प्रेमें स्वामींनीं केली सांगात। दीड तास तेथें नाना बैसत। प्रमुदित होते स्वामिवर्य।।४८।। अधिक येतां आनंदात। स्वामी लीलेनें तपकीर ओढत। तो चांदीचा डबा नानांप्रत। देऊन सांगती नानांसी।।४९।। 'घ्यावा प्रसाद यांतील थोडा। अनमान न करावा पंडितजी, सोडा। असला जरी नियम गाढा। आमुच्यासाठीं जरा तरी'।।५०।। ते वेळेपर्यन्त श्रोते। नानागुरु स्पर्शिलेही नव्हते। तपकिरीस परी स्वीकारिते-। जाहले केवळ स्वामींमुळें।।५१।। ते दिवसापासौन त्यांनीं। बाळगली तपकीर आठवण म्हणूनी। परी गुंतले नाहीं व्यसनीं। आजही असे जवळी डबी।।५२।। कांहीं वेळानें घेतला निरोप। पुढें तीनचारदां त्यांचे समीप। योग जाण्याचा आपोआप। जुळूनि आला नानांचाही।।५३।। प्रत्येक वेळी स्वतः समान। नानांसी त्यांनीं दिधला मान। स्मृती तयांची आज अजून। येते कधीं नानांस पहा।।५४।। ऐशीच गोष्ट

विलक्षण। नाना एकदां मुद्दाम दर्शन। केशवानंदांचें करण्या लागुन। आले गाडरवाड्याप्रती।।५५।। गाडरवाडा स्टेशन लहान। लागतें जबलपूरमार्गी रेल्वेंतून। नर्मदा तीरीं धुनी लावुन। बैसती तिथें केशवानंद।।५६।। बडे धुनीवाले दादाजी। म्हणुनी विख्यात होते स्वामीजी। बाह्यरंगीं नव्हते राजी। वृत्ती मुळींही जयांची।।५७।। अखंड धुनीची संगत। धगधगीत अग्नी उपासत। बैसती लोकांसमोर मोजत। शिव्या यथेच्छ आलेल्यासी।।५८।। जवळ फिरकूं देत नसत। कोणास नव्हती हिंमत। चकार शब्द काढतां सत्य। मारण्यास येती धावुनीयां।।५९।। वृत्ती पिशाचवत् उन्मत्त। परी शिव्या मिळतां आनंदित। होवोनियां लोक अमित। येती, कारण प्रचीती तयां।।६०।। नानागुरु आले येथ। होता दिवस जेव्हां मावळत। तोबा गर्दी भोंवतीं होत। भक्तजनांची स्वामींजवळी।।६१।। नानाही त्या गर्दीत मिसळले। त्या वेळीं स्वामी बैसलेले। होते धुनीजवळी, नैवेद्य सगळे। भक्तांचे स्वीकारीत शिव्या देती।।६२।। कोणा भक्तानें हंडीत एका। खिचडी आणिली होती देखा। स्वामींनी ती हंडी एका। दुरूनी बांबूसी अडकविली।।६३।। गरगरां फिरविती तो बास। लटकली खिचडीची हंडी त्यास। सांडूं न दिलें एकाही शितास। आंतील पहा तेधवां हो।।६४।। कांहीं वेळाने हे थांबविलें। घास घास अवघ्या भक्तां वाटले। नानाही तो घेण्यास सरकले। पुढें त्यांचे जवळी जरा।।६५।। दृष्टी पडतां नानांवर। हंसले स्वतःशींच





स्वामिवर। टाकिती न घास हातावर। नेमका केवळ नानांच्याच।।६६।। 'तुमको नही देंगे पंडितजी'। दरडावुनी वदले दादाजी। 'दूर बैठो' नव्हती मर्जी। त्या क्षणीं तरी नानांवरी।।६७।। पुढें झाली आरती गजर। रात्रीं दहा अकराचा सुमार। 'भागो यहांसे, जाओ घर'। हांकलले सर्व भक्तगणां।।६८।। फक्त उरले तेथ नाना। नव्हतें जवळी कोणी एव्हांना। शांत वृत्ती धरोनी त्यांना। वदती दादाजी प्रसन्नपणें।।६९।। 'पंडितजी भूल गया मै पूरा। भोजन रह गया तुम्हारा। टाकिला विक्षिप्तपणा सारा। दिवसाचा तो आविर्भाव'।।७०।। सवें घेऊनि नानागुरूंसी। हातीं कणिक, पाणी मडक्यासी। घेतले चार खड्यांसी। मिठाच्याही बरोबरी।।७१।। दूर जाऊन वृक्षातळीं कंडे चेतविले त्या माझारी। कणकेच्या बाट्या, आंत सारी। खडे मिठाचे एक एक।।७२।। शेकत असतां बाटी तेव्हां। बोलती मुक्तपणें नानांसी, "ऐकावा माझा पूर्ववृत्तांत बरवा। पंडितजी, पांघरतों वेड बळें।।७३।। वेडेचार करितों दिनभरी। नसती उपाधी लागते शेजारी। तुम्हांस पाहतां हृदयांतरीं। आनंद वाटला बहुत आम्हां"।।७४।। पुढें रात्रीं भोजनांतीं। उत्तररात्र होईंतों सरती। संवाद झाला उभयविभूतीं। अगम्य असे जो आजही मज।।७५।। मागती नाना आज्ञा मग। घडतां बहुत वेळ भजनरंग। स्वयेंचि दादाजी वदती, " भोग। घ्यावा इथेंची तीन रात्री।।७६।। चला धुनीवर जाऊं परत। दिवसा आपुली ओळखही न दावित।

वागावें, पंडितजी, लोकांप्रत। वेडापिसाच राहीन जाणा”।।७७।। ऐशा तीन रात्री श्रोते! यथेच्छ आनंद येई दोघांतें। पहा खऱ्या संतांतें। भेटतां पर्वणी उभयतांसी।।७८।। यास गेली कांहीं वर्षे। पुढें सिंहस्थासी येणे नानांचें। घडतां कळलें दादाजींचें। वर्तमान तेही आले ऐसें।।७९।। दूर एका बागेमाजी। होते शिष्यांसह दादाजी। नानांसी पाहतांचि,‘ पंडितजी! आईये ’ म्हणती प्रेमभरें।।८०।। ऐशा सुखद किती कथा। काय वर्णू मी संत संता। भेटतांना जो अनिवार चित्तां। होतो आल्हाद दोघांच्याही।।८१।। मौनीबाबा एक होते। सुरेंद्रनगराजवळी साचे। भेटले अवचित पर्यटनाचे। मुक्कामांत नानांसी।।८२।। वृद्ध होती मूर्ती अति। एका बोरीच्या वृक्षाखालतीं। लावूनी लहानशी राहुटी। आंत होते हनुमंत।।८३।। ओसाड जागा वाट जवळी। होता कुवा, रोज गवळी। तेथून ये जा करिती सगळी। आसपासची मंडळी पहा।।८४।। गांवापासून थोडें दूर। होते मौनीबाबांचे हें मंदिर। कळतां नानांसी, दर्शना सकळ। भक्तांसह जाती तेथे।।८५।। पाहतां नानांसी संतोषून। लिहून दाविती नमस्कारून। मौनीबाबा म्हणती ‘ भोजनालागून। यावे पंडितजी उद्या तुम्ही।।८६।। सर्व आपुल्या भक्तांसवें। माझे झोपडीत अन्न घ्यावें ’। उपास मोडूनही नाना “ बरवें ”। म्हणती आनंदें बाबांस त्या।।८७।। दुसरे दिनीं सकाळीं तेरा। भक्तांसह दहाचे सुमारा। पोंचले नाना उत्साह सारा। मावळला परी भक्तांचाच।।८८।।





कारण झाडाजवळी एकटेच। लंगोटी फक्त लावुनी अंगास। मौनीबाबा, लहान बुडकुल्यास। ठेविलें होतें दगडांवरी।।८९।। बैसावें अवघ्यांनीं साउलींत। चारसहा मालपुवे तळूं लागत। इकडे नानांवरी संतापत। शिष्य अवघे भडकले हो।।९०।। नाना, तुमच्या नादीं लागलों। व्यर्थ इथवर आम्ही आलों। तुमच्या शब्दीं विश्वासलों। मूर्खपणाचि असें अवघा।।९१।। एकालाही पुरेल इतुकें। अन्न नाहीं हें भातुकें। लहान मुलासी कौतुकें। देणार न कळे कांहीं आतां।।९२।। चार लहानशीं भांडीं बाबांनीं। आंत ठेविली पडद्यांत नेऊनी। सर्वांसी प्रेमें खुणावुनी। बैसविलें भोजना आग्रहानें।।९३।। आंत पुनः पुन्हा जावोनी। काढून आणिती भांड्यांमधुनी। विश्वास धराल मुळीं न मनीं। परी घडलें अघटित पहा।।९४।। नाना संगतीचे सकळ लोक। पुन्हां पांथस्थां पाचारूनी अनेक। गाईगुरांसी आग्रहें देख। दिलें अन्न बाबांनीं।।९५।। सर्वांना पुरलें यथेच्छपणीं। अवघे मिळूनी नव्वदजणांनीं। प्राशिला प्रसाद बाळांनी। मोजिले पहा त्या वेळीं।।९६।। ऐशी सलगी असते संतांची। गंगा यमुना संगमींची। पर्वणी वाटे दो हृदयांची। घडते जणुं अवनीवर।।९७।। कांहीं वर्षांपूर्वीची कथा। नाना एकदां पुण्यास असतां। गेले भेटाया प्रथमता। योगिराज श्री गुळवणींसी।।९८।। अस्वस्थ होते प्रकृतिनी। तेथ गुळवणी महाराज निजुनी। उभे राहिले हात जोडुनी। नाना, समोर जावोनियां ।।९९।। आधीं अवघी चौकशी केली। नानांनी ओळख देतांच जाणली। गुरुबंधुमूर्ती आली। आज अवचित आपुल्या घरी ।।१००।।

"द्विसाहस्त्री"गुरुचरित्र। मागितलें श्रीगुरुकृत पवित्र। लगेच उरलेली एकमात्र। प्रत स्वतःची दिधली तयां।।१०१।। नमस्कारिले नानांना। उठले सोडोनी आसना। निरोप दिला शिष्यांना। कथिलें नारळ द्यावयासी।।१०२।। श्रीनित्यानंद वज्रेश्वरीचे। रंगावधूत ते नारेश्वरीचे। बापुमहाराजही नागपूरचे। विख्यात त्या त्या प्रांतांत।।१०३।। देवासचे शीलनाथ। समाधींत इंदूरीं ते माधवनाथ। कार्तिकेयजी, सोनोपंत। दांडेकर वैकुंठीं गेले जे।।१०४।। असे जुने नवे असंख्य संत। भेटले प्रेमभावें नानांप्रत। अखंड संत-करुणेची वाहत। सरिता या देशामाजी।।१०५।। या अवघ्या अमृतपुत्रांसी। ईश्वराच्या आत्मप्रत्ययांसी। भेटणें घडतें भावबळेंसी। नानांसी आजही प्रत्यक्ष।।१०६।। संतकथा साऱ्या गोड मधुर। वर्णितां सरेल शब्दसागर। अंतीं उरेल ब्रह्म अपार। ऐकतां भवपार व्हाल तुम्हीं।।१०७।। नाना सांगती तैसेंच लिहितों। माझें न कांहीं यांत कथितो। साष्टांग वंदन वाहतों। चरणीं संतांच्या मी मनोभावे।।१०८।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्री नानागुरूंच्या आशीर्वचनें। 'मार्तण्ड-महिमा'पावन होणें। संतकथेने विजयमुखें।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते द्वादशोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।

## अध्याय १३वा - नानामहाराजांचे कैवल्य-ज्ञान-उपासना याविषयीचे प्रबोधन



।। सनत्कुमार त्यासी वदती । अवघ्या व्यवहार-विद्या असती ।
मानवासी कैवल्य प्राप्ती । अध्यात्मविद्येनें घडत असे ।।

# अथ त्रयोदशोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ नमस्ते चिद्गगना। चिद्वस्तुमय निर्गुणा। कोंदल्या तुझ्या आत्मखुणा। ठायीं ठायीं चराचरीं।।१।। मूल गंभीर उद्गीथा। ओंकार रूपा अमरनादा। परब्रह्माच्या पडसादा। निर्विकल्पा चैतन्यध्वनि।।२।। नाहीं फुटली शब्दपालवी। ऐसी अमृत स्वरवेली। अणुरेणूंच्या अंतरीं घुमली। संथ चिरंतन आनंदमयी।।३।। त्रिभुवनाच्या हृदयाकाशीं। निश्चळ निळ्या नभासी। अपार सागरजळासी। नादावसी नित्यगहना।।४।। सहस्त्र सूर्यांच्या किरणांसी। चमचमत्या तेजकळीसी। स्वयंप्रभेची होऊनि मुशी। खेळसी तूं ओंकारा।।५।। लपूनी जलबिंदूंचे उरासी। निर्मळ सृजनाचें गीत गासी। सृष्टींतल्या सौंदर्यगंगेची। सुप्त प्रभा गंगोत्री।।६।। जडवस्तूंमधील आत्मशक्ति। सूक्ष्मान्तरींची चेतना तरळती। कालचक्राची अखंड गति। विद्युल्लतेचें स्फूर्तितेज।।७।। देहामधली सजीवता। देवांमधली तूं दिव्यता। ब्रह्मरूपाची भव्यता। संवेद्य होय तुझिया मुळें।।८।। तूं चिन्मय ओंकार ज्योती। निखिल सुरांची होय विश्रांती। उजळलें विश्वमात्रा प्रती। सहज लीले व्यापोनियां।।९।। ओंकाराच्या पोटीं आली। शब्दसृष्टी जगतांतली। हृदयीं सर्वांच्या फुलली। आत्मज्ञानाची चंद्रकला।।१०।। हे ज्ञानाचें दिव्य चांदणें। विश्वाच्या अंगांगी सांडणें। ओंकाराचें

गात गाणें। डोलते विश्व आत्मानंदीं।।११।। त्या आनंदाच्या अद्‌भुत गीती। आत्मविदांना ऐकूं येती। धन्य जीवनें त्यांचीं असती। चिरंजीव जगीं अलौकिक।।१२।। विश्वाचे अष्टधा प्रकृतीनें। बांधिले सकळ व्यवहार गुणें। जडचेतनांचे सदैव वर्तणें। एका वर्तुळीं क्रमबध्द।।१३।। मूल द्रव्यांचें एकीकरण। पदार्थांची निर्मिती त्यातून। निसर्गलीलामात्रें करुन। वस्तुमात्राचें विघटन पुन्हां।।१४।। निर्मिति स्थिति आणि लय। सातत्यें चक्र फिरत जाय। नामरूपांनीं परिवर्तनीय। जग भासे नित्य नवें।।१५।। तरी अवघे जुनें नवें। संत सज्जन सांगती, गावें। परमेश्वरासी मनोभावें। जेणें होई कृतार्थ नर।।१६।। सुधारलेल्या जगीं करिती। केवळ भौतिकतेची आरती। विसरून मूळ स्वरूपाप्रती। चराचराचें जीवन जें।।१७।। एकदां सद्‌गुरु नानांप्रती। निवांत पाहूनियां एकांती। पुसता झालों कैसी रीती। विचित्र दिसते जगांतील।।१८।। जो तो धावतो पोटापाठीं। अवघी आयुष्याची आटाटी। चाले फक्त सुखासाठीं। दिसे अवघ्या जगांतील।।१९।। अनामिक जीव जगीं येतो। आमरणान्त कष्टत जातो। सर्व ज्ञान राबवितो। अखेर आपुले उदरार्थ।।२०।। बरें वीतभराच्या पोटाची। न होते कधी शांती साची। किती भरले तरी उपाशी। हपापे आहुतीप्रीत्यर्थ पुन्हां।।२१।। जगड्व्याळ हें ईश्वरी यंत्र। अनाकलनीय विचित्र। विचार करितां नेत्र। भोंवळूं लागती अपारतेनें।।२२।। इथल्या जगीं आहे प्रकाश। परी अंधाराची सोबत







त्यास। सुखाचिया चंद्रमुखास। कलंक आहे दुःखाचा।।२३।। काल ज्याची चित्तास आवडी। वाटे विचित्र आज गोडी। अमर सुखाची न दिसे थडी। उभ्या अवघ्या आयुष्यांत।।२४।। बुद्धि-भावनांचीं मिरवुनी लेणीं। अखंडपणें धडपडुनी। सुखाचें क्षितिज दुरोनी। खुणावतें आम्हांलागीं।।२५।। कधीं जरी करितां विचार। ओढ लागते अनिवार। दृश्य भौतिकाच्या पार। भासतें कांहीं आनंदमय।।२६।। केवळ अपार सुख आनंद। भोगावा वाटे परी साद। वासना घालूनीयां धुंद। ओढून नेते मनालागीं।।२७।। वासनापूर्तीनें मिळेल सुख। आरंभीं जरी भासे देख। परी भेटीस येतें दुःख। भोगूं जातां अनुभवासी।।२८।। कृपाळुवा देवा आज। अमर आनंदाचें बीज। कुठें शोधूं सांगा मज। मी पामर अज्ञानी असें।।२९।। वाग्वाद करिती लोक अनंत। किती देवता किती पंथ। उपासनांचे हाट येथ। जागोजागीं भरलेले।।३०।। सत्य काय असत्य कोणतें। मानवाचें कोठें चुकतें। कैवल्य सुख प्राप्तीतें। कैसे पावावे दीन आम्हीं।।३१।। विनवुनीयां चरणांसी। जधीं विचारिलें श्रीगुरुनानांसी। वोळला तो कृपाराशी। आनंदमेघ पाझरला।।३२।। सोडूनियां ऐहिक कथा। बरें विचारिलें तुम्हीं आतां। पाहोनियां जिज्ञासु चित्तां। वाटे सांगावें मनींचें गूज।।३३।। करोनी आतां एकाग्र चित्त। ऐकावी जी गहन मात। विराट या जगांत। कैसा ईश्वरी विलास चाले।।३४।। जरी सकळ विद्या अभ्यासिली। परी हृदया शांती न गमली।

ही नसे आजच आली। प्रचीती मानवी मनासी या।।३५।। पूर्वी कठोपनिषदांत येई। कथा एक ऐशीच पाहीं। नारद अशांत चित्तें जाई। सनत्कुमार ऋषींजवळी।।३६।। भगवन् मुनिवर्या मजला। कांहीं सांगावें रहस्याला। अवघ्या विद्या सांग पढिल्या। परी न लाभलें शांतितीर।।३७।। चार वेद, इतिहास, पुराणें। तर्कशास्त्र न्याय दर्शनें। धुंडाळिलीं चोखट मनें। काया शिणवुनी आजवरी।।३८।। जाहलों केवळ मंत्रवेत्ता। ब्रह्मरूप नेणतां। आत्मविदांच्या आनंदचित्तां। नाहीं भोगिलें अद्यापी।।३९।। सनत्कुमार त्यासी वदती। अवघ्या व्यवहार-विद्या असती। मानवासी कैवल्य-प्राप्ती। अध्यात्मविद्येनें घडत असे।।४०।। सुखासाठीं आनंदापाठीं। मानवाची पाउलें धांवती। कारण चिदंशें त्याची उत्पत्ति। मूळरुपी आनंदची।।४१।। आपुल्या मूळ रूपाची। आनंदरूप चैतन्याची। अपार निर्द्वंद्व परब्रह्माची। तहान लागते सदा त्याला।।४२।। पाणी अवघें सहजतेनें। उतार शोधुनी गाते गाणें। सागराशीं मला मिळणे। माहेर माझें अपाररूपीं।।४३।। तैसें आपुलें मूळ स्वरुप। चिदानंद नित्य सत्यरूप। कैसा आपणाला दुःख व्याप। आवडला चित्तांतुनी।।४४।।सुखानंदाकडे ओढ। हे तों प्रकृतिस्वभाव जोड। परी मार्ग मात्र आहे अवघड। निर्मळ आनंद-धामाचा।।४५।।पाळूनियां कांहीं पथ्यें। जरी चोखाळूं आपण वाट। तरी भोगूं निःशंक अवीट। निर्मळ सुखप्राप्तीसी।।४६।। आयुष्याच्या पथांतरीं। विषयांचे सोबती बरोबरी।





आपुल्या मायारंगी जरी। भुलविती आपणां वेळोवेळीं।।४७।। विषयसुखांचे मोहक हाट। पसरले जागोजागीं अफाट। लोभावुनी आपुले चित्त। आकर्षिती इंद्रियांना।।४८।। शब्द स्पर्श रूप गंध। कोमल मोहक मृदुल सुगंध। मधुर रसाचे नित्य स्वाद। कोड पुरवी जिव्हेचे।।४९।। जागी ठेवूनी देहबुध्दी। धांवुनी भेटते मन आधीं। भोगरूपें लक्षावधी। पदोपदीं दिसतांक्षणीं।।५०।। मन सदा आशाळभूत। भोगासाठीं तळमळत। इंद्रियें बिचारी जातात। आज्ञा ऐकोनी मानसाची।।५१। ध्यानीं चिन्तनीं पदार्थभोग। घडतां नित्य चित्तसंग। विकार घेती ताबा मग। चंचल करिती दुबळ्या मना।।५२।। न मिळतां भोग दुःख क्रोध। मिळतां अतृप्ती विषयांध।भोग आहुतीनें चढे मद। लालसा अधिक भोगाचीच।।५३।। – ।।श्लोक।। –।। त्रिविध नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः। कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत्।। गीता १६.२०।। भगवंतें श्रीगीतेठायीं। नरकद्वारें कथिलीं पाहीं। काम क्रोध लोभ तीहीं। चित्तास जाळिती अनिवार।।५४।। परी आपुलें कर्तव्य एक। सांगतो बाळा जरी अनेक। भोगवस्तूंची दाटी देख। भोंवतीं असे दाटलेली।।५५।। बुध्दी ठेवुनी जागृत। सदा असावें निरखीत। शाश्वत काय अशाश्वत। पाहावें चिंतनीं शोधुनी।।५६।। नित्य काय अनित्य कोणतें। बुध्दी सदैव जी पारखते। विवेक नांव त्या वृत्तीतें। देती जाणते चोखट।।५७।। मोक्षसाधनीं साहाय्यक। वदती आचार्य चतुष्टय ऐक। नित्यानित्यवस्तुविवेक।

त्यांते अग्रणी मानिलेला।।५८।। कायिक वाचिक मानसिक। त्रिविध क्रिया घडती देख। जागृत असला तरी विवेक। भोगबाधा न हो मना।।५९।। मोक्षधामाची भव्य बांधणी। केली अनेक साधनांनीं। विवेक शोभतो पाया होउनी। आधारभूत अवघ्यांना।।६०।। कडा अवघड ओलांडतां। जराही विवेक-संगती सुटतां। साधकाची होय अवस्था। अधःपतित हीन दीन।।६१।। कर्म,भक्ती आणि योग। असो कोणताही आपुला मार्ग। परी विवेकाचा जाग। नित्य हवा चित्तासी।।६२।। आचार्य वदती दुसरें साधन। इहपर लोकांविषयीं पूर्ण। फलभोगाविषयींची जाण। समूळ असो अनासक्ति।।६३।। कर्मफला नको स्पृहा। गीतेतही विचार हा। मुख्य सांगती श्रीहरी पहा। अर्जुनासी आवर्जूनी।।६४।। इहपर भोगांचा विराग। म्हणजे भोगांचा नव्हे त्याग। फलाविषयीं अनुराग। नुपजो मनीं यत्किंचित।।६५।। षड्गुणांची संपत्ती। सांठवुनी असावी चित्ती। शम, दम, तितिक्षा, उपरती। श्रध्दा आणि समाधान।।६६।। स्वाधीन असल्या आपुलें मन। घडतां मनोनिग्रह पूर्ण। म्हणती त्यासी 'शम' गुण। आचरणीं आकारलेला।।६७।। बहिर्मुख अवघ्या इंद्रियांची। श्रवणनेत्रादिकांची । गति निरोधुनी साची। विषय भोगानुवर्ती जी।।६८।। जेव्हां राहाटे साधक। तेव्हां ते होई जाचक। इंद्रियांचा दंडक।'दम'गुण होतो सहजची।।६९।। सुखदुःखात्मक द्वंद्वधर्म। शांत दांत साधक सम। साहतो होउनी धैर्यधाम।' तितिक्षा ' प्रगटे






तेथेंचि।।७०।। सदैव असोनी स्वधर्मरत। आत्मचैतन्य साक्षीभूत। जाणूनि स्वरूप शोधत। अलिप्त भावें जगतांना।।७१।। तिथें उपजे 'उपरम'। परी सकळ साधना मर्म। असावी हृदयीं श्रद्धा परम। गुरु-वेदवचनांवरी।।७२।। चित्ताचें नित्यानुसंधान। या नांव जाणें समाधान। श्रध्देनें होऊनी निमग्न। गुरुस्वरूपीं गहनगूढ।।७३।। आणि जधीं लागे तळमळ। कधीं होईन पैलपार। परमानंदाचे गाभार। पाहीन ती 'मुमुक्षा'जाण।।७४।। विवेक वैराग्य गुण संपत्ती। मुमुक्षा तळमळ चौथी। साधक अभ्यासें जे आचरिती।तत्त्व जाणण्या अधिकारी ते।।७५।। नित्य सर्वगत सर्वातीत। शुध्द आनंदाचा अखंड स्त्रोत। निर्विकार चैतन्य स्वयंभू सत्य। तेजोमय जो 'आत्मा'असे।।७६।। रूप त्याचें यथार्थ। जाणोनियां भोगतात। साक्षी होवोनि सदा रत। आनंदरूप डोह स्वतः।।७७।। स्थूल सूक्ष्म आणि कारण। त्रय शरीराहूनी भिन्न। आत्मा अविकारी संपूर्ण। सच्चिदानंद-रूप पहा।।७८।। पंचमहाभूतांचें पंचीकरण। घडतें स्थूल शरीर तयांतून। सुखदुःखांचें आश्रयस्थान। षड्विकारें विद्यमान।।७९।। अपंचीकृत महाभूतांनीं। सत्कर्मजन्य सतरा कलांनीं। अदृश्यपणें आकारोनी। सूक्ष्म शरीर वर्तत असे।।८०।। अनिर्वाच्य निर्विकल्प अनादिसिध्द। स्थूलसूक्ष्मासी अधिष्ठानभूत। तें कारण शरीर अनुभूतींत। येते केवळ चिंतनमात्रें।।८१।। शरीरत्रयाहुनी आगळा। अवस्थात्रया वेगळा। पंचकोषाहुनी निराळा। आत्माराम असे पूर्ण।।८२।।

पंचकोष म्हणती कशास। सांगावे उकलोनी संज्ञेस। विचारिलें जोडोनी करांस। नानागुरुंना विनयानें।।८३।। सांगेन सकळ विस्तारोन। पांच कोषांनी देह पूर्ण। प्रत्येकाचा असोन। जाणीव मात्र कधीं नसे।।८४।। अन्नमय प्राणमय मनोमय। विज्ञानमय आनंदमय। हीं तयांची नावें होय। शरीरगत असती आपुल्या हे।।८५।। निर्मितें आपणास अन्न। वाढवितें देहास पोसुन। अखेर पृथ्वीमय असती जाण। रिचवितें आपुल्या उदरामध्यें।।८६।। तैत्तिरीय उपनिषदीं गाथा। ऋषिवर्य वंदिती माथा। सर्वौषाधि अन्नदेवता। अन्नाद्वै प्रजा:प्रजायन्ते।।८७।। अन्नमय कोषाहुनी वरी। प्राणमय कोष जाण शरीरीं। पंचप्राणांमाझारीं। खेळतो पंचेंद्रियांमध्यें।।८८।। प्राणापान व्यान उदान। पांचवा प्राण तो समान। वाणी चक्षु श्रोत्र घ्राण। जिव्हा मिळूनी इंद्रियें पांच।।८९।। यांचा समूह एकवटून। देहाची चाले क्रिया पूर्ण। प्राणमय कोष देहधारण। चैतन्यबोधक ठरे सदा।।९०।। ज्ञानेंद्रियें पांच असती। मनासंगें जेव्हां मिळती। मनोमय कोषाची निर्मिती। होते त्यातून देहांतरीं।।९१।। आपुली जी इच्छाशक्ति। स्वाभाविक ती असे वृत्ति। मनोमय कोषाची प्रकृति। जाणावी ती निश्चित।।९२।। बुद्धि मिळतां ज्ञानेंद्रियांसी। म्हणजे श्रोत्रादि पंचकासी। विज्ञानमय कोष ज्ञानशक्तीसी। मानिती तेव्हां बुद्धिमंत।।९३।। अन्नप्राणमनोमय। कोष चवथा हा विज्ञानमय। प्रत्येकाचा होई लय। अनुक्रमें सूक्ष्मतेनें।।९४।। विज्ञानमय कोषाहुनी भिन्न।





तयाच्या अन्तरस्थितीमधून। त्रिगुणांतील सत्त्वगुणप्रधान। सुख स्वभावीं आनंदमय।।९५।। आनंदाची अनुभूती अतिशय। दाता कोष अन्नमय।अज्ञानें परि जो होय। मलीन सत्त्व गुणानंद।।९६।। शरीर अवघ्या कोषातीत। जो पाहतो आत्मा सत्य। तोची भोगतो अखंड नित्य। निर्विकल्प आत्मानंद।।९७।। या अवघ्यांपासौन। आत्मा निश्चित अविकारी पूर्ण। केवळ साक्षी यांचा असून। अलिप्ततेनें वावरत असे।।९८।। कोषादि मायाकृत मायामय। सारे पावती अखेर लय। अनादि मात्र आत्मा अद्वय। अखंड स्थितींत निसर्गतः।।९९।। सत् चिद् आणि आनंद। हेंचि त्याचें स्वरूप अगाध। जाणती निखिल मुनी सिद्ध। तदाकार होवोनियां।।१००।। जें त्रिकाळीं अविकळ। एकरूप स्वतंत्र निश्चळ। तत्त्व राहें तेचि केवळ।‘ सत् ’म्हणावें अमरवंद्य।।१०१।। ज्ञानाचें जें स्वयंभू स्फुरण। प्रकाशरूप स्वत:च गहन।‘ चिद् ’ अंश ती आत्मखूण। जाण निश्चयें तेथेंची।।१०२।। स्वरूप अवघें ओळखून। अनाद्यनंत चैतन्य आपण। एकंकार चिद्ब्रह्म गगन। ॐकारमय ‘ आनंद ’ तोची।।१०३।। ऐसें अनुपमेय आनंद निधान। आत्मा सच्चिदानंदघन। भोगूं जेव्हां आपुलाचि आपण। कृतार्थ तेव्हांची आपण खरे।।१०४।। संकल्पाची सरेल वारी। तेव्हां स्वानंदाच्या सरोवरीं। निर्मळ सुखाच्या माहेरीं। पोंचतों आपण नि:संशय।।१०५।। हें नव्हे कल्पित अद्भुत। हें तों अनुभवांचे जाण मथित। अधिकारी कैवल्याचे होत। साधक पोंचतां

मुक्कामीं।।१०६।। मागें कितीक सत्पुरुषांनीं। अमृत चिन्मय प्राशुनी। धन्य केली काया भोगुनी। देहींच भोगुनी विदेहस्थिती।।१०७।। विदेहस्थिति कशास म्हणती। तें सांगावें श्रीगुरुमूर्ती। विनवुनी म्यां नानांप्रती। विचारिलें तात्काळची।।१०८।। श्री गजाननांच्या प्रेरणें। श्रीनानागुरुंच्या आशीर्वचनें। हें ज्ञानाचें लुटावें चांदणे। विजयमुखें पुढिलाध्यायीं।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते त्रयोदशोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय १४वा - अज्ञानतम विनाशी-सद्गुरु नाना तेजोराशी



।। कीं आचारधर्म आघवा । सृष्टीमाजी अभंग टिकावा ।
हेतु भगवंताचा जाणावा । गीतेठायीं हाचि गमे ।।

# अथ चतुर्दशोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ जयोऽस्तु ते निरंजना। मुनिजनमानसरंजना। जगदीशा जगन्नारायणा। परब्रह्मा स्वयंप्रकाशा।।१।। तूं तेजात्मक तेजोराशी। अज्ञानतमविनाशी। प्रज्ञाप्रभात होउनी होशी। भक्तहृदयी मंगल।।२।। श्रीगुरुकृपेचीं वरददृष्टी। उजळवीत अवघी सृष्टी। वत्सलतेनें करिसी वृष्टी। भिजविसी भक्त-अन्तःकरणें।।३।। तुझ्या प्रसादाची कौमुदी। कोमेजल्या मुखारविंदी। सांडतां न्हाऊनि आनंदीं। फुलोनी डोलती भक्तमनें।।४।। विसरलेली मूळ खूण। तुझ्या दर्शनीं पुन्हां लाभून। भ्रमंती अवघी सरून। परंधाम अपुलें गवसतें।।५।। भ्रांतचित्त पाहुनी अनन्य। तूं होतोसी साकार सगुण। निजात्मबोधाचें अंजन। आर्त लोचनीं घालावया।।६।। जैं दिसतां स्वरूपखाण। निराकार पुन्हां निरंग होऊन। आपुल्या अपार रूपांतून। पाहसी विश्वनाटकासी।।७।। कापुसाची वस्त्रें होणें। अलंकार घडवितां सोनियानें। मूळ स्वरूप कां त्यागणे। शक्य असे दोहोंसीही।।८।। वस्त्रांतील धागा प्रत्येक। रूपवैचित्र्यें दावुनी अनेक। कापुसाचा शृंगार एक। वस्त्र विणतां भासे नवा।।९।। सोनें आगळ्या घाटांतुनी। अलंकारीं विनटतें सजुनी। मूळ रूपा शृंगारोनी। उभें ठाकतें आपणापुढें।।१०।। तैसे परब्रह्माचे मोहक शृंगार। अखिल सृष्टी विश्वाकार। विलोभनीय

रूपें सुंदर। घडला असे सहजलीले।।११।। आकार नसती अक्षर। घडती मोडती साचार। परी मूळ स्वरूप अभंग सार। अवघ्यांपासोनी निराळेंचि।।१२।। त्या मूळ अव्यक्त अरूपा। परब्रह्मनिधिस्वरूपा। वंदन आत्मयाच्या आत्मरुपा। सद्‌गुरुमूर्तीत सांठलेल्या।।१३।। सद्‌गुरुस्वरूप नाना मुद्रा। भरती आली आनंदसमुद्रा। निवटोनी अवघी अज्ञाननिद्रा। जागवीतसे वत्सालागीं।।१४।। देही असो विदेही। किती तरले मार्गे पाही। परमात्म्याची फिरविती ग्वाही। त्रिभुवनीं आनंदें आपुल्या।।१५।। ध्येय, ध्याता, ध्यान। अवघें एकरूप होऊन। आनंदाची लुटती खाण। तल्लीन भक्तींत होऊनियां।।१६।। आपुलें परब्रह्म माहेर। अवीट सुखाचें गाभार। द्वैतमिषें येतें समोर। परी साररूपें दोन्हीं एक।।१७।। निजानंदीं निमग्न पूर्ण। ऐशा अपार ब्रह्मालागून। मायेनें आपुल्याच आंगडें घालून। सर्वत्र झांकिलें गगनापरी।।१८।। आषाढअभ्रे झांकोळली। जेवीं गगनाची प्रभा निळी। दाविते अनिवार काळी। छाया आपुल्या लोचनांसी।।१९।। संसाराची जन्मदात्री। चैतन्यज्ञानाची गंगोत्री। विश्वाची विलोभनीय दे नेत्रीं। मायाशक्ति जाणीव ही।।२०।। पंचदशीं बोलिले भगवंत। उर्ध्वमूल हा अश्वत्थ। संसाराचा वृक्ष उपजत। मायेपोटीं विचित्र हा।।२१।। ही मोहमयी मायाशक्ति। अनिर्वाच्य प्रबळ प्रकृति। अपार नभाची उत्पत्ति। जगत्कारणा करित असे।।२२।। आकाश प्रसवलें अनिलासी। वायूपासुनी उद्‌भव तेजासी। तेजांतुनी जन्मली





जलराशी। पृथ्वी अपत्य जळाचें।।२३।। सात्विकांश, पंचतत्त्वांचे। प्रसव श्रोत्रादि इंद्रियांचे। अंतःकरण चतुष्टयाचे। उद्‌गम तयापासौनी।।२४।। मन, बुद्धि, अहंकार। आणि चित्त हे प्रकार चार। अंतःकरणाचे साचार। तेही पंचतत्त्वीं जन्मलेलें।।२५।। ऐसीं ज्ञानेंद्रियें आपुलीं। पंचतत्त्वांपासौनी आलीं। तैसी रजोगुणांशें निघालीं। कर्मेंद्रियें सकळ जाण।।२६।। रजोगुणीं कर्मेंद्रियें पांच। आणि पंचप्राणही तेच। मिळूनी घडविती पिंडास। तामसांश तयांत मिळे।।२७।। पंचभूतांतुनी पिंडाची। सगुण मूर्ती ये आकारासी। त्रिगुणात्मक या मायेची। लीलाशक्ति विचित्र ही।।२८।। दिसे भासे जगत् हें सकळ। वरती अज्ञानतमाचें पटल। निरसतां ज्ञानें अविकळ। प्रकाशित सर्वत्र परब्रह्म सघन।।२९।। सूर्याची दिव्य तेजदीप्ती। निघते सूर्यमंडलांतुनी निश्चिती। आकाशीं तळपती भास्करमूर्ती। पाहुनी प्रचीती घेणें तिची।।३०।। जाणवे किरणांची दाहक उष्णता। दिसे नेत्रांसी त्यांची उज्ज्वलता। अंधाराचें न दिसे तत्त्वतां। नांवही कोठें विश्वांतरीं।।३१।। या अनुभूतीच्या आधारानें। सूर्यबिंबीचे तेज कल्पिणें। परब्रह्मही वस्तुमात्रानें। ओळखावें अपरंपार।।३२।। तुम्ही, मी आणि विश्व सारें। चैतन्याचे विलास न्यारे। अज्ञानाच्या अंगणी खेळणारे। लटिकेच अज्ञानी होउनियां।।३३।। परमार्थानें ज्ञानाज्ञान। दोन्हीं निरसोनी निर्मळ चैतन्य। प्रभा विराली दीपकुशी लागुन। तैसे मिळूं हो परब्रह्मीं।।३४।। मीच नटलों विश्व होउनी। विश्व माझेंच नांव घेऊनी।

विलसतें नाना रसरंगांनीं। माझीच रूपें अंतर्बाह्य।।३५।। फक्त ऐसी चैतन्यस्मृती। येते जयास सदैव प्रतीती। मग देहींच विदेही ती विभूती। सहजलीले दिसे जगीं।।३६।। 'सर्वं खल्विदं ब्रह्म' जरी। कशास मिथ्या म्हणूं तरी। पिंडीं पदीं माझीच सारी। फांकलेली विश्वप्रभा।।३७।। आत्म्याची अवघी प्रतीती। जया आधारें लोक म्हणती। तीही माझीच कां न निर्मिती। मानावी गा प्रसन्नपणें।।३८।। या कारणें जडचेतन। दोन्हीं खरें मजलागून। जाणण्यास्तव निमित्त होऊन। जड नांव दिलें मीच मला।। ३९।। अद्वैताची अवघी अनुभूती। संपतां द्वैतभाव येतो म्हणती। द्वैताधारेंच पुन्हां विवरिती। अद्वैताचें एकपण।।४०।। मजला वाटे श्रीकृष्ण अर्जुन। द्वैतपणा न मोडतां जाण। हृदया हृदय झाले मिळून। द्वैतांतही अद्वैत असे।।४१।। राखोनी दोन्ही शुध्द द्वैता। विश्वची व्हावें ब्रह्म तत्त्वतां। मिथ्यापण कुणाचें कोण पटविता। ज्ञानाऽज्ञान मावळे जें।।४२।। चित्शक्तीचा चैतन्यपसारा। घवघवीत सगुण जगीं सारा। दुःखांचा शीण वाटे सोयरा। विस्मृतीचा चित्तांतील।।४३।। म्हणोनी मागणें विश्वंभरा। तुझ्या चरणीं देवोनी थारा। माझ्या स्मृतीचा मजला चारा। द्यावा तुवां चैतन्याचा।।४४।। मोह निमाला स्मृती मिळाली। अर्जुन-वाचा अखेर वदली। गीता गाऊनि अखेर खेळली। लीलामात्रें प्रभुमूर्ति।।४५।।अद्वैताच्या श्रोते! तेजाला। डोहाळे विश्वांगणीं येण्याला। सुचती अवतार घ्यावयाला। निमित्त करी तें युगांतरी।।४६।।






स्त्री-पुरुषांचीं जितुकी जीवनें। आश्रम वर्ण जगीं येणें। गर्भवासीं आवडे खेळणें। युगायुगींही ब्रह्मासी या।।४७।। संसार असार मुळींही न वाटे। इथेची विहरूनी चैतन्य भेटे। सद्‌बुद्धीनें जाणुनी जगातें। मोक्षमय केला संसार मीची।।४८।। सर्वांसीही सदा प्रतीती। खचित माना येईल निश्चिती। विस्मृतीची मोहक मिठी। संतस्पर्शे होतां दूर।।४९।। मग सद्‌गुरु आणि शिष्य त्यांचे। जितुके जगीं दिसती नांवांचें। प्रकार केवळ चैतन्याचे। जाणा ब्रह्मचि उभयतांसी।।५०।। सत्‌शिष्यभावें सद्‌गुरूंचें। लीलानाटक चाले साचें। निमित्त ब्रह्मभावें पटविण्याचे। जगांतील लोकांलागीं।।५१।। कीं आचारधर्म आघवा। सृष्टीमाजी अभंग टिकावा। हेतु भगवंताचा जाणावा। गीतेठायीं हाचि गमे।।५२।। विदेही जितुक्या झाल्या विभूती। समत्व मानुनी सर्वा भूतीं। ब्रह्मभावें सदा जगती। राहिल्या कर्म करोनियां।।५३।।..।।श्लोक।।..“ ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्। तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यचिद्धनम्।। कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः। एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे।।” ईशा०-१-२ या श्रुतिवचनीं विश्वासले। संचितें कर्म जें सोंपविलें। तें अकर्मा होऊनी जरी केलें। न लिंपे दोष त्याचा तरी।।५४।। आणि भेटतें जीवभूत नित्य। माझेंच रूपडें मानुनी सत्य। वागावें जगीं कृतकृत्य। होउनी स्मृतिरूप चैतन्यब्रह्म।।५५।। होई न देहाचा अडथळा। मग कर्माचा न ये

कंटाळा। जगासी, संसारासी टाळा। देणें कशास्तव येऊनियां।।५६।। अखंड असावें साधनारत। निरंतर गुंतवावें जपांत। काया वाचा मनाप्रत। श्रीदत्तांच्या मोक्षनामीं।।५७।। नित्यनिरंजन निराभास। नादबिंदुकलातीत रूपास। ध्यावें निजध्यासें नामास। आळवावें आर्तपणें।।५८।। कर्मरूपें कर्मठपणें। योगांत अचूक सावधपणें। भक्तींत भाव उत्कटपणें। धरोनी ध्यावा श्रीहरी तो।।५९।। दिने दिने क्षणो क्षणीं। करावी जपाचीच उजळणी। जपयज्ञोऽस्मि ऐसी वाणी। बोलली विख्यात गीतेठायीं।।६०।। विस्मृतीचा दाट अंधार। उजळून मनाच्या चौरंगावर। बघावें श्रीगुरूंचें रूप सुंदर। लखलखीत सोज्ज्वळ लावण्यतेज।।६१।। मानस-पूजन तल्लीनमनानें। वाहावे मंत्रराज गात गाणें। अष्टभावांच्या कमलसुमनें। करावी रोज आत्मपूजा।।६२।। षट्चक्रांच्या उमलवीत पाकळ्या। चिद्गंध घमघमतां सगळ्या। देहांतूनी विश्वांतल्या। चैतन्यकणांत उधळून द्यावा।।६३।। वायुमंडलांतील लहर। जळांमधले तरंग अनिवार। पृथ्वीतले गंध सुमधूर। दीप्ती ल्यावी तेजांतील।।६४।। अखेर विश्वाचा शांत विलय। आकाशीं विरोनी क्रमानें होय। पहावी आजच चित्-शांति सोय। अंतरीं पूर्ण प्रत्यक्षची।।६५।। परंधामीं परा शांति। वदते विश्रांती जया श्रुती। नित्य सांभाळोनी चित्तीं। ठेवावी तिला साधकानें।।६६।। निश्चळ निरामय शांतीत। प्रसन्न अंतःकरणीं डुंबत। निजनामाचें आठवीत। अनामरूप अमरपणें।।६७।। विराग आणि







निवृत्ती। नव्हे अनुरागाची उलट प्रवृत्ति। वस्तुमात्रांतरींची अंतरस्थिति। पाहण्याचे चक्षूच हे।।६८।। विकारांचा अधिकार केवळ। नको माझेवरी सोज्ज्वळ। येरवीं विकार वर्णिती चराचर। यथार्थतेनें जगास अवघ्या।।६९।। विकार नव्हे मुळीच विकृति। ती सृष्टीची स्वभाववृत्ती। चैतन्यविलासाची रंगसंगती। लागे जयांच्या दर्शनमात्रें।।७०।। वृक्षलताफुलांमधून। तैसें चैतन्य नरनारींतून। हांसतें त्यांचें दर्शन। लीलाखेळ ते ईश्वराचे।।७१।। जीवनाचें मुक्ति महाद्वार। जगतांत लाभे अनिवार। संचितसंकेता भोगुनी पार। अपार आत्मप्रत्यय घ्यावा।।७२।। सद्बोध संतांचा सेवित अखंडित। जाणावें द्वैतांतलें ब्रह्म प्रकाशित। साधन आराधनें समाधीत। भोगावें आपण आनंदानें।।७३।। अनुसंधान मात्र नित्य। असावें साधकाचें आर्त जागृत। सावधमनें सदा सत्य। शोधावें पुन्हां हृदयांतची।।७४।। न शोधावें गुरूस आपण। करीत ठायीच निवांत साधन। घडतां विभूतींचें पथांत दर्शन। घ्यावे मात्र तळमळीनें।।७५।। खरे सद्गुरु करुणावत्सल। परिपक्व साधना पाहतां सुफल। कराया धांवती शिष्याजवळ। असे श्रध्दा बलवत्तर जरी।।७६।। श्वासोच्छ्वासीं घ्यावें। हृदयतालावरी दंग व्हावें। टाहो फोडोनी हांकारावें। सद्गुरूंसी अपुल्या उत्कटपणें।।७७।। उदरार्थ करणें कर्तव्य नियत। एरवी एकांतीं शांत चित्त। वृत्ती एकवटोनी जगांत। खेळतें चैतन्य पहावें भावें।।७८।। धुंडाळाल वेदशास्त्रांसी। तितुके पहाल विधिनिषेधांसी।

सर्व सोडुनी हृदयाकाशीं। सद्‌गुरु शोधावा मायबाप।।७९।। उपनिषदांनीं एकमुखानें। अवघ्या जरी शब्दसृष्टीनें। वर्णिलें सद्‌गुरूंचें रूपलेणें। अरूपाचें हें निजरूप खास।।८०।। श्रीगुरुमूर्ती प्रज्ञान घन। चैतन्य विश्वाचें एकवटून। मुसावलें मूर्तिमंत पूर्ण। परब्रह्म हें उदार शुध्द।।८१।। संतमहात्मे गुरुदेव जरी। स्मृती देती जयास खरी। आनंदाच्या अमृतसागरीं। निवांत राहे तो जीवनांत।।८२।। स्वयेंची होउनी चिंतामणी। भोगतो तो कैवल्यखाणी। विदेहीपणें मुक्त होउनी। वर्ततो देही असोनि जरी।।८३।। अलिप्त सर्वांत असोनी नसून। कर्मे करूनी असंग राहून। जगांतील रंगांनी रंगून। नामें रंगतो अंतरंगीं।।८४।। सदा शांत मौनधारी। अबोलता बोलतो अनंतपरी। हास्यें त्याच्या सृष्टी सारी। प्रसन्न दिसे क्षणार्धात।।८५।। पंथ कोणताही असो धर्म। हेंचि मानावें गा सुवर्म। श्रीदत्तांचें जीवनवर्म। श्रीगुरु माझे वर्णिताती।।८६।।दत्तमाहात्म्य पाहता नीट। प्रभुरायांची लीला चकित।अंतर्मुख करिते चिंतनांत। अवधूतांची चरित-गाथा।।८७।। भक्तकार्यार्थ श्री गुरुमाऊली। कळवळोनी मजसाठीं पहा धावली। अमृताची अक्षरवेली। सांगून गेली कानीं माझ्या।।८८।। राखिते सदैव ती वत्साला। अंतर्बाह्य माझ्या सोबतीला। जगदात्म्याचे दर्शनाला। घडविते दैनंदिन स्मृतीनेंच।।८९।। अनेक विभूती पहा आजही। विराजती स्वभावें ठायीं ठायीं। लीलया भेटती आनंददायी। दर्शन त्यांचें घडे रोज।।९०।।श्रद्धेनें आठवावे ईश्वरासी।







श्रध्देनें आठवावें ईश्वरासी। करुणामय तो कृपाराशी। जोडून देतो चरणांसी। श्रीगुरुंच्या सहजपणें।।९१।। उद्वेग ईर्ष्या वैर कुणाचें। धरावें न व्यर्थ परस्परांचें।अहित होऊन आयुष्याचें। दवडावे कां सुवर्णक्षण।।९२।। हातीं सोपा नाम-परिस। घेऊन काळाचें सोने खास। करावें, जरी श्रीगुरुपायांस। लाभतां आपुलाचि परिस होय।।९३।। प्रयत्नांची शुध्द मानसीं। अहर्निश पूजा, प्राक्तनासरिसीं। यशवन्त होतां अगर्वतेसी। हृदयीं धरावें सांभाळून।।९४।। संचितप्राप्त आनंदखेद। होतां उन्मादे हर्षविषाद। न मानितो खरा आत्मविद। तरतो तोचि आयुष्यांत।।९५।। प्रसन्नपणे देव-संत। आराधावे साधनेंत। एकांती अथवा लोकांतांत। असावें शांतचित्त सदा।।९६।। घरीं दारीं व्यवहारांत। सहृदयचित्तें जे वागतात। तयांस श्रीहरी सांभाळीत। सत्य जाणा निश्चयें हें।।९७।। तुम्हीं फसविलें मुद्दाम कुणास। श्रीगुरु देईल तरी खास। न्याय दैवी पाहुनी तयास। अंत:करणीं शुद्ध जरी।।९८।। निश्चित समजा तुमचा साक्षी। निरखतो बैसोनी हृदयासी। जैशी इच्छा होते तैसी। संकल्पांची सिद्धी पहा।।९९।। कुळीं चाले जें व्रताचरण। आचरावें प्रसंग पाहून। ध्यावे श्रीगुरु मनापासून। मागावी स्मृती माहेराची।।१००।। धन्य सद्‌गुरु नाना वदती। बोलतों सामान्य जनांप्रती। ज्ञानाचा कल्पतरू निश्चितीं। छायेंत यावें भक्तांनो या।।१०१।। संसाराचें सकळ सार। जीवनांचा अर्थ सुंदर। शांत वाणीनें अपुल्या मधुर। कथिती सहजलीले

नाना।।१०२।। आज भ्रांतीत भौतिकतेच्या। ध्यावें भावें श्रीगुरूच्या। दिव्य मूर्तीस नानांच्या। भेटती जरी सुकृतानें।।१०३।। सहज जरी लाभे संगती। होईल मुक्तीचा सांगाती। आणि जोडुनी आनंद चित्तीं। अनुभवा चैतन्यविलास हा।।१०४।। हा मार्तण्डनामें पुन्हां। श्रीएकनाथांचा अवतार जाणा। हृदयीं रमला दत्तराणा। आवडीनें जयाचिया।।१०५।। न बोलतां अधिक चिंतनीं। दत्तनामांत सदा रंगुनी। श्रीगुरुनाना दिसती मौनी। प्रसन्न हास्य फुलवीत सदा।।१०६।। परी जैसे श्रवणीं आले। शब्द सकरुण चित्तांतले। तैसे नाना-हृद्गत् लिहिलें। निमित्त केवळ होऊन मी।।१०७।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनानागुरूंच्या आशीर्वचने। 'मार्तण्ड-महिमा' मोक्षद होणें। विजयमुखें भाविकांसी।।१०८।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते चतुर्दशोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय १५वा - तुकोजीराव होळकरांना व्याधीमुक्त केले



।। जाऊनि नाना सरळ आंत । उभे राहता, श्रीमंत नमस्कारत ।
'बा! पाया पडूं' ऐसें म्हणत । वदती आशिर्वचन नानागुरु ।।

श्लोक : ''अहिल्या वंश संभूतो तुकोजीनृपतिर्महान् ।
यस्य विस्तारतां यातु कीर्तिर्यातु दिगन्तरम् ।।

# अथ पञ्चदशोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

जय जयाजी संतमाऊली। अखिल संसारयात्रा सरली। लागतां तुझ्या पाऊलीं। अनन्यभावें शरणांगत।।१।। कारुण्य उपजलें परब्रह्मासी। अवतरले संत भूमंडळासी। नित्य सांभाळाया जगासी। भवांधकारीं अडकले जे।।२।। संत साक्षात् होउनि दिशा। अवघ्या मानवांसी संभ्रांतशा। पंथ उजळूनि दाविती आशा। मोक्षधामीं पोंचण्याची।।३।। ईश्वर लीलावतारी अपुल्या। मायेबाजारीं गुंतून बैसल्या। त्यांसही संत हो तुम्हींच दिल्या। स्मृती मूळ स्वरूपाच्या।।४।। ऐसी आपली थोरवी। तेथ म्यां काय गावी ओंवी। हेंचि हे गा तुम्हांस विनवी। ठेवा चरणीं वत्सासी या।।५।। श्रोते! मायेचा पसारा। झुलवितो, भुलवितो सारा। भल्या भल्यांचा न लगे थारा। नाचवी माया ज्या वेळीं हो।।६।। तेव्हां केवळ संतचि जाणा। मुक्काम मूळ विसरती मुळींना। निर्विकार मनें खेळतांना। दिसतो मायेसी निश्चिंतपणें।।७।। श्रीगुरु नानांसीही आसरा। जरी गुरु-छायेचा होता खरा। मायेपोटीं जीवनीं सारा। पसारा झाला निर्माण।।८।। जयास पोंचविणें मुक्कामासी। असतें सद्गुरु श्रीहरीसी। गुंतवितो ना किंचित् त्यासी। जाणुनी भाग्य वत्साचें।।९।। हेंच घडलें नानांलाही। म्हणून ना ठेविलें पाहीं। मायेच्या मोहक कुठल्याही। भ्रामक जाळ्यांत श्रीगुरूंनींच।।१०।।

सावध केलें क्षणोक्षणीं। नियत कार्याची स्मृती देउनी। नानांच्या पदोपदीं जीवनी। सांगाती होय सद्‌गुरु पूर्ण।।११।। तिथें जरी अन्य कोणी। खचित असता गेला फसोनी। तेधवां नव्हतें मलाही लेखनीं। प्रवृत्त होणे भाग आज।।१२।। ती सारी कथा विलक्षण। करितों सादर तुम्हांलागुन। सार घेणें तें यांतुन। घ्यावें तुम्हीं जें यथोचित।।१३।। श्रोते! नाना तराण्यासी। कंठीत होते काळ मंदिरासी। दत्तसेवा होईल तैशी। करोनी अहर्निश भक्तिभावें।।१४।। वडिलांपासौन चाललेलें। दत्तमंदिर होतें आलेलें। कागदोपत्रीं लिहिलेलें। होतें होळकरांचिये।।१५।। धर्माधिकारी होते वडील। श्रीमंत होळकरांकडील। नेमणूक येई दरसाल। दरबार-पूजेस्तव जाती नाना।।१६।। बंधू होते नानांचे दोन। भैय्या कुसुम मुलें लहान। कुटुंबमाया आधींच संपून। गेली होती नानागुरूंची।।१७।। बंधु एक जवळ होते। भैय्यासी ठेविलें इंदूरीं तेथे। दुसरे भाऊ शिकावयातें। त्यांचे परीस शिक्षणार्थ।।१८।। पूजा अर्चा मंदिराची। नित्य नैमित्तिक उत्सवाची। यथाकाल अन्नशांती प्रवचनांची। करिती नाना योजना नित्य।।१९।। येणेंप्रमाणें कडक आचरण। चाललें होतें शांत जीवन। होता आनंद नानांलागुन। दत्तसेवेचा अनिवार पहा।।२०।। परी एके सालीं कांहीं। दत्तजयंतीस वाद होई। संकल्पाच्या कारणें पाहीं। पंचकमेटी समवेत।।२१।। असोनी मंदिर वहिवाटीचें। घेतलें लिहून द्वारा नानांचे। कांहीं मंडळींनी पूर्वी साचें। सर्वाधिकारी पंच





केवळ पुजारी नेमलेला। इतुकीच किंमत नानांला। ठेविती पंच अपुल्या करांला। अधिकार सर्व मंदिराचा।।२३।। त्यावरून कांहीं मंडळींनी। शांतताभंग होतो म्हणुनी। नोटिस कोर्टाची बजावुनी। आणविलें नानांस साक्षीसी।।२४।। तेव्हां साहेबासमोरी मिटला। वाद जो होता, अवघा निमाला। नानावृत्तीस परंतु आला। एकूण चित्तीं विराग पहा।।२५।। म्हणोनी पुढे तराण्यासी। महादेव नामक लहान बंधूसी। ठेवूनी नाना इंदूरासी। येती वसतीस भैयाकडे।।२६।। यापूर्वी एकदां अवचित। आज्ञापत्र मिळालें नानांप्रत। तुकोजीरावांकडून येत। श्रीमंत होळकर राजाचे जे।।२७।। शिवाजीराव श्रीमंतांचे। चिरंजीव तुकोजीराव साचे। भाग्यविलासी श्रीमंत मनाचे। अहिल्यादेवींचे वंशज पहा।।२८।। सकळ प्रजेस ज्यांनीं ठेविलें। सुखांत सदैव देती सगळे। दुवाच प्रेमळ दुष्काळीं भले। राखिलें सर्वांसी यथार्थ ज्यांनीं।।२९।।इंदिराराणी चंद्रावतींचें। सौभाग्य हे शर्मिष्ठा राणींचे। श्रीवासुदेव स्वामींची। होती कुळीं कृपादृष्टी।।३०।। श्रोते! तुकोजीरावांचे मन। होई मधूनच अशांत पूर्ण। नावरे क्रोधलहरी आंतून। दाह होई हृदयांतरीं।।३१।।औषधें अंगारे अनेक उपाय। झाले निष्फळ त्यावरी निरुपाय। मनीं जाहले, त्रास होय। केव्हांही मध्येंच अकस्मात।।३२।। तो होळकरांचे एक ज्योतिषी। पंडित रामचंद्र जोशी। वदती एकदां श्रीमंतांसी। उपाय करावा हाही एक।।३३।। उपाय म्हणोनी आपुल्याला। सुचवीन एका नांवाला। शास्त्रीबुवा एक तराण्याला।

राहती आपुल्या राज्यामधीं।।३४।। पंडित नाना तराणेकर। सात्त्विक सच्छील विप्रवर। राहती मंदिरीं तोषवुनी ईश्वर। देईल तें स्वीकारुनियां।।३५।। श्रीमद्वासुदेवानंद गुरूंचे। शिष्य ते असती साचे। हृदय वाहिलें श्रीदत्तांचे। चरणीं जयांनी अनन्यपणें।।३६।। पाचारावें त्यांना इथे। उपाय करावे सांगतील जे ते। खात्री त्यांची मला वाटते। होईल निश्चित सुफल तुम्हां।।३७।। घेतलें श्रीमंतांच्या मनें। लगेच धाडिले बोलावणें। आज्ञापत्र आलें नानांकारणें। तराण्यासी मंदिरांत।।३८।। यावें भेटाया महाराजांसी। कार्य कांहीं सोंपविणें तुम्हांसी। होता आशय पत्रासी। नाना समजले चित्तांतच।।३९।। प्रशस्त न वाटलें तयांना। मनांत घेती, दिसे जाणा। गुंतवूं पाहतो दत्तराणा। राजविलासी पाशामध्यें।।४०।। न दिलें कांहीच उत्तर। न गेले सोडून मंदिर। लगेच दुसरे तिसरेही सादर। पत्र मिळालें श्रीमंतांचे।।४१।। यावें आपण तात्काळ इथें। नातरी मी स्वतां तिथें। येईन पंडितजी घ्यावयातें। मोटार घेऊन तराण्यासी।।४२।। सेवक होते पहा नाना। होळकरांचे पारंपारिक नाना। समजाविती कांहीं,'जावें नाना। भेटाया आदरें श्रीमंतांसी '।।४३।। दत्तरायांचे विनवुनी पदांना। निघाले श्रीमंतांकडे नाना। ते वेळीं दर्यामहालांत जाणा। मुक्काम होता बडवाहासी।।४४।। दर्यामहाल सुरेख प्रशस्त। चोरल नदीचे तीरीं श्रीमंत। बांधवूनी घेती खास स्थलाप्रत। राहावयासी सुखेनैव।।४५।।आनंदराव फणसे आदि। होते ए.डी.सी. चे पदी।







नाना पोंचतां, महालीं वर्दी। गेली वरती श्रीमंतांसी।।४६।। बोलाविर्णे येतांच निघाले वर। प्रशस्त विलासी दालन सुंदर। गालिचे भारी भूमीवरी। पलंग सोफे कितीक पहा।।४७।। जाऊनि नाना सरळ आंत। उभे राहता, श्रीमंत नमस्कारत। 'बा!पायां पडूं' ऐसें म्हणत। वदती आशीर्वचन नानागुरु।।४८।। ..।।श्लोक।।..

" अहिल्यावंशसंभूतो तुकोजीनृपतिर्महान्।
यस्य विस्तारतां यातु कीर्तिर्यातु दिगन्तरम् ।।१।।"

आणि बैसती खालींच पाहुन। वदती श्रीमंत नानांलागुन।'बसावें शास्त्रीबुवा कृपाकरोन। मृगचर्मांकित आसनावरी'।।४९।। बैसती हास्यमुद्रें आसनीं। शेजारी सवें श्रीमंतही येऊनी। निवेदिती सर्व मनांतुनी। तयांस जी होई व्यथा।।५०।। महामृत्युंजय अखंड पाठ। श्रीगुरुचरित्र वाचन येथ। कांहीं दिवस आपण श्रीमंत। करावें अपुल्या जवळी कोणी।।५१।। तें मानिलें श्रीमंतांनी। विनविलें अतिविनम्रपणानीं। शास्त्रीबुवा राहावें संनिधानी। आपण कांहीं दिवस माझ्या।।५२।। आपली सगळी पूर्ण व्यवस्था। स्वतंत्र सोंवळयाची करूं सर्वथा। निवास दालनें वेगळीं तत्वतां। देऊं वेतन वेगळे तुम्हां।।५३।। आपणा जें जें यथोचित। वाटे करावें तें तें इष्ट। परी करावें व्यथामुक्त। होईल तितुके शीघ्र मला।।५४।। दिली संमती नानांनीं। केली खरोखरी श्रीमंतांनी।

पूर्ण यथोचित व्यवस्था देऊनि। सर्व हवें तें आवश्यक।।५५।। आणि श्रोते! नानांसी। पूर्ण आनंदी सदाशिवासी। होतें वैराग्य जागतें मानसी। घेतलें सात्विक यथेष्ट तेच।।५६।। शेजारीच महाराजांचे। राहणें होतें नानांचें। ब्राह्मण देवराम होते साचे। स्वयंपाकासी सोंवळयाच्या।।५७।। आंत सुरेख देवघर। समृध्द सगळे फर्निचर। शीतोष्ण पाण्याचे स्नानगृहीं शॉवर। होता श्रोते! थाट अवघा।।५८।। अत्याधुनिक सर्व सोयींनी। सुसज्ज सगळें येथुन तेथुनी। राजैश्वर्य तें त्यालागुनी। काय वर्णू त्याची परी।।५९।। न रुचलें स्नान धारांचे। म्हणुनी नाना एकदा नदीचे। तीरीं स्नानास जाती साचे। पाहती श्रीमंत अचानक।।६०।। लगेच बोलाविलें त्यांनीं। सेवकास नेमिलेल्या व्यवस्थेलागुनी। कां न नानांसी उष्ण पाणी। मिळालें सांग वेळेवरी।।६१।। थरथर कांपूं लागला तेथ। सेवक जेव्हां, पुसती श्रीमंत। काढून टाकीन क्षणांत। दरडाविती महाराज तया।।६२।। पुढें नानांनीच रदबदली। श्रीमंतांपाशीं त्याची केली। आणि शिक्षा सकळ वांचविली। कोप मावळे तेव्हां जरा।।६३।। एक स्वतंत्र मोटार-। वाहक वेगळा नेमुनी त्यावर। होता दिमतीस तयार। केव्हांही फिरविण्या नानांसी।।६४।। पहांटे चारला होउनी सुस्नात। नाना आरंभिती अपुला पाठ। पूजा अर्चा अवघी निवांत। देती तीर्थ प्रसाद माध्यान्हीं।।६५।। श्रीमंतांसी इष्ट होतें। गणेशाचें मुद्दामच तें। रक्त वसन नेसुनी पूजनातें। प्रतिदिनीं करिती स्नान होतां।।६६।।





माध्यान्हाचे सुमारास। तीर्थ मनुकांच्या प्रसादास। वाट्यांमध्ये चांदीच्या खास। पाठविती नाना सेवकांहातीं।।६७।। ऐसा क्रम कांहीं मास। चालिला, आराम श्रीमंतांस। होऊ लागला श्रोते! चित्तास। उपशमला क्रोध बराच पहा।।६८।। बैसली मर्जी नानांवरी। श्रीमंताची अनिवार खरी। जावयासी न मिळे परी। आदेश, झालें वर्ष पुरें।।६९।। एकदां मध्येंच स्वतः नाना। विनविती जाऊन श्रीमंतांना। दत्तपदांची आठवण मना। येते मजला अनिवार हो।।७०।। आतां द्यावा जी आदेश। परतावयासी तराण्यास। फार रुखरुख हृदयास। केधवां पाहीन दत्तराणा।।७१।। श्रीमंत वदले हांसून। शास्त्रीबुवा काय उणें इथें म्हणून। आम्हांसी जातां सोडून। राहावें कांहीं दिवस इथें।।७२।। इकडे कोंवळें नानाहृदय। आळविती रात्रीं येतां सय। श्रीगुरुदत्तांचे चरण, होय। व्याकुळ स्मृतीनें पुनः पुन्हां।।७३।। म्हणती प्रभो! या लेंकरासी। करावें जवळ राहणें मसी। न वाटे प्रशस्त राजभोगासी। नका गुंतवूं अधिक आतां।।७४।। पद।। राग केदार।। दत्तराज गुरु माय कृपाळु आठवितों मूर्तीसी। ने मजला चरणांसी।। ध्रु०।। काय स्वामिवर चुकलों न कळे। दूर लोटिलें मला वत्सले। इथें उपाशी तुजविण डोळे। अंतरिं व्याकुळ करिसी।। ने मजला चरणांसी।।१।। राजस वैभव मोहक इथलें। परी माउले मन कळवळलें। येती भाव हृदयींचे सगळे। उसळुनी या नयनांसी।। ने मजला चरणांसी।।२।। हवें मला गे नित भरलेलें। दिठींत

अनुपम रूप सोज्ज्वळें। अमृतमय तव नाम कोंवळें। यावें या वाचेसी।। ने मजला चरणांसी।।३।।
-।।ओंवी।। - श्रोते! एकदां संधी पाहुन। अचानक नाना महाल सोडुन। सरळ आले तराण्यालागुन। मुळी न कळवितां श्रीमंतासी।।७५।। जाऊनि चरणीं दत्तांचे। रडूं लागले देवा! कशाचे। गुंतवितां मजला, तुम्हींच साचे। हे हवेत जवळी निरंतर।।७६।। इकडे महालीं गडबड झाली। आणि दुसरेच दिनीं पहा आली। तार श्रीमंतांची घेतां भली। धडकली छाती नानांची हो।।७७।। तारेंत मजकूर यावें पुन्हां। बडवाहासी आपण नाना। अन्यथा मी येईन जाणा। तराण्यासी लागोलाग।।७८।। उत्तर धाडिलें श्रीमंतांसी। तुमच्या वंदितों आज्ञेसी। आठ दिसांची मुदत मजसी। कृपाळु होऊन द्यावी जी।।७९।। आठ दिवस राहोनियां। पुन्हां गेले नाना तया। बडवाहासी येऊनियां। भेटले श्रीमंत सरकारासी।।८०।। पुन्हां दिनक्रम चालिला जुना। राहिले तेथें जरी नाना। अंतरीं नव्हते राजी जाणा। बंधन नावडे संता खऱ्या।।८१।। शिधा, आटा, फळें,दूध। सर्वही होतें तेथ समृद्ध। नाहीं नव्हताच तिथें शब्द। राजयाच्या गृहांत त्या।।८२।। उषाराजे आणि मुलें। नातू राजवाड्यांत भले। येती दर्शनास रोज चाले। नियम त्यांचा सांजवेळीं।।८३।। तेव्हां 'दिगंबरा दिगंबरा'। करविती नाना भजनगजरा। करुणात्रिपदीचा पाठ बरा। होई त्यासवें रोज तिथें।।८४।। नानांनी एका बंधूला। आणविलें पुढें सोबतीला। कांहीं मदत करायला।






तेही राहती महालासी।।८५।। तो ड्रायव्हर नानांचा। होता भगीरथ नांवाचा। उपयोग केला न वाहनाचा। कधींच नानांनी तेव्हां हो।।८६।। त्या भगीरथासी नाना। देती 'योगवासिष्ठ'वाचना। होता भाविक म्हणून त्याला। उपदेशिती कधीं कधीं।।८७।। दूध शुद्ध रोज अमूप। मिळे नानांसी नियमें, निष्पाप –। मनें करविती चहा वांटप। सकळ सेवकां इतरही।।८८।। शिधा पंधरा दिनांचा। येई मोदीचे दुकानींचा। पुरता सारा विनियोग त्याचा। करिती नाना आनंदानें।।८९।। एक गरीब ब्राह्मणालागुन। प्रदोषाचे दिनीं सांगुन। देती नाना शिधा पूर्ण। उरेल जो तो त्या वेळीं।।९०।। अन्नशांती नानांनी। करावी मुद्दाम आणआणोनी। विप्र कधी इंदूराहुनी। हेतु अंतरींचा शुद्ध अती।।९१।। तिथें शिंदेनामक एक। गृहस्थ होते वयस्कर भाविक। जुळली हृदयभावना देख। नानासंगें त्यांची पण।।९२।। नानाही त्यांचेशीं अमित। गोष्टी करिती मिळतां निवांत। वेळ अवघ्या उपक्रमांत। दिवसा रात्रीं केव्हांही।।९३।। चित्तासी वाटे शांती आराम। श्रीमंतासी घडतां नेम। जाणवूं लागे मनीं परिणाम। सरकार तुकोजीरावांसी त्या।।९४।। तीन वर्षें पुरतेपणीं। होते नाना संनिध वसुनी। कथिलें त्यांना सेवकांनीं। धन्य आपुली शास्त्रीबुवा!।।९५।। पूर्वी जे जे पंडित। राहिले इथें उपायार्थ। श्रीमंतांसी न वाटतां शांत। दिले काढुनी तयांलागीं।।९६।। परी सातत्यें वर्षे तीन।आपण येथें राहून अजून। न सोडाया तुम्हांलागुन। श्रीमंत तयार आजही।।९७।। परंतु एकदां निश्चयानें। विनविती नाना निर्वाणीनें। तयार मी न आतां मनें। राहाया अधिक

काळ इथें।।९८।। तों युक्ति पहा श्रीमंतांनीं। केली रोखण्या कांही दिनी। येऊनि आजी मांसाहेबांनी। विनविलें नानांस, यावे घरीं।।९९।। आजी मासाहेब मातुश्रींनी। नेले नानांसी इंदूरासी आग्रहांनीं। कोठीमहालांत राहोनी। काळ क्रमीत होत्या त्या।।१००।। शिवकोठींतही इंदूरास। राहिले नाना वर्षभर खास। त्यांच्याही शुद्ध अंतःकरणास। संतोषविले आचरणानें।।१०१।। बंधु आणि मुलांसाठी। आजी मा उदारतेनें देती। साह्य कांहीं शिक्षणाप्रती। कृपावंत होऊनियां।।१०२।। पत्नी एक श्रीमंतांची। चंद्रावतीराणीसाहेब नामें साची। होती शुद्ध भक्ती त्यांची। गोपालकृष्णावरी अति।।१०३।। त्यांचीही श्रध्दा नानांवरी। देती आर्थिक कांहीं तरी। नेमणूक कांहीं साल जरी। न राहिले नाना इंदूरास।।१०४।। इंदिराराणी उदार तृप्त। स्वतः तराण्यासी मंदिरीं येत। दिला जीर्णोद्धारा निश्चित। निधी पहा आनंदानें।।१०५।। पहा लहरी उदार लक्ष्मीवंत। वृत्ती राजस, परी सदयचित्त। ऐसे भाविक भाग्यवंत। होते अहिल्यावंशज हे।।१०६।। या सगळ्या कथेत नाना। राहिले अलिप्त सर्वथा जाणा। लोभ मोह स्पर्शिला ना।चित्तास त्यांच्या इतुकाही।।१०७।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनानागुरूच्या आशीर्वचनें। 'मार्तण्ड महिमा' उमलत फुलणें। उत्तरोत्तर विजयमुखें।।१०८।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते पञ्चदशोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।

## अध्याय १६वा -सिन्नोर यात्रेत अनसूया मातेचे दर्शन



।। पहा अधिकार कैसा नानांचा । कनवाळा जागला अनसूयेचा ।
सहज मार्गी दर्शनाचा । घडला लाभ सर्वांसही ।।

# अथ षोडशोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

हे शंभुराजा कैलासनाथा। भक्तमनींच्या पुरविसी आर्ता। आशुतोषा तूं सहृदयचित्ता। चिन्ता हरिसी शरणांगताची।।१।। अंजनीमाता अरण्यवासी। सदा ध्यात तुज गौरीहरासी। प्रसन्न होतां आनंदचित्तेंसी। पवित्र वर दिला तिला।।२।। मागितले श्रीभोलेश्वरा। यावें पुत्र होउनी उदरा। त्रैलोक्यपते तुम्ही उदारा। देवाधिदेवा सदाशिवा।।३।। झालास देवा अंजनीसुत। महाबली बलभीम मारुती, भक्त। रघुरायांचे अनन्य होत। लीलामात्रें भूमंडळीं।।४।। शक्तिसामर्थ्याचें साक्षात। तेजोवलय हा बुध्दिमंत। मनोवेगासही मागें टाकित। गतिमान् कपी वायुपुत्र।।५।। नीती धृति यश कीर्ती। भक्ति शक्ति उदंड युक्ति। जयजयकारे त्रिभुवनान्तीं। चिरंजीव तुम्ही हनुमंत देवा।।६।। उपजतां आकाशीं उडोन। सूर्यबिंब गिळावया लागून। उड्डाण केलें अनिवार बुभु:कारून। थोकडें तेजास त्रैलोक्य तुम्हां।।७।। प्रचंड गदा करूनी धारण। कपिराज! केलें भयंकर कंदन। थरकती दशदिशा हृदयीं कांपून। काळालाही धडकी भरे।।८।। एकनिष्ठ, परमभक्ति धुंद। अंत:करणीं नित्य श्रीपद। रामरायांचें मंगल मोक्षद। धरिलें तुम्ही जी वैष्णवश्रेष्ठा।।९।। नाम तुझें मारुतीराया। गातां मनोभावें, नेतोसी लया। भीती पळोनीयां।पिशाच्च भूते क्षणार्धात।।१०।।

हे लखलखीत चैतन्यतेजा। लेंकुरासी वरदराजा। यावे कृपावंत होऊनि माझा। माथा नित्य चरणीं तव।।११।। श्रोते! होळकरांचे सदनी। वर्षे चार उणें पुरें वसुनी। आले नाना परतोनी। तराण्यासी यथाक्रम।।१२।।श्री नानांचा नित्य् विकास। गुरुकृपेचा अवघा विलास। राहिले कांहीं दिन मंदिरास। अंतरी होते उदास जरी।।१३।। आजही ते कधींमधून। जाती दत्तदर्शनालागुन। तराण्यासी अवश्य, पण। राहती ना अधिक काळ।।१४।। आले नाना इंदूरासी। राहणें मार्तण्ड चौकासी। शंकरराव पुत्रापाशीं। होते शिक्षक शाळेंत जे।।१५।। सूनही आली नानांसी। आजी मांसाहेबांनी आग्रहेंसी। स्वतः पाहूनी लग्नासी। आशीर्वाद दिधला भैय्यांच्या।।१६।। चिरंजीव आणि सून नानांसी। श्रद्धा शुद्ध उभयतांची।आवड पूजन भजनाची। अनिवार आहे दोघांसीही।।१७।। भजन उत्सव अन्नशांति। पै पाहुणा भक्त येती। नित्यचि घरांत परी राबती। आनंदानें उभयतां ही।।१८।। मार्तण्ड चौकाभीतरीं। घर नानांचे हक्काचें जरी। नाना मनस्वीपणें इंदूरीं। फिरत असती कोठेंही।।१९।।कित्येक ओळखीचे नवे जुने। भक्त भाविक नानांचें राहणें। होई पूर्वी लहरीप्रमाणें। रमेल मानस जाती तिथें।।२०।। इंदूरास नानांची वसती। अखंड तेव्हां पासौनी ख्याति। वाढूं लागली, लोकां प्रचीती। येऊं लागली यथाकाळ।।२१।। मात्र वृत्ती आजचीच। अबोल शांत अंतर्मुखच। पाहतां सहज कुणा न मुळीच। कळेल अलौकिक अथांगता।।२२।।






परी जे अधिकारी सिध्द संत। ते ते पाहतांची होती तृप्त। केवलावस्थेचे मूर्तिमंत। आदर्श वस्तुपाठचि नाना।।२३।। इंदूरी राहतां नानांनी। भक्तांस अपुल्या घेऊनी। आनंदें अनेक ठिकाणीं। जाऊन केल्या तीर्थयात्रा।।२४।। कित्येक वेळीं दूरदूरची। पाहिलीं पुण्यस्थानें साची। नाना संगतीच्या यात्रेची। अनिवार गोडी वेगळीच।।२५।। एकच कथा तुम्हांस कथितों। तीर्थ-यात्रेंत हटकून येतो। प्रसंग विलक्षण अवचित घडतो। साक्षात्कार स्वरूपाचा।।२६।। एकदा नाना सिन्नोर जवळी। गेले घेऊन बरीच मंडळी। अनसूयेच्या चरणकमळीं। अर्चना आपुली वाहायासी।।२७।। सामान अवघें नौकेमाजी। ठेवुनी पायी चालाया राजी। निघाले पाहूनि अवघ्यांची मर्जी। नानागुरुही समवेत।।२८।। दर्शन करुनी यथासांग। प्रसन्न मनें परतीचा मार्ग। चालतां सगळ्यांचे पोळे अंग। उन्हानें त्या चढत्या पहा।।२९।। कडकडीत उन्हांत तापती। यात्रेकरू सारे कोमेजती। तळपायींचे असह्य होती। चटके तापल्या मातींतले।।३०।। पोटांत पेटली आग अनिवार। भुकेनें व्याकुळलें अंतर। होतें अजून थोडें दूर। नौकाठिकाण मुक्कामाचें।।३१।। नौकेंत अवघ्यांचेंच सामान। फराळांचेही कांहीं जाण। पोंचण्याआधीं परी कोठून। मिळेल खावया पथांतरीं।।३२।। नजर टाकली चहुंबाजूंस। नव्हतें मुळींही आसपास। मिळेल कांहीं खावयास। ऐसें निश्चित ठिकाण पहा।।३३।। या अवघ्या भक्तांमाझारी। होती मात्र शांति

अंतरी। मूर्ती नानांची आनंदें साजिरी। चालत होती अविचळपणें।।३४।। कोणी वृद्ध थकलेले। विनविती नानांस द्यावें भलें। चालण्याचे बळ संपलें। पायांतील आमुच्या हो।।३५।। मनांतुनी सर्वांचीच खास। होती फराळाची तीव्र आस। काय लीला पहा सर्वांस। दूर दिसलें उपाहारगृह।।३६।। आनंदें अवघे लगबगले। नानांसह तेथें पोंचलें। तेथें जातां सर्वांस दिसले। आवडीचे पदार्थ कांहीं।।३७।। स्त्री एक तेथें परदेशी। होती तळीत कढईसी। काढीत भजीं परतीसी। खमंग ताजी खुसखुशीत।।३८।। कोणीच नव्हते आंत चाकर। शीतळ पाण्याचा रांजण बाहेर। दिसतां पाणी भराभर। प्याले श्रमलेले जीव सारे।।३९।। विसांवतां क्षणमात्रची। घेती संमती नानांची। आवडीने तेथ अवघेची।करिती फराळ आनंदें।।४०।। कांहीं सोवळे उपासाचे। त्यांकरितां चहा-दुधाचें। विनवितां बाईने प्रसन्नवाचे। कथिलें अवघ्यांस तृप्तवीन।।४१।। शांतविलीं अवघीं मानसें। होतां अवघ्यांचें, पुसती पैसे। किती देणें मिळूनि फराळाचे। हिशेब केला सर्वांनींच।।४२।। तों सहा आणेच उणें केवळ। पडूं लागले मंडळींजवळ। देऊ पोचतां नौकेंत सकळ। विश्वासावें बाई तुम्ही।।४३।। ऐसें विनविलें त्या बाईसी। निघाले परत मुक्कामासी। उत्साहभरल्या मनासी। पोंचले अवघे नौकेमाजी।।४४।। नौकेंत मंडळी पोचतांक्षणीं। सहा आणे पिशव्यांतुनी। मोकळे पैसे धुंडाळुनी। निघाले परत देण्यास्तव।।४५।। दोन माणसें गेलीं तिथें। नुकतेच बैसुनी आले





जिथें। परी गोंधळले संभ्रमित चित्तें। न कळे कांहीं मतीलागीं।।४६।। दिवसा ढवळया भर उन्हांत। आतांच मंडळी जिथें तृप्त। जाहली तें उपाहारगृह सत्य। मुळींच नव्हतें जागेवरी।।४७।। नव्हती स्त्रीही आणि कसला। मागमूसही नव्हता भला। गारुड्याचा जणुं खेळचि झाला। अर्ध्या घटकेपूर्वी तिथें।।४८।। अविश्वास वाटेल पुरता मनीं। ऐसीच ही सिन्नोरकहाणी। परी मिळते साक्ष अजुनी। यात्रेंतील त्या मंडळींची।।४९।। भटकून आले परत पुन्हां। ऐकती वृत्तांत सगळा नाना। हंसती म्हणती अन्नपूर्णा। कनवाळू होती प्रत्यक्ष ती।।५०।। दर्शनाला लेंकरें आलीं। उन्हानें श्रमलीं व्याकुळली। अनसूया मनीं कळवळली। प्रत्यक्ष माता वत्सला।।५१।। मायेनें सर्वांस शांतविलें। सहा आणेही न घेतां भले। ऋणी आज तिनें ठेविलें। पहा तुम्हां आम्हांलागीं।।५२।। करावा हो जयजयकार। अंबे सदैव राखणार। तूंच भुकेल्यास भरविणार। घास प्रेमें येऊनियां।।५३।। पहा अधिकार कैसा नानांचा। कनवाळा जागला अनसूयेचा। सहज मार्गी दर्शनाचा। घडला लाभ सर्वांसही।।५४।। एका नानांच्या गुरुभगिनीस। जाहला चालतां विशेष त्रास। येती फोड तळपायांस। त्या वृद्धेच्या मार्गांतरीं।।५५।। उन्हानें त्या वृध्द स्त्रीची। व्याकुळली वृत्ती तेव्हां साची। तळपायींचे फोडांची। वेदना होई अनिवार।।५६।। सोबतीच्या मंडळींनीं। विनविले नानांलागुनी। द्यावें विभूतीस करुणेनी। दुःखशमनार्थ बाईच्या त्या।।५७।। अखेर देती नाना

मंत्रूनी। विभूती ती लाविताक्षणीं। शांत झाल्या वेदना मिटुनी। गेले फोड तळपायांचे।।५८।। ऐसे नाना करुणावत्सल। आळवितां देती प्रत्यय कोमल। परी शुद्धमनें हा सद्‌गुरु मवाळ। अंकित करावा भावबळें।।५९।। भक्तांवरलीं कितीक स्वतः। नाना अरिष्टें घेती पहा। असावें मात्र सोज्वळ पायां। वंदुनी त्यांच्या वेळोवेळीं।।६०।। निवारतां संकटांना। न पाहती लहानथोर नाना। किती ऐशा सांगूं कथांना। प्रत्यहीं घडती नेत्रांपुढे।।६१।। स्वतःचे देहीं नानांचा। असे विलक्षण अधिकार साचा। भार दुःख वेदनांचा। सोशिती हांसत नानागुरु।।६२।। जाणीवही न इतरांसी। वेदनांची दाविती मुद्रेसी। आनंदाची अपारराशी। वाटे नाना प्रत्यक्षचि।।६३।। एकदां जरी स्वीकारिलें। कुणासही आपुल्या करीं भले। न चुकती संत आपुल्या बोलें। साक्ष याची नानागुरु।।६४।। मेरूही क्वचित् येईल उणा। परी शब्द दिला तो चळेना। ऐशी प्रचीती जो देईना। दांभिक जाणा त्या गुरूसी।।६५।। नाना गुरूंनीं घेतलें जरी। कारुण्यानें कुणास पदरीं। सांभाळिती ब्रीद तरी। सोसुनी आपण दुर्वचनें ही।।६६।। मुळांत वृत्ति अवघी अलिप्त। राहोनियां जळाआंत। कमळापरि अकलंकित। राहिले जीवनीं नानागुरु।।६७।। आवडीनें वाटे जिथें। बसावें त्या घरीं अवश्य तिथें। भजनानंद लुटीत होते। समाधीचें सोज्वळ सुख।।६८।। मुद्दाम कोणी विनविल्याविण। न बोलती नाना तयालागुन। श्रीगुरूंच्या आदेशावांचुन। शब्दही देत





नव्हते कुणा।।६९।। आग्रह नव्हता उपासनेचा। कोणासीही उगीच उपदेशाचा। मुळांत नाना होते शांतीचा। चैतन्यपुतळाच निवांत पहा।।७०।। म्हणोनी असेल योग ज्याचा। ध्यास त्यालाच नाना-पदांचा। वाढला हळूहळू इंदूरचा। परिवार नाना-भक्तांचा हो।।७१।। इथल्या कथांचा प्रचीतीसागर। तिथे अनुभवांचें प्रत्यक्ष आगर। नानागुरूंचा महिमा अपार। पसरूं लागला इंदूरात।।७२।। एक विलक्षण श्रोते! कथा। सांगेन तुम्हां ऐका आतां। नाना निवासाहून दूरच तत्त्वतां। होते देशपांडे गृहस्थ एक।।७३।। त्यांस होतीं मुलें दोन। सदैव कांहीं त्रास जाण। पत्नीस बाहेरबाधा समान। अखंड अस्वस्थ वाटे तिला।।७४।। दोन्हीं मुलें आणि पती। सदैव उपाय तिला शोधित असती। पहा कैसी कर्मगति। यथाकालीं ती निवर्तली।।७५।। वृध्द पिता मुलें दोन। बाळ म्हणती धाकट्यालागुन। रेल्वेंत नोकरी करून। परगांवासी राही जो।।७६।। मातेस्तव बाळ सतत। घरींच बसे तिला सोबत। सेवा आईची एकनिष्ठ। केली त्यानें अखेर सारी।।७७।। परी प्राक्तन पहा त्याचें। ओढवलें त्यावरीच त्रासाचें। अवघें बाधा आणि पीडेचें। बैसलें ठाणें बाळावरी।।७८।। भयंकर पीडा बाळास छळती। अहर्निश त्याला समोर दिसती। विक्राळ अशुभ भयानक खेळती। आकृती पुढ्यांत येऊनियां।।७९।। मोठे बंधू कामावरी। तयां गिरणीत होती नोकरी। पिता आणि बाळ घरीं। पंचविसांचे ज्यांचें वय।।८०।। चिंतानळीं पिता

जळतो। भाऊही काळजीनें अस्वस्थ होतो। उपाय सांगेल कोणीही तो। करिती तत्परतेनें अति।।८१।। वडिलांची श्रद्धा बाळांच्या। होती अवघ्याही संतांच्या। पदीं, परी अज्जुमहाराजांच्या। शिष्यांतील होते हो।।८२।। अज्जुमहाराज इंदूरात। होऊन गेले विख्यात संत। बाळांचे वडील सेवेत। होते त्यांच्या कांहीं वर्षे।।८३।। परी दैवयोग बलवत्तर। असतो सदा ह्या वचनानुसार। प्रारब्ध अटळपणें चक्राकार। फिरविते देवादिकांसीही।।८४।। तेव्हां बाळांचा त्रास अनिवार। कैसा सुटेल हाचि विचार। बंधु आणि पिता साचार। अहोरात्र करिती पहा।।८५।। श्रोते! केविलवाणी स्थिति। खरोखरी बाळांची पूर्वसुकृती। म्हणोनी आजही बाळ दिसती। नानांसंगे आपणास।।८६।। अन्य कुणी असता तरी। आत्महत्याच मानुनी बरी। न राहता आजवरी। बाधित जीवन कंठीत।।८७।। होती संतसेवा पितयाची। कांहीं जोडी सुकृताची। म्हणोनी संतपदांची। संगत मिळे अहर्निश।।८८।। कोणीही त्या काळीं इंदूरांत। येवो अनोळखीही संत। उभे राहती जोडून हात। अनन्यपणें त्यांच्यापुढे।।८९।। महाराज! या यमयातना। जिवंतपणीं मी साहूं शकेना। मुक्त करा जी यांतून, पदांना। इतुकीच माझी विनवणी।।९०।। खाता, पीता, चालता तरी। निजतां न झोंपेचि येई सरी। चहुंकडे विकट हास्यें सारीं। खद्खदुनी हांसती आकृत्या साऱ्या।।९१।। पीतां पाणी जळांत दिसती। घास घेत समोर नाचती। अष्टमी अमावास्या







पौर्णिमेसी। असह्य होई बाळांना तें।।९२।। ऐशा विमनस्क वेड्या स्थितीत। एकदां बाळांसी आणुनी देत। जेष्ठ बंधु कांहीं पानें फक्त। "गुरुमूर्ति" चरित्र पोथीचीं ती।।९३।। वडील बंधूंच्या सोबत्यानें। दिलीं पानें, गिरणींत भेटणें। रोजच त्यांचे, कथिलें भाऊनें। घरांतील वर्तमान त्यास जेव्हां।।९४।। कवीश्वर म्हणूनी मित्र भाऊचे। कृपाळू होउनी पूर्ण पोथीचे। क्रमानें अध्याय हळूहळू साचे। देईन म्हणाला खचित पहा।।९५।। हा क्रम पोथीचा वर्षभर। चालला इकडे न बाळावर। परिणाम कांहीं त्रास फार। वाढू लागला दिसेंदिस।।९६।। निद्रानाशाची व्याधी जैसी। उडाली पुरती झोंप तैसी। उदास मुद्रा हृदयासी। भीतीनें सदैव वेढलेली।।९७।। पहा योजना ईश्वराची। कैसी विचित्र दिसे साची। पानें कवीश्वरासी पोथीचीं। मिळत होती नानांकडून।।९८।। चालला नेम वर्षभरी। भेट न होय नानांची परी। बाळ अजूनही होते अंधारीं। कळवळत भयानक भीतीनें।।९९।। आज वर्षे तेवीस पुरीं। गणेश चतुर्थी आठवते अंतरीं। कवीश्वरांचे वचनावरी। निघाले बाळ नानांकडे।।१००।। नाना मधूनच घरीं येती। नव्हती ठिकाणाची एका निश्चिती। विशेष लाडकी पंचवटी ती। लोदी मोहोल्यांतील प्रख्यात।।१०१।। पांच प्रेमळ कुटुंबें दक्षिणी। वागळयांचे वाड्यात जुनीं। 'पंचवटी' वदती कौतुकांनी। जाती विशेष नाना तिर्थे।।१०२।। मार्तण्ड चौकापासौनी। निघाले बाळ चौकशी लागुनी। चुकल्या

।। श्री मार्तण्ड महिमा ।। षोडशोऽध्यायः

वासरा जैसी मनीं। लागे तळमळ ती साची।।१०३।। आले लोदीपु-यांत बाळ। नेमावरकरांचे द्वारावर। धांडेशास्त्रींस पुसती सादर। आहेत का हो नानागुरु।।१०४।। तों आंतल्या बाजूस बैसले। नाना जेव्हां दृष्टीस पडले। वर्षभरींचे जुळलेलें। अज्ञात नातें श्रीगुरूंचे।।१०५।। श्रोते! क्षण आज स्मृती। परी जन्मांतरें तेणें तुटी। होणार बाळांची त्या भेटीं। संकेत होता नियतीचा।।१०६।। ती गुरुशिष्यांची दृष्टादृष्ट। पितृप्रेमाची छायाच स्पष्ट। पुढल्या कृपेची प्रथम भेट। होत होती खचित पहा।।१०७।। तो अवघा कथाभाग। वर्णीन पुढिल्या अध्यायीं सांग। बाळजीवनाचा पूर्ण रंग। पालटे इथून नित्यासाठीं।।१०८।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। श्रीनाना गुरुंच्या आशीर्वचनें। ' मार्तण्ड-महिमा ' तुम्ही ऐकणें। विजयमुखें उत्तरोत्तर।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते षोडशोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।



## अध्याय १७वा - स्मर्तृगामी स्वभक्तानाम् उध्दर्ता भवसंकटात्



।। कोण मार्गें ते न कळले । श्रीमत् वासुदेवानंदांपरी भासले ।
दंड एका हातीं धरले । लिंबू झेलितो दुसऱ्या करें ।।

# अथ सप्तदशोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ मेघश्यामल संकर्षणा। कुलदेवा श्री व्यंकटरमणा। गिरीस रमलां गरुडवाहना। श्रीनिवासा जगदीशा।।१।। जगत्पालका लक्ष्मी जगदीशाच्या चरणां। चुरीत बैसली शेषशयना। सागरीं योगनिद्रेंत नारायणा। पहुडतोसी लीलेने।।२।। नाभिकमलांतुनी चतुर्वदन। ब्रह्मा करी सृष्टिचिंतन। जय विजय दारी उभे राहून। जागताती सेवेलागीं।।३।। माथ्यावरी लवलवीत। सहस्त्र जिव्हांचा शेष धरीत। शीतल छाया अखंडित। फणा उभारोनी अनंतावरी।।४।। महाविष्णो! होऊनी मोहिनी। तुवां अमृत असुरांपासौनी। काढूनी सांभाळली अवनी। पीयूषदात्या पद्मनाभा।।५।। क्षीरसागरीं राहोनियां। राखिसी विश्वात्मक विश्वास या। निरंतर अवतरोनि लीलया। युगायुगीं धर्मरूपें।।६।। दुष्टांच्या शासनासी। सज्जनांच्या परित्राणासी। प्रकृतीच्या स्थितीसी। राखण्या येतोसी अवनीवर।।७।। आर्त भक्तांच्या हांकेसी। धांवोनियां हृषीकेषी। माधवा मधुसूदना येतोसी। त्रिविक्रमा तूं सर्वसाक्षी।।८।। सहस्त्रनामा अनादिनिधाना। दिव्यरुपा तुझिया चरणां। वंदन वारंवार वामना। माझें असो हें निरंतर।।९।। गजेन्द्र, प्रल्हाद, नारद, ध्रुवासी। कृपेनें तूं चिरंजीव करिसी। डांगोरा पिटला पुराणांसी। कवीश्वरांनी यथेच्छ तुझा।।१०।। द्यावी मजलाही

कांहीं प्रचीती। मानूं तेव्हांच यथार्थ रीती। जगामध्यें अवघेच आरती। श्रीमंतांची करिती पहा।।११।। ऐसें क्वचित वाटेल मला। कृपाघना या वत्सला। शीघ्र होऊनी सहृदय गोपाला। दयेंत आपुल्या भिजवावे।।१२।। पहा मागील अध्यायांत। गुरुशिष्यांची दृष्टभेट। होई परी न नाना बोलत। बाळासवें तत्काळचि।।१३।। चार पांच होते अपरिचित। बाळ बोलाया नसे धजत। मध्येंच नाना विचारीत। काय प्रयोजन, कोण, नांव।।१४।। आंतल्या बाजूस नेउनी बाळांना। पुसती पुरते एकट्यांना। त्रास कैसा ते, ऐकतांना। अबोल होउनी विचारमग्न।।१५।। वदती कठीण दिसे मला। परी देतो विभूती तुम्हांला। मंत्र कांही, करावें जपाला। अहर्निश, पाहूं काय होई।।१६।। विभूती लाविली बाळांसी। दिली अनुज्ञा पोंचतां गृहासी। स्वस्थपणें निजावयासी। न येते जरी निद्रा मुळीं।।१७।। मंत्र एका कागदावरी। लिहिला, ठेविला खिशांतरी। परतूनि निघाले जाण्या घरीं। अनिश्चितमनें बाळ पहा।।१८।। कारण तयांस अनेक संत। भेटले हेही त्यांत। नवे एक, परि व्यथामुक्त। कुणीं न केले आजवरी।।१९।। दोन मंत्र जे दिधले। नानांनीं बाळास मुद्दाम भले। आजही कुणास भयें ग्रासिलें। जपावे श्रद्धा असेल जरी।।२०।।*।।श्लोक।।*

"अत्रिपुत्रो महातेजो दत्तात्रेयो महामुनिः। तस्य स्मरणमात्रेण सर्वपापैः प्रमुच्यते।।१।।
अनसूयात्रिसंभूतो दत्तात्रेयो दिगंबरः। स्मर्तृगामी, स्वभक्तानामुद्धर्ता भवसंकटात्।।२।।"





बाळ ते दिनीं येतांच घरीं। पुसे पिता उत्सुक अंतरीं। वदे बाळ जी घडली सारी। हकीगत नाना दर्शनाची।।२१।। दिले मंत्र त्यांनी मजला। अहर्निश दाजी! जपण्याला। सांगतां बाळानें पित्याला। पहावया मागती कागद ते।।२२।। श्रोते! पहा विचित्र रीत। खिशांत ठेविले जरी नीट। गेले हरवोनी मुळीं न गवसत। पडले अथवा पथांतरीं।।२३।। असे किंवा करणी अदृश्य। बाधा आणीत होती सत्य। बाळास न लाभावें नित्य। अभय कधीं, म्हणूनी नेले।।२४।। चित्तीं खेद वाटे अति। आठवूनही न होते स्मृती। सांगूं लागे पिता शेवटीं। विनवणी करी उद्यां पुन्हां।।२५।। थोडें खाऊन निजले बाळ। तों ऐकावें अद्भुत केवळ। जया न येई निद्रा क्षणभर। दिवसा रात्रीं कधीही पहा।।२६।। हेच बाळ गाढ निद्रेंत। विसरले खरोखरी काळाप्रत। पन्नास तासांची अखंडित। झोंप शांत येई त्यांना।।२७।। दाजी अथवा भाऊंनींही। बाळास जागविलें ना मुळींही। ठाऊक व्यथेची लाही लाही। होती बाळांची उभयतांस।।२८।। उघडली निद्रा तिसरे दिनीं। वाटे गेला शीण उतरोनी। बाळास बहुत वर्षांनीं। लागे निद्रा गाढ इतुकी।।२९।। परी न त्रास मावळला। यत्किंचितही मनीं बाळाला। ओढ लागे भेटीन नानांला। मागण्या मंत्र पुन्हां तेची।।३०।। पुनः भेटीस निघाले। वणवण हिंडोनी अखेर थकले। जिथें जाती तिथे कळले। नाना आतांचि गेले इथुनी।।३१।। थकून घरी येतां बाळ। पुसतां दाजी, इतुका वेळ। भेट न होई

कळतांच तात्काळ। म्हणती जावें फिरुनी पुनः।।३२।। आज भेट झाल्याविण। न यावें घरीं परतून। घडला जरी उपास पूर्ण। चालेल श्रीगुरुभेटीस्तव।।३३।। पहा पिताही कैसा कर्मठ। घडली होती, संतसेवा सतत। होती ठाऊक परीक्षापद्धत। संतांची ती कैसी असे।।३४।। मात्र या वेळीं बाळांना। देती न क्लेश बहुत नाना। भेटती रस्त्यांतच, चालले जाणा। होते कुणाचे गृहीं पहा।।३५।। वंदन करिती बाळ, याचिती। नाना उपेक्षुनी त्या चालती। हरवला मंत्र ऐकतांच वदती। भोग आपुलें प्राक्तन आतां।।३६।। आंसवें आणून लोचनांत। विनविती बाळ होतो त्रास। मरण-भय मला वाटे खास। भयमोचक आतां तुम्हींच गुरो।।३७।। नाना सरळ म्हणती बाळांसी। उद्वेगानें कशास उद्यांसी। मरावें आजच जरी अससी। आयुष्यानें भयभीत तूं।।३८।। तेधवां जाणे होते जिथे। नानांसी, त्या मार्गींच येतें। आपुलें घरहि बाळास उमजतें। चालतां मागे नानांचिया।।३९।। कां न न्यावें नानांना। घरींच आपुल्या परी बाळांना। झाली न हिंमत मुळीं जाणा। विनविण्याची त्या वेळीं।।४०।। होतें भाग्य सबळ परी। गृहस्थ एक भेटले पथांतरीं। बाळास आला धीर अंतरी। केली विनंती त्यांचे द्वारा।।४१।। नानाही मानिती भीड त्यांची। येतां जागा अपुल्या घराची। लगबगली वृत्ति बाळाची। उचंबळोनी गेली हो।।४२।। घरांत नाना येतां, दाजी। विनयें म्हणती सांभाळावें जी। पोरास पदरीं घ्यावें अर्जी। अखरेची ही







महाराज माझी।।४३।। चित्त आतां पैलतीरासी। लागली अवघी रुखरुख मनासी। चिंतेच्या चितेंत जळतो उपाशी। आत्मा माझा बाळांमुळें।।४४।। *।।अभंग।।*

“ कृपाळु उदार तुम्ही संतजन। हेंचि कृपादान द्यावें मज।
अनाथ अपराधी पतीत आगळा। परी पायावेगळा नका करूं ।।”

दाजी उच्चारिती दोनच ओळी। हृदय गलबलून आलें डोळीं। तुकोबांची वाणी कोंवळी। नानांपुढे लीनमनें।।४५।। श्रोते! ऐकोनी वचन पित्याचें। बराच वेळ न उत्तरती साचे। नाना अखेर वदती वाचे। करूनि प्रेमळ हृदय तिथें।।४६।। उपरण्याचा पदर पसरून। नाना बोलती दाजींलागून।‘ घेतला! बाळास, निश्चिंतमन। राहावे आता आपणही ’।।४७।। हर्षानें भरलें हृदय। पितापुत्रांचेही उभय। बाळ धरिती नानांचे पाय। उत्कटपणें कृतार्थ मनें।।४८।। दिधले पुनः लिहून श्लोक। सूचना साधनेच्या देती अनेक। जपांत गुरुचरित्रीं चित्त एक। करावें बाळा श्रद्धेनेंच।।४९।। प्रतिदिनीं निष्ठेनें प्रातःकाळीं। यावें दर्शना कोठेंही जरी। विभूती नित्य जवळी धरीं। घरीं दारीं कोठेंही।।५०।। निश्चित कार्यक्रम बाळांकडुनी। हळूहळू घेती नाना करवूनी। अवघा दिवस जाय उलटोनी। परी असे बाळ नित्यमग्न।।५१।। तीन तीन पाठ गुरुचरित्राचे। पहांटे दुपारी सायंकाळीं साचे। वाचूनि घेती बाळांचे। कडून, नाना सक्तीनेंच।।५२।। पहा चार

वर्षे पुरीं। केवळ दाणेगुळावरी। ठेवुनी, तोडिलें भोजन, सारी। कठोर होती साधना ती।।५३।। पाठवाचनीं गुरुचरित्रांतील। मंत्र संपुटित बांधून ओळ। निश्चयें कष्टानें तरीही बाळ। वाचती मात्र नियमबद्ध।।५४।। सन बावन्नापर्यंत। साधना घेती, कठोर संत। खरोखरी न आधीं कोणाहीप्रत। धरिती जवळ आपुल्या कधीं।।५५।। मात्र एकदां स्वीकारितां। अनन्यपणें तो शिष्य वागतां। उदंड कृपा कल्याण तत्त्वतां। करिती त्याचें निर्धाराने।।५६।। पुढें यथाकाळीं दाजींची घटिका। आली भरत अखेरची ऐका। नानांनी येऊनी दोन्ही बालकां। आश्वासिलें वात्सल्यानें।।५७।। घरांत सप्ताह चालला बाळांचा। तोही होता दत्तजयंतीचा। प्रकार दुस-याच दिवसाचा। घरघर लागे दाजींस पहा।।५८।। वाजे छातीचा भाता क्षीण। कुठल्याही क्षणीं उडेल प्राण। मुलें दोन्हीं जरी सुजाण। धसका अंतरीं तयांच्याही।।५९।। धावत गेले बाळ दारीं। नानांच्या प्रकार कानांवरी। घालुनी विनविलें 'सप्ताहांतरीं। ओढवेल का हो घरी मृत्यु? ।।६०।। आज्ञेनें आपुल्या अर्धाच सोडीन। आलें जरी दाजींस मरण'। बाळास नाना स्वतः घेऊन। आले गृहीं दाजींसाठी।।६१।। बराच वेळ जवळी बैसले। नव्हतें दाजींस भानही कसलें। मध्येंच नाना बाळास बोलले। करावा सप्ताह पूर्ण सांग।।६२।। श्रोते! जेव्हां बाळालागुनी। भाकित केलें डॉक्टरांनीं। अर्ध्या घटकेची न दिली पाहुनी। खात्री दाजींची पुरतेपणीं।।६३।।





तेव्हां नानांनी शब्द दिला। कराल मृत्युपाशही रोखला। पूर्ण सप्ताह पार पडला। दाजी राहिले होते तसे।।६४।।दत्तजयंतीस सांजवेळीं। दत्तजन्म होतां दोरी तुटली। शब्दांस नानांच्या यमही सांभाळी। ऐसी अनुभूती बाळांसी ये।।६५।। या वेळीं नाना हरसिद्धीवर। आले होते चिरंजीवांबरोबर। उत्सव दत्तांचे वर्षभर। आनंदें होई भजन सदा।।६६।। दाजीनंतर आजदिनींही। पितृप्रेमाची स्मृती पाही। येऊं न दिली बाळांस कधींही। भैय्यांसमान मानिती त्यांना।।६७।। बाधा बाळांची खरोखरी। असाध्य कठीण भयद पुरी। साधना झाली इतुकी तरी। बाळ होती अस्वस्थ मध्यें।।६८।। तरी मंत्रास जैसें संपुटाचें। तैसें बाळांस नानांचें। कवच वज्रापरी साचें। सर्वथा रक्षणार्थ उभे गुरु।।६९।। पितृनिधनानंतर बाळ। अनन्यपणें सेवेंत काळ। नानांच्याच संगतीं केवळ। घालवू लागले अहर्निश।।७०।। पहा छायेपरी नानांना। सोबत करिती बाळ जाणा। श्रद्धा अभंग असल्याविना। करिती ऐसें न अजि कोणी।।७१।। उत्सव प्रसंगांपुरतें येऊन। नानांची सेवा, चार दोन। दिवसांपुरती सुट्टी काढून। करिती अवघेच पाहुणे ते।।७२।। परी अखंड घरीं दारीं नित्य। एकचि भान ध्यान फक्त। वृध्द नानांचे मूर्तीस जपत। सेविती बाळ आजही पहा।।७३।। त्या बाळांची एकच कथा। ऐका श्रोते! विचित्र आतां। यज्ञार्थ एका गावीं होता। त्यांचा मुक्काम नानांसवें।।७४।। आचार्य होते नानाच तिथें। देवदेवतास्थापन-कार्यातें। आवरतां तृतीय दिनातें।

होई यागास प्रारंभ खरा।।७५।। प्रशस्त मोकळी ऐसपैस। जागा यज्ञाची उघड्यावरी खास। शेतांतील होती मंडपास। बांधियली चहूं बाजूंनी।।७६।। मांडव वेगळा यज्ञशाळेचा। पाकशाळा आणि भजनमंडळींचा। कठडा करूनियां बांबूचा। उपयोग होई द्वारावर।।७७।। कारण तिथे यज्ञशाळेत। भूमीवर सर्वत्र पवित्र गवत। अंथरले मधून, बांधून घेत। सशास्त्र कुंडें हवी तशीं।।७८।। होतां देवदेवतास्थापन। कोणीही न शिवावें तत्काळ येऊन। कुंडासी, द्वारीं सतत म्हणून। बाळ पहारा करिती तिथें।।७९।। कारण कोणी कधीं मांत्रिक। आपल्या शाबरी पैशाचिक। मंत्रा पठिती तयास ठाऊक। जागृत भेटती देवता सर्व।।८०।। होती वेळ पहा रात्रीची। गांवढ्यांतील लोकांची। ये जा चालली तेथ साची। बाळ दारीं होते उभे।।८१।। पाय धुवावे जी आधीं आपण। न शिवावें कुंडांस सरळ जाऊन। आदि करिती लोकांलागुन। सूचना प्रेमानें बाळ तेव्हां।।८२।। गृहस्थ एक सहजचि आला। जाउनी कुंडासमीप बैसला। दिसतां बाळ टोकती तयाला। ठेवावें पागोटें बाहेर हो।।८३।। न शिवावें जरी बैसलां। दुरूनीच करावें दर्शनाला। शब्द ऐकतां कांहीं न वदला। पाही नुसते बाळांकडे।।८४।। इतुकीच घटना श्रोते तेथ। संपला यज्ञ आले इंदूरांत। लोटला पूर्ण मास तयाप्रत। बाळांस नव्हती स्मृती जरा।।८५।। दैनंदिन बाळ नानांकडे। दिवसा रात्रीं असे खडे। त्यांचे भोवतीं सदाच, गृहाकडे। जाती अपुल्या कधींतरी।।८६।।





काय बुध्दि तये दिनीं। देवतांस [1] नाना सर्वे घेउनी। रात्रीं बाळ घरालागुनी। आले निजण्या स्वत:च्याच।।८७।। अकस्मात रात्रीं किंचाळले।‘नाना धावाऽ!’ ओरडूं लागले। भयंकर विक्राळ रुप दिसलें। बाळास साक्षात् दारापुढें।।८८।। घाबरती देवता नारायण। भाऊंनाही न ये कळून। झालें काय बाळालागुन। अवचित ऐसें अपरात्रीं।।८९।। बाळ म्हणती जातो प्राण। पहा! आलें लिंबू धावून। भाऊ! मरतोंच मी रे जाण। धावून जा तूं नानांकडे।।९०।। होती अडीच तीनामधली। वेळ विचित्र अपरात्रींतली। कैसें उठवावें नानांस, पडली। चिंता भाऊ देवतांसही।।९१।। इकडे घामानें बाळाचें। भिजे सर्वांग थरथर साचें। छातींतल्या धडधडीचें। प्रमाण वाढूं लागलें हो।।९२।। त्यांना निश्चित अशुभ भयद। दिसत होते दारांत बंद। काळचि धावुनी येतो सबंध। गिळावया जणुं आपणासी।।९३।। शांत होतें बाहेर सर्वत्र। बंद कवाडें, ऐन रात्र। चहाळ नव्हता किंचिन्मात्र। कुठेंही गल्लींत इथें तिथें।।९४।। इकडे हरसिध्दीवरी नाना। निजुनी तरीही दत्तराणा। जपमाळ अंतरीची मुळींही ना। थांबलेली क्षणभरीही।।९५।। देवता ‘करुणात्रिपदी’ भले। भाऊही ‘घोरात्कष्टात्’ गाऊं लागले। घडघडा, परी न ओसरलें। भय बाळांचें किंचित पहा।।९६।। लाल तांबडें बांधलेलें। मंत्रित धाग्याचें लिंबू दिसलें। वेगानें फिरत येऊं लागलें। जणूं गोळी बंदूकीची।।९७।। बंद दार जरी होतें। भेदूनि आलें सहजचि ते। क्षणार्धात आपणावरी आदळतें। बाळांस वाटे पुरतेपणीं।।९८।। आणि भयानें ओरडून। म्हणतीभाऊ मी गेलों मरून।

१-नारायणराव ‘ देवता ’ - श्रीनानांचे शिष्य.

श्रोते! ऐका, लिंबू विलक्षण। वेगानें जातां कानामागें।।९९।। लिंबू कानास गेलें चाटुनी। हें अनुभविलें प्रत्यक्ष बाळांनी। मागें आपुल्या उभेच कोणी। वाटे तयांना साक्षात पहा।।१००।। कोण मागें तें न कळले। श्रीमत् वासुदेवानंदांपरी भासले। दंड एका हातीं धरिले। लिंबू झेलिती दुस-या करें।।१०१।। अकस्मात् बाळ उमजले। दिव्य शक्तीनें खास वाचले। लिंबू झेलुनी प्राण आपुले। निमिषभरीचा काळ अवघा।।१०२।। परंतु पाहती पुन्हां समोर। आले वेगाने तसेच नारळ। बांधले लाल धाग्यानें सकळ। आदळेल आतां खास।।१०३।। घोरात्कष्टात् आणि त्रिपदी। मोठ्यानें म्हणती यथाबुध्दी। देवता भाऊ जणुं समाधी। लागे तयांत दोघांचीही।।१०४।। हा प्रकार अवघा असला। बाळगृहीं चाललेला। इतक्यांत थाप दाराला। वाजे प्रत्यक्ष त्या अपरात्रीं।।१०५।। आणि कैसें अद्‌भुत नाना। राखण्या आपुल्या भक्तांना। स्मर्तृगामी होऊनि जाणा। धावुनी येती वात्सल्यानें।।१०६।। ऐकावें हें पुढीलाध्यायीं। चालली आतां गाथा ही। नानांचेच समक्ष पाहीं। कळसाप्रती सुगमतेनें।।१०७।। श्रीगजाननांच्या प्रेरणेनें। श्रीनानांच्या आशीर्वचनें। मार्तण्ड-महिमा अद्‌भुततेनें। फुलतो अनिवार विजयमुखें।।१०८।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते सप्तदशोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।





## अध्याय १८वा - भक्तवत्सल नाना



।। स्नानें करुनी पहांटे मंदिरी । शिवाच्या प्रसिद्ध रामेश्वरी ।
रखमाबाई पाहते गाभारी । शिवलिंगासमीप नानागुरु ।।

# अथ अष्टादशोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

ॐ हे जगदाधारे लक्ष्मीमाते। विश्ववैभव सतेज विनटतें। अंबे तुझेंच सर्वत्र फुलतें। राजस हास्य ठायीं ठायीं।।१।। रत्नाकराची कन्या कमला। विष्णुपत्नी नारायणी मंगला। अनंत भगवंतांच्या पाऊला। सेवीत बैसली अखंडित।।२।। कनकरूपा दिव्यदेहिनी। प्रसन्न हरिप्रिये कृपालोचनीं। पाहिलें जरी कोणाही लागुनी। होय कुबेर धनवंत तोचि।।३।। पद्माक्षी अवघेच खेळ ते। चंचले केवळ तुझ्याच साठीं। अवघ्या जगाची आटाटी। कृपेस्तव माउले तुझ्या चाले।।४।। पद्मानने तूं लावण्यललिते। समृध्दी आनंद संपन्नते। निवासें तुझिया दारिद्र्य पळतें। भक्तांचे दूर देशांतरीं।।५।। रंकासी निमिषांत चक्रवर्ती। श्रीमंत सर्वसमर्थ नृपती। करिते करुणा चित्तीं। येतां जरी तुला कधीं।।६।। हे चैतन्यशक्ति श्रीवल्लभे शुभदे। तूं मधुर वाणी मंगलवरदे। दारिद्र्य माझें लया जाऊं दे। संपन्नतेचा पूर येवो।।७।। वर्षाव वसुमते मजवरी न्यारा। होवो अखंड कृपेचा सारा। भिजवावें तृप्तीनें कनकधारा। विश्वंभरा तूं आनंदमयी।।८।। श्रोते! थाप दारावर। प्रत्यक्ष येतां कानावर। भाऊ वदतो सत्वर। देवता! उघडा दार तुम्हीं।।९।। परी ओरडे बाळ तयांना। जायचें दाराजवळी कुणी मुळीं ना। आले मारेकरी मारण्या। बाहेर

मजला बोलाविती।।१०।। इतुक्यांत नारळही वेगानें। आले बाणासरिसे बाळानें। मिटल्या घट्ट नयनांनें। हांक मारिली नानांना।।११।। पहा, अघटित परंतु तेथें। नारळ जवळुन वेगें जाते। मागें बाळांच्या कोणी ते। घेती झेलुनी अलगदपणें।।१२।। पुन्हां विश्वासले जरा बाळ। तोंच साक्षात् समोर काळ। उभा दारांत केवळ। विकट हास्यें शस्त्रासह।।१३।। केंविलवाण्या स्वरांत 'नाना। यावें हो माझ्या रक्षणा। न्यावया आला वाटे प्राणा'। वदती बाळ आपुल्याशीं।।१४।। ऐसे होते विनवीतच। वाजणें दारावरलें तोंच। वाढलें पाहूनियां साच। उठले भाऊ जागेहुनी।।१५।। पहा तिथें भयानक सारें। विचित्र अभद्र वावरे। बाळांनाच होते सतावणारें। न दिसे अदृश्य तें दोघांसीही।।१६।। उघडतां दार समोर नाना। आर्त हांकेनें धावुनी जाणा। आले भलत्या रात्रीं रक्षणा। वत्साचे आपुल्या एकनिष्ठ।।१७।। दिसतां नाना मावळलें दर्शन। कृतान्त काळाचें बाळालागुन। क्षणापूर्वीचें आक्रंदन। थांबलें पहा तत्काळची।।१८।। उभी मागें जी विभूती। झेलीत अशुभ प्रहार निश्चिती। तीही अंतर्धान पावती। झाली निमिषांत तेथोनि पहा।।१९।। शांत नाना मृदुलतेनें। सांगती बाळास प्रेमानें। भ्यावें न इतुकेंही आतां मनें। व्हावें तुवां निर्भय बाळ।।२०।। तुझी हांक ऐकूं येतां। पहा धावलों घरीं न सांगतां। भैय्या-वहिनीस, दारें ही सर्वथा। मोकळीं टाकून आलों इथें।।२१।। खुद्द स्वामी उभे इथें। कोण तुला मग मारूं शकतें।





येईल तें ते झेलीत होते। सहजलीलें कृपानिधी।।२२।। धडधड मनाची अवघी थांबली। भयभीत वृत्ति स्थिरावली। धांवोनि बाळानें घट्ट धरिली। पाऊलें आपुल्या सद्गुरूंचीं।।२३।। पहा नानांची थोरवी कैसी। धांवोनि आले बाळगृहासी। पुढें गोष्ट वर्तली तराण्यासी। नाना आले बाळांसवें।।२४।। तों एक गांवढा अपरिचित। भेटण्या येतांच पाय धरत। रडूं लागला मुळीं न कळत। संदर्भ त्याचा बाळांलागीं।।२५।। तों म्हणाले नाना तयास। पहा वांचविले तुला खास। प्रयोग भयंकर कुणाही नरास। न करावा तूं याचेपरी।।२६।। ना तरी तुझी धडगत। न लागेल, आतां या वचनाप्रत। मानावें इथून पुढें निश्चित। सोडून दे हा वेडेपणा।।२७।। अरिष्ट अवघें बाळावरचें। ओढविलें स्वतःवरी नानांचे। सहृदय प्रेमळ मनाचे। ज्ञानसागर मूर्तिमंत हो।।२८।। तीन वर्षे पुढें त्यांना। प्रातःकाळीं तोंड धुतांना। रोज होई स्त्राव जाणा। रक्ताचा तो कष्टप्रद।।२९।। भक्तकार्यार्थ नाना धांवुनी। अचूक जाती वेळींच प्रगटुनी। ये विषयींची तुम्हां लागुनी। करितों सादर दुसरी कथा।।३०।। रखमाबाई नामक नानांची। भक्त भाविक होती मनाची। अशिक्षित पुरी भाबडी साची। उतारवयाची इंदूरामधें।।३१।। पैसेही धड मोजतां जिला। न येती ऐशा रखमाबाईला। नानांचे चरणीं श्रद्धा अतुला। मात्र तिची पहिल्यापासून।।३२।। कैसा वेडा भाव तिचा। सिंहस्थांत तिला स्नानाचा। आला योग शिप्रेचा। होते असंख्य जन घाटावरी।।३३।।

कोणी वदले थट्टेनेंच। काय गे करितेस एकटीच। स्नान घडवावें तुझिया गुरूंस। आज येथवां रखमाबाई।।३४।। तेव्हां बोचक्यांतील नानांचा। फोटो घेऊनी, करी नामाचा। गजर, शिप्रामाईत बुडविण्याचा। प्रकार केला तीनदां तिने।।३५।। आणि वदे घडलें स्नान। आज माझ्या गुरूसही जाण। एव्हांना तो फोटो भिजून। कागद ओला उरला फक्त।।३६।। नव्हतें त्याचेंही भान तिला। आनंदात त्या घटकेला। ऐशी रखमाबाई नानांला। वदे येऊनी एकदां घरीं।।३७।। नाना जातें मी यात्रेस। घेऊन संगें माझ्या पतीस। आम्ही दोघेंही म्हातारीं खास।असूं द्या, लक्ष आमुच्यावरी।।३८।। ते वेळीं नानांजवळी घरांत। बैसले होते भोंवतीं भक्त। तरीही वदती ते बाईप्रत। राहील बरें लक्ष आमुचें।।३९।। जावें यात्रेस दोघें खुशाल। आतां तुमचा वृद्धापकाळ। करावया जमतील त्या सकळ। तीर्थयात्रा उभयतांनीं।।४०।। इतुकेंच बोलणें दोघांचे। निघालें जोडपें हळूहळू यात्रेचें। करीत ठिकाण रामेश्वराचें। तीर्थी पोंचलें वंदिण्यास।।४१।। स्नानें करूनी पहांटे मंदिरीं। शिवाच्या प्रसिध्द रामेश्वरीं। रखमाबाई पहाते गाभारीं। शिवलिंगासमीप नानागुरु।।४२।। करीत होते अभिषेक। रुद्राचा घडाघडा मुखानें देख। आश्चर्ये रखमाबाईस सुख। जाहलें तिथें अनिवार पहा।।४३।। आनंदानें लगबग निघाली। पुसण्यास नानांना रखमा भोळी। तों नानांनींच खुणा केली। एका हातें थांब जरा।।४४।। उठले जागेहुनी नाना। प्रदक्षिणेच्या मार्गी पतिपत्नींना।





बोलावुनी हातावरी टाकतांना। तीर्थ-विभूती बोलले त्यां।।४५।। अभिषेक संपतां तुम्हांसी। भेटेन निश्चयें द्वारापाशीं। यावे पाहून तोंवरी मंदिरासी। सगळीकडे फिरोनियां।।४६।। ‘नाना तुम्ही केव्हां निघाले। वाटेत कुठेंही आम्हां न भेटले। सांगेन मागाहुनी सगळें। दोघांसीही निवांतपणें’।।४७।। झाला संवाद ऐसा दोघांचा। नाना आणि रखमाबाईचा। गेले परतोनी गाभारीं, पतिपत्नींचा।आनंद न मावे मनांतील।।४८।। पहा माझे सद्‌गुरु किती। प्रेमळ आपुल्यासाठीं येती। दूर इंदुराहूनि निश्चिती। वदे बाई पतीलागीं।।४९।। बराच समय उलटून। गेला, परी न आले परतून। नाना पुन्हां गाभा-यांतुन। निराश झाली रखमाबाई।।५०।। चौकशी तिथें केली फार। परी न पत्ता लागला, अखेर। चुकामूक होईल म्हणुनी जागेवर। परतलीं दोघेंही मुक्कामासी।।५१।। पुन्हां श्रोते! प्रवास परतीचा। चालिला जेव्हां पंढरपुरीचा। विठू सांवळा लाडका भक्तांचा। पाहून निघालीं इंदूराकडे।।५२।। तों स्टेशनावरी गर्दी अमित। यात्रा होती पंढरपुरांत। म्हातारे दांपत्य कसेंबसें तेथ। उभें होतें गाडीपुढें।।५३।। येतां गाडी फलाटावरी। धूम प्रवाशांची आंत सारी। बिचारी बावरलीं धडपड बळजोरी। करिती कैसीं शिरण्यास्तव।।५४।। अकस्मात् तिथेही नाना। अवचित आले, जवळी त्यांना। म्हणती पाहता काय चढा ना। आंत समोरच्या डब्यांतची।।५५।। हात धरिला चटकन् नानांनीं। गर्दीत डब्याच्या दारीं जाऊनी। नेलें

बघा सुखरूप बैसवुनी। बांकावरी एका आंत।।५६।। आणि तेव्हां घाईघाईनें। म्हणती आलोंच, कोणास भेटणें। फलाटावरी उभेच जेणें। पोंचविलें मज स्टेशनावरी।।५७।। क्षणार्धात् ऐसें सांगूनी। घाईनें आले तैसे निघुनी। खालीं गेले उतरोनी। निघाली गाडी समयावरी।।५८।। तोंवरी नाहीं परतले नाना। हळहळ सारी रखमाबाईला। राहिले खालींच कीं कांहीं कळेना। चढले किंवा डब्यांत कुठें।।५९।। यात्रा संपवुनी आली इंदूरीं। मिळतांच सवड नाना-घरी। येउनी बाई भडभडा विचारी। कां हो नाना बैसला कुठें ?।।६०।। हंसले केवळ ऐकून प्रश्न। श्रोते ! कुठेंही न घरास सोडून। गेले नाना, मास पूर्ण। घालविला होता घरींच पहा।।६१।। हें कळतां मात्र पडला। प्रकाश हृदयीं दाटून आला। भावभक्तीचा अनिवार उमाळा। प्रेमें नानांचे चरण धरी।।६२।। ऐसीच विलक्षण अद्भुत। ऐकावी आतां कथा सत्य। चिमणलाल मास्तर नामक गृहस्थ। भक्त नानांचे एक जुने।।६३।। मातृगयेसी मास्तरांची। पडली गांठ नानांची। संसारी नव्हती त्यांची। आकर्षिता पहिल्यापासूनच।।६४।। सहवासानें कांहीं दिवस। श्रद्धा नानांचे चरणांस। जडली एकविध हृदयास। ओढ असे साधनेची।।६५।। काय करावी साधना। पुसते झाले ते नानांना। तेव्हां गायत्रीपुरश्चरणा। कथिलें तयांस करण्यास्तव।।६६।। रोज तेथल्या तलावांत। सांज सकाळीं होऊनि स्नात। बैसती जपास निवांत। तेथेची जवळ






चिमणलाल।।६७।। पुढें नाना इंदूराला। निघोनी आले, होऊं लागला। नेम मास्तरांचा सिद्धपूरला। चाले अहर्निश शांततेनें।।६८।। इकडे घरीं असतां नाना। रोज नियमानें फिरण्या। बाळांना सवें घेऊनी जाती स्थाना। ठरल्या वेळीं निश्चितपणें।।६९।। कधीं कोणीं भक्तानें। जरी पाचारिलें आग्रहानें। फिरून येतांना थांबणे। होई नानांचे त्याचे घरीं।।७०।। एके दिनीं सायंकाळींच। लागले परतायासी फिरूनच। तों मध्यें चालतां रस्त्यांतच। क्षणार्ध थांबले नानागुरु।।७१।। बाळाखेरीज दोन चार। होते नानांचे बरोबर। त्यांसही न कळलें रस्त्यावर। नाना थांबले कशासाठीं।।७२।। उजवा पाय आपुला नाना। उचलूनि वरतीं क्षणार्ध पुन्हां। खालीं ठेवोनि लागले चालण्या। निमिषांत घडली क्रिया सारी।।७३।। ही विचित्र कृती नानांची। कळली परि न चाले कुणाची। तर्कबुध्दी तेथ पुसण्याची। हिंमत करिती बाळ मग।।७४।।‘ नाना, कांहीं त्रास पायाला। मध्येच का अपुल्या झाला। म्हणुनी उचलिला वाटे मला। रस्त्यात तुम्ही अकस्मात’।।७५।। उत्तरले तेव्हां मंद हांसून। अरे, बुडत होता तयालागुन। हात दिला, इतुकेंच बोलून। धरिती मौन नाना पुन्हा।।७६।। पहा, श्रोते! त्याच वेळीं। मातृगयेंत तलावांत चिखलीं। घसरूनि चिमणलाल स्नानवेळीं। बुडत होते आंत खोल।।७७।। जैसे जाणवलें तयांना। तोल गेला नेतो आपणा। तलाव आतां एकही क्षणां। न दवडितां ओरडले ते।।७८।। ‘नाना !

वांचवा मी बुडालों। पुरश्चरणापूर्वी स्नानास आलों। निसरड्यावरूनी घसरलों। जळांत तुम्हीच राखा आतां ’।।७९।। आणि तेव्हां अदृश्य शक्तीनें। कुणीतरी सांवरिलें हातानें। मास्तरांस आधार कांठानें। गवसला तेथ तात्काळची।।८०।। तीच वेळ, तोच क्षण। नाना रस्त्यांतच थांबून। पाय आपुलाच उचलोन। चालूं लागले क्षणभरानें।।८१।। परी न कथिलें कुणा भक्तां। प्रकार घडे जो सूक्ष्मांत आतां। मौन पांघरती नाना तत्त्वतां। घडलें कांहीं जरी कुठें।।८२।। पुढें चारच दिवसांनीं। आलें पत्र मास्तरांकडूनी। साद्यन्त हकीगत कळविली त्यांनीं। ओथंबून कृतज्ञतेनें।।८३।। भक्तवत्सल तुम्ही नाना ! वांचविलें मज बुडतांना। आर्त हांकेस ऐकून जाणा। तात्काळ झालां प्राणदाते।।८४।। ऐकिली गोष्ट गुरुचरित्रांतून। आठवितां द्विजानें कळवळून। श्रीगुरु आले रक्षणालागून। प्राण राखिले चोरांपासोनी।।८५।। दिला मलाही तसाच प्रत्यय। करुणामूर्ते सदयहृदय। तुम्हींच माझे दत्तमाय। साष्टांग वंदन नानागुरु।।८६।। तेधवां होई अवघ्यांना। उलगडा पत्र वाचतांना। अथांग नानागुरूंच्या मना। कोण जाणेल पुरतेपणीं।।८७।। उदेपुरापासोनी थेट। कोल्हापुरीं, तिकडे गुजराथेंत। पसरले नानांचे अगणित। शिष्य अवघ्या थरांतले।।८८।। जात पात शिक्षण पंथ। भेद न कधींही संताप्रत। साक्ष याची दिसे नित्य। नानांचिया भक्तांमध्यें।।८९।। अत्युच्च पदीं विराजमान। भक्त ऐसेही नानांलागुन। अक्षर ओळखही





नसे जाण। भक्तांस कांहीं नानांचिया।।९०।। परी भाव पाहूनि मनांतील। जैसा ज्याचा तैसेच दिसतील। नानागुरु प्रसन्न सोज्वळ। अधिकार जाणूनि भक्तांचाही।।९१।। नारायण नामक वेडा चरणांचा। एक कलंदर भक्त साचा। होता शिंपीकामाचा। व्यवसाय ज्याचा अत्युत्तम।।९२।। बाळपणींच त्यानें मंत्र। घेतला नानांचा मनीं पवित्र। आज वृत्ती पालटे मात्र। विलक्षण, गुरूंच्या कृपेमुळें।।९३।। येतां आठवण नानागुरूंची। असो कुठेंही निघे देवतांची। स्वारी पहा दर्शनाची। आस हृदयीं बाळगोनी।।९४।। प्रत्येक वस्तुमात्र पाहती। देवताभावें म्हणूनि म्हणती। अवघे थट्टेनें त्या प्रती। ‘देवता नारायण’ ओळखीचे।।९५।। मुक्तहास्यें अनिवार। जोडती हात भेटतां साचार। कोणासही लहान थोर। भेद नाहीं त्यांचे उरी।।९६।। ऐसा अखंड नामजपांत। अनुसंधानें जवळी चित्त। ध्यायी देवता नानांप्रत। हांसती जरी भोंवतींचे।।९७।। पूर्ण नाहीं अजुनी साधना। परी भोळ्या भक्तीनें नाना। अंकित असती यांत मुळींना। संशय कसला, देवतामनीं।।९८।। चरणीं नानांचे ठेवूनियां। यथा-देवता तात्काळ कराया। लागती कीर्तन घेवोनियां। आख्यान कुठलेंही सांगतांच।।९९।। नानांचे निःसीम भक्तांत। आठवितां यांचे नांव खास। येती आपुल्याही हमखास। स्मृतीत देवता केव्हांही।।१००।। असो, आतां एकच कथा। कथितों लहान जरी तत्त्वतां। वासुदेव मूर्ती संकल्पूनि चित्तां। येती यतिवेषें नानाघरीं।।१०१।। होता दिवस तो

कोजागिरीचा। लोकांसी वाटितां अवघ्या दूधाचा। साठां जेव्हां संपला चरवीचा। तळही कोरडा दिसूं लागला।।१०२।। आणि मागूं लागलें यति। दूध प्यावया नानांप्रती। वंदुनी त्यांना नाना विनविती। आणितों दूध शेजारून।।१०३।। हवें परी तुमच्याच गृहींचें। आग्रहें यति वदले वाचे। चित्तासी विचित्र पडलें नानांचें। संकट तेधवां पहा।।१०४।। तों आठविलें शास्त्रवचन। दूध नसल्यावेळीं देऊन। नारळांतल्यां जळालागून। पर्याय माना तो निःसंदेह।।१०५।। *।।श्लोक।।* ।। नारिकेलोदकं पीत्वा, अक्षक्रीडां समाचरेत्।। *।। ओंवी।। होते ते ओले नारळ गृहांत। फोडुनी नानांनीं पाणी काढत। चांदण्या उत्तररात्रीं देत। स्वामिरायांसी प्यावयातें।।१०६।। हंसलें स्वामी तृप्तीनें। पिऊन तेव्हां आशीर्वचनें। निघून गेले, ऐसें भक्तीनें। जिंकिलें नानांनी श्रीगुरूंसी।।१०७।। खरोखरी थोर अधिकार। धन्य सद्‌गुरूंचा शिष्यही धुरंधर। जगांत नानांचा जयजयकार। साक्षात् दत्त एकनाथ।।१०८।। श्रीगजाननांच्या प्रेरणें। नाना गुरूंच्या आशीर्वचनें। 'मार्तण्ड-महिमा' कळसा येणें। विजयवाणी कृतार्थ होय।।१०९।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते अष्टादशोऽध्यायः समाप्तः।

।। अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।।

## अध्याय १९वा - अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः। अंतस्त्यागी बहिर्रागी लोके विहर राघव ।।



।। मागें पुढें खालती वरती । दयाळे तुझ्याच पाहतो मूर्ति ।
असंसी जैसा तूं तयांप्रती । अखंड माझे साष्टांग नमन ।।

# अथ एकोनविंशोऽध्यायः।

।। ॐ श्रीगणेशाय नमः। ॐ श्रीसरस्वत्यै नमः। ॐ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः।।

हे अत्रिनंदना योगेश्वरा। अनसूया सतीच्या तपास प्रभुवरा। भुलोनी भुवनीं करुणासागरा। त्रयमूर्ति झालासी आनंदानें।।१।। ब्रह्मा-विष्णु-महेशमूर्ती। दत्ताची सगुण सत्कीर्ती। अकारणवत्सल या त्रिजगतीं। भक्तरक्षणा अवतरलेली।।२।। काळाप्रमाणें अंगीकारोनी। उचित सर्वहिताय तें करोनी। कर्मभक्तींच्या संगमीं दोन्ही। सरस्वती योगाची राखिली गुप्त।।३।। पूर्वी सहस्रार्जुनासी। उन्मुक्तपणें दिधलें वरासी। राखाया प्रभो अपुल्या शब्दासी। दंडिलें परशुधर होऊनियां।।४।। अवधूतमिषें आपण हिंडोनी। गुणांचे सार अवघ्यापासौनी। कैसें घ्यावें तें आचरोनी। दाविलें करितां चोवीस गुरु।।५।। वेद धर्माची गहनगाथा। होऊन प्रत्यक्ष योग तत्त्वतां। साक्षात् तुम्ही श्रीगुरुदत्ता। वस्तुपाठ झाले जगासाठीं।।६।। 'श्रीगुरुचरित्र' पुण्यपावन। तुमचेंच नाथा कथा-जीवन। आजही त्रिजगीं संजीवन। देते आर्त जीवनासी।।७।। वेदाधारा भक्तरक्षका। औदुंबरींच्या दत्तनायका। लीलाविनोदे देहां अनेकां। तुम्हीच वत्सले स्वीकारलें।।८।। करंजनगरीं अक्कलकोटी। आळंदीसही देवा तुमची भेटी। गरुडेश्वरास नर्मदातटीं। आनंदे रमलां योगिराया।।९।। नारेश्वरीं करवीरपुरीं। हिमाद्रीच्या गिरिगव्हरीं। सह्याद्रिवासी, पावन माहुरीं। पवित्र निवासें त्रैलोक्य तुझ्या।।१०।।

आज माऊले नाना रूपें। दिसती नेत्रांसी जगीं स्वरूपें। अनंत धरोनि नामें गौप्यें। क्रीडा नित्य चाले तुमची।।११।। देवाधिदेवा श्रीगुरुदत्ता। कैसें पूजन करूं समर्था। हृदयीं दाटून आलें आतां। अपार तुम्ही, निःशब्द मीही।।१२।। पाणावल्या लोचनांसी। अर्घ्ये वाहतों मी चरणांसी। लाजुनी वाणी मौनासी। लपते माझी अंतर्मुख।।१३।। मागें पुढें खालीं वरतीं। दयाळे तुझ्याच पाहतों मूर्ती। अससी जैसा तूं तयांप्रती। अखंड माझें साष्टांगनमन।।१४।। घ्यावें अपराधी मी अनन्य। चरणीं लेंकरूं करूनी मान्य। दीनार्तांचें मंगल शरण्य। तुम्हीच, त्रिवार वंदन प्रभो।।१५।। श्रोते! गुरुमूर्ति नानांच्या। कथा पुण्य जीवनाच्या। निवेदिल्या मी तयांच्या। प्रेमळ आशीर्वचनें तुम्हां।।१६।। आचरलें वेळोवेळीं जाणा। सद्भावें ध्यानपूजना। केल्या अनेक देवतांच्या आराधना। गुरुमूर्ति नानांनी।।१७।। पूर्व जीवनी श्रीगणेश। आराधिलें यथासांग मंगलमूर्तीस। पाठ अखंड अथर्वशीर्ष। करोनि आणिलें ध्यान चित्तीं।।१८।। ॐ गं गणपतये नमः। या मंत्रास सतत नाना। जपोनी यथाशास्त्र दर्शना। प्राप्त करिती संकल्पिता।।१९।। त्रयोदशाक्षरी प्रभुरामाचा। अहर्निश एके काळीं साचा। जप-यज्ञ करोनि मनाचा। नाना उपासिती सीतापति।।२०।। उपासना होतां उत्कट। पाहती नाना रघुवीर निकट। तृप्तावुनी मग अंबेसी नीट। आराधिती नानागुरु।।२१।। स्वप्नीं जागृती अंबामूर्ती। दृष्टांत होतां पुढें वळती। वसुदेव-देवकी लाडक्याप्रति। निष्ठा मनीं





धरोनियां।।२२।। तें सुगंधित अमर दर्शन। घडतां मानसी संतोषून। अखंड नाना करिती ध्यान। श्रीदत्तांचे मनोभावें।।२३।। ‘दत्तप्रबोध’ ‘दत्तपुराण’। गुरुचरित्राचें अनिवार पठण। दत्तमाहात्म्यही आवडतें पूर्ण। आजही लाडकें नानांचें तें।।२४।। श्रीदत्तांचे बीजमंत्र। दत्तसुतांची वाणी पवित्र। वाचिती ऐकती क्षणमात्र। नाना तल्लीन मनें अति।।२५।। श्रीगायत्रीचें पुरश्चरण। पितयापासोनी व्रताचरण। घेती नाना आपुलें जीवन। तपःशुध्द करावयासी।।२६।। कित्येक वर्षांपासूनि नक्त।भोजन एकदां घेती फक्त। देतां प्रेमें कुणी भक्त। स्वीकारिती फराळ रात्रीं।।२७।। मातापित्यांच्या वियोगावरी। न धरिती अंगरखा अंगावरी। शुभ्र उपरणें खांद्यावरीं। पायींचे चढाव सोडिती तदा।।२८।। वीस वर्षांपूर्वी नाना। नव्हतें जाणें कुठेंही भोजना। स्वयंपाक सोंवळयांत जाणा। करिती त्रिकाल संध्यापूजा।।२९।। पहांटे तीनला उठोनियां। स्नानपूजा आवरोनियां। नानांची थोडी दिनचर्या। सांगेन संक्षेपें तुम्हांलागीं।। ३०।। हरसिध्दीवरी जरी। आपण गेलां आजही निर्धारी। शुचिर्भूत नानांची स्वारी। आसनीं डोलत पहाल तुम्ही।।३१।। मग माध्यान्हीचे वेळीं। घेती भोजन सात्विक थाळी। कसली आवड नाहीं वेगळी। आनंदें सेविती प्रसाद अन्न।।३२।। दुपारीं वाचन लहर जैसी। प्रीती ‘योगवासिष्ठ’ ग्रंथासी। ‘अध्यात्म रामायण’ भागवतासी। विशेष वाचती आवडीनें।।३३।। उपनिषदांचें सदा मनन। आत्मदेवाचें अनन्य चिंतन। दत्त

नामाचा अंतरी पूर्ण। श्वासासवें ध्यास त्यांना।।३४।। सायंकाळीं उतरता दिन। जाती नेमें बाहेर फिरून। आठापूर्वी पुन्हां परतून। त्रिपदी होई गाभा-यांत।।३५।। दिवसारात्रीं उघडीं दारें। कोणी न अडवेल कधींच सारे। भक्तांचे संतत हे सोयरे। येती केव्हांही दर्शनास।।३६।। गुरुवारी अचूक रात्रीसी। दरबार लाडक्यांचा भजनासी। लयलूट भजनाची धुंदमनेंसी। चाले पहांटे पर्यंत कधीं।।३७।। गुरुपौर्णिमा श्रीदत्तजयंती। नागपंचमी भक्त प्रेमें करिती। उत्सव कीर्तन अभंग रीतीं। साजरे होती हरसिध्दीस।।३८।। अन्नशांती हा नानांचा। आवडीचा संकल्प मनींचा। पुरवितो मात्र श्रीगुरु त्यांचा। सकळ समृद्धी आनंदानें।।३९।। विख्यात जागोजागींचे। संत येती घरी साचे। आवार आनंद कैवल्याचें। हरसिध्दीवर नांदे पहा।।४०।। सून मुलगा नातू नानांचे। कन्या जामात आदि निकटचे। छत्र आप्तांवरी हास्याचें। सकळांवरी धरिती नानागुरु।।४१।। प्रापंचिक संकटें त्यांनाही। येती खरीच कधीं गृहीं। प्रसन्न मुद्रेनें सर्वांस पाही। शांती क्षमाशील नाना।।४२।। चहूं दिशांत संचार त्यांचा। वाढला शिष्ययोग भक्तांचा। होतो दरसाल आमंत्रणांचा। वर्षाव दूर ठिकाणाहूनी।।४३।। कधीं रं ।ंत येती नाना। तेव्हांच कथिती भक्तांना। आनंदे कथांच्या लाटांना। येते भरती सहज मग।।४४।। रात्रीं भजनांचे अवसरीं। वाजविती नाना टाळ साजिरी। पाहतां चकित होतो अंतरीं। उत्कट चपळ तालगति।।४५।। उपनेत्र मुळीं न लागती।





आजही नानांसी वाचण्याप्रती। श्रोते! दोन तासांची विश्रांती। पुरी वाटे अहर्निशीं।।४६।। चालती अखंड सूक्ष्मांतरीं। क्रिया त्यांच्या साक्ष खरी। देतील कित्येक भक्त तरी। आजही प्रत्यय साक्षात ये।।४७।। केव्हांही जा, वत्सलतेनें। भक्तांचे कुशल प्रेमानें। पुसती देती आठवणीनें। विभूती नाना भक्तकरीं।।४८।। जैसी ज्याची उपासना। तैसेंच वदती त्यासवें नाना। कठोरतेचें कधींही ना। नांवही दिसे सान्निध्यांत।।४९।। दिवसा रात्रीं अवेळीं ही जावें। तरी आनंदी शांत दिसावे। नानागुरूंचे पाय पहावे। तृप्तमानसें भक्ती अवघ्या।।५०।। जुने नवे अवघे संत। असो कोणताही पंथ। नानांसी वाटे प्रेम अमित। नांव काढतां त्यांचेपुढें।।५१।। पाठांतर स्तोत्रांचें अभंगांचें। हिंदुस्थानीही कितीक पदांचें। वेदपाठ ऐकावे ऋचांचे। मुद्दाम एकदां नानामुखें।।५२।। ताल, भाव उच्चारण। ऐकतां आपण होऊं तल्लीन। वाटे वेदोनारायण। बैसला नाना होऊनियां।।५३।। देव पतिपत्नी रतलामींचे। सुभेदार कुटुंब पूर्णचि साचें। भिडे काळे आदि मुंबईचे। आराध्य अवघ्यांचें नानागुरू।।५४।। भैय्या वहिनी प्रेमळ नानांचीं। अखंडचि प्रत्यंतरें अंतरीचीं। कितीक लाडक्या भक्तांची। सांगूं नांवें अमित खरें।।५५।। पवार आबा मृदंग भजनीं। तिवारी देवता नित्य यांनीं। जिंकिला हा चिंतामणी। अनन्य आपुल्या निष्ठेनेंच।।५६।। श्रोते! प्रकार रोज अनिवार। घडती जिथें अथांग सागर। काय वर्णू मी हा अवतार। एकनाथांचा खचित वाटे।।५७।।

पहावें शुद्धमनें येऊन। मुद्दाम इंदूरी हरसिध्दीलागून। ऐकाल जयजयकार पूर्ण। दत्तप्रभूंचा अखंड इथें।।५८।। धन्य माझें भाग्य आतां। कळसाध्याय तुम्हीं ऐकतां। नानाकृपेनेंच ही गाथा। आली सांगतेस पूर्वभाग्यें।।५९।। या ग्रंथाची अवतरणिका। अवघे भक्तहो तुम्ही ऐका। आला श्रीगुरुनानांसारिखा। संतराणा जीवनीं धन्य।।६०।। श्रीदत्तजयंतीचे योगावरी। स्फूर्ति गजाननें मला खरी। दिधली आणि संपूर्ण सारी। केली श्रीगुरुनानांनी ती।।६१।। वंदन विनम्र सद्‌गुरूंसी। माझ्या हृदयींच्या गजाननासी। शारदामाता कुलदेवांसी। संतमूर्ती आळविल्या मी।।६२।। नानागुरूंचा कुलवृत्तांत। सद्‌गुरूंची परंपरा सांगत। माता-पित्याची शुचिर्भूत। जीवनें कशीं ती बोलिलों हो।।६३।। नागपंचमीचा गुरुवार। अवतरले नाना अवनीवर। बाळपणींच्या आवडी साचार। कथिल्या अवघ्या प्रथमाध्यायीं।।६४।। उपनयन अध्ययन नानांचें। उपासनेचें आर्त मनींचें। वेडे कैसे गुरुकृपेचे। द्वितीयाध्यायीं नाना पहा।।६५।। कठोरतेनें सप्ताह वाचन। करितां आले दुरूनि धावून। सद्‌गुरूमूर्ती वासुदेव जाण। पावन कथा ही नानांची।।६६।। मातोश्री तीर्थरूप देवाघरीं। भार घरांतील नानांवरी। तत्पूर्वी प्रथम लग्नाची घटना सारी। कथिली असे तृतीयाध्यायीं।।६७।। जेष्ठ पुत्रजन्मांनंतरीं। पत्नी दैवें नानांची अंतरली। द्वितीय पत्नीही ये संसारीं। अल्प काळचि नानांचिया।।६८।। कन्या देऊनि लहान साजिरी। लगेच पुढें तीही निवर्तली। संसार माया इथेंच





सरली। नाना जीवनींची सदासाठीं।।६९।। वामनबुवा योगी मंदिरीं। अचानक आले देऊनी। योगानंद सुख गेलेनी। कथा ही चतुर्थासी।।७०।। नानागुरूंचा छंद जाणा। जाती एकटे यात्रेस गहना। काशीपुरीस वृंदावना। स्वच्छंदतेनें पाहती सर्व।।७१।। श्रीशंभूंची दिव्य विभूती। गोपालाची गोजिरी मूर्ति। भाग्यें नाना दर्शनें घेती। पंचमांत या अद्‌भुत कथा।।७२।। जलेरी प्रदक्षिणा नर्मदेची। विख्यात देवता भूमंडळींची। करिती नाना महंत मठाची। कथा आली षष्ठाध्यायीं।।७३।। अथांग सुंदर रेवामाई। कांठानें पाहात नाना पायीं। पंथांत शिवमंदिरीं होई। मुक्त ब्रह्मसमंध एक।।७४।। थकले नाना परिक्रमेंत। आली अन्नपूर्णा रेवा सत्य। दुग्धकलशा आणुनी देत। कथा रमणीय सप्तमांत।।७५।। नाना गेले, बद्रिकेदारीं। हिमाद्रीच्या कुशीमाझारीं। गुंफेंत सिद्धांची दर्शनें सारीं। घडलीं त्यांना अनिवार।।७६।। द्वापारींचे योगी सिध्द। गुंफेत तपस्या करीत शुध्द। भेटींत नानांचें मानस विशुद्ध-। ज्ञानें भरलें रात्रभरी।।७७।। गंगोत्रीस न्यावें विनवितां। गिरिकंदरां निमिषांत तत्त्वतां। ओलांडुनी नानांस झाले आणितां। गंगेवरी अष्टमांत।।७८।। गिरनारीं सौराष्ट्र प्रांतात। आले नाना फिरत फिरत। नाथ-दर्शनार्थ चढत। माथा गिरीचा अनोळखी तो।।७९।। अवधूतांचें साहाय्य तिथें। अश्वत्थामा अवचित भेटे। साक्षात् अनसूया मातेश्वरीतें। वंदिती नाना यात्रेंत त्या।।८०।। श्रीगुरूंचें नव्हतें दर्शन। गरुडेश्वरीं मुद्दाम

म्हणून। निघाले नाना पूर्तता जाण। नवमोध्यायाची होय इथें।।८१।। गरुडेश्वरासी पुण्यतिथीस। पोंचले नाना, रम्य खास। वृत्तांत तो, घेती प्रसादास। समाधीवरील पावनमनें।।८२।। गाणगापुरीं निवास करिती। सप्ताह साधना चरणीं वाहती। यतिपूजनासी पुजारी नेती। गाभा-यांतही नानागुरूंना।।८३।। हा अवघा अलौकिक। वृत्तांत पहावा आणिक। नाना छाबडा नामक। खेड्यांत जाती दशमाध्यायीं।।८४।। प्रभु राघवांची दिव्यलीला। दिसते मंदिरीं नानालोचनांला। आचार्य यज्ञांचे वैश्वानराला। प्रगट करिती ऐनवेळीं।।८५।। शक्तिस्वाहाकार कथा। विश्वासें घडली सर्वथा। मधमाशांची प्रचीती भक्तां। अकराव्यांत आली हो।।८६।। संत चैतन्याच्या अवघ्या भेटी। द्वादशाध्यायासी येती। संत भगवंताच्या मूर्ती। जागोजागीं विख्यात ज्या।।८७।। नानागुरूंसी एकांतीं। पुसतां बोलले कृपामूर्ती। कैवल्य ज्ञानसाधन रीती। तेराव्यांत कथिली प्रसन्नपणें।।८८।। तोच संवाद विदेही नानांचा। चिद्‌ब्रह्माच्या विलासाचा। पुढें चाले कथिती हृदयींचा। शांत भाव चवदाव्यांत।।८९।। होळकरांच्या आदेशानें। राहिले नाना सोडुनी तराणें। श्रीमंत कार्यार्थ राहणें। घडलें त्यांचें बराच काळ।।९०।। श्रीमंत तुकोजींनी भली। सद्‌भावें सोय सारी केली। अहिल्येच्या वंशजाघरीं। पंधराव्यांत राहती नानागुरु।।९१।। तराण्यासी लागून। नाना उद्वेगले मनांतून। इंदूरासी त्यांचें आगमन। पुढें राहणें भैय्यांसवें।।९२।। अनसूयामाता





सिन्नोरची। तृप्तविलीं अंतरें भक्तांचीं। अन्नपूर्णाचि होउनी मार्गीची। कथा ही नाना-यात्रेंतील।।९३।। नंतर देशपांडे बाळांची। विचित्र भयभीत मन:स्थितीची। ओळख करूनी सोळाव्याची। अखेर होई न पूर्ण कथा।।९४।। सतराव्यांत नाना- भेट। घडतां बाळजीवनांत। स्थित्यंतर ये अकस्मात। साधना करविती नानागुरू।।९५।। यज्ञांतली मांत्रिककथा। बाळांवरी ती ओढवतां। नाना निवारिती संकटा। दिसती यात्रेंत रखमाईस।।९६।। चिमणलाल मास्तरांची। माहिती भोळया देवतांची। दुग्धकथा ती कोजागिरीची। वर्णिली श्रोते अठराव्यांत।।९७।। अष्टादश या नाना कळांचा। अध्याय सुंदर हा कळसाचा। दिनक्रम अवघा नानागुरूंचा। संक्षेपें म्यां कथिला इथें।।९८।। ही अद्‌भूत नाना कथा। आनंद अनिवार झाला चित्ता। वैखरीस आली धन्यता। प्रसंग इथें परोपरींचे।।९९।। बडोद्याहुनी भक्तांनी। लिहिलीं नानांस विचारूनी। टांचणें तीं मजलागुनी। दिली आणून बाळांनीच।।१००।। त्या आधारें ग्रंथ लिहिला। प्रत्येक त्यांतल्या माहितीला। पुसोनी नानांसी पक्का केला। कथाभाव अध्यायींचा।।१०१।। उपयोग ना केला कल्पनेचा। इतुकाही म्यां येथें साचा। गहन नाना-जीवनाचा। अर्थ वदलों माझ्यापरी।।१०२।। जें लिहविलें तैसेंच लिहिलें। साक्षी सद्‌गुरूस सदा ठेविलें। लेखणीनें नानांस सदा ध्यायिलें। लेखनाचें कार्य करितां।।१०३।। हा प्रसाद माना नानांचा। आनंद माझ्या जीवनाचा। नित्यासाठीं

जगीं साचा होवो आतां मंगलमय।।१०४।। सद्‌गुरु माझे गजानन। पाहतों नाना मी साक्षात् पूर्ण। तुमच्यांत, आतां या वत्सालागुन। धरावें चरणीं वात्सल्यानें।।१०५।। आशीर्वाद उदंड द्यावे। वाचितां ग्रंथास मनोभावें। संकटी भक्तांच्या धावुनी यावें। करुणामय मार्तण्डनाथा।।१०६।। आदरें करितां पारायण। द्यावें आपुलें प्रसन्न दर्शन। हरावें भवभय निरसोन। भीती भक्तचित्तांतली।।१०७।। रामनवमीच्या नवरात्रांत। शुध्द सप्तमीच्या तृतीय प्रहरांत। शके अठराशे ब्याण्णवांत(१८९२)। ग्रंथ कळसास आला पहा।।१०८।। असो त्रिवार शांती आतां। वंदन तुम्हांसी सद्‌गुरुनाथा। मार्तण्डांची गाथा गातां। विजय लेखणी पावन आज।।१०९।।

।। शुभं भवतु।।

इति श्री मार्तण्डचरिते एकोनविंशोऽध्यायः समाप्तः।

।। पुंडलीक वरदा हरि विठ्ठल।।

।। सीताकांत स्मरण जय जय राम।।

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त।।

।। नर्मदे हरऽहरऽहरऽ।।







# पूज्य श्री नानामहाराजांची मंगल आरती

ॐ जय सद्‌गुरुनाथा दयाळा मार्तण्डनाथा।
हृदय-निरांजन उजळुनी करूं आरती आतां।।१।। ॐ जय सद्‌गुरु नाथा।। धृ।।
भावबळें जिंकुनियां, वासुदेव दाता। स्वामी तुम्ही वासुदेव दाता।
बाळपणांतचि आणिला, अमृतघट हातां।।२।। ॐ जय सद्‌गुरु नाथा।।
देहवीणा तव गाते करुणाघन दत्ता। निरंतर करुणाघन दत्ता।
दत्तस्वरुप तुम्ही नाना, भक्तांच्या चित्तां।।३।। ॐ जय सद्‌गुरु नाथा।।
सत्यनिष्ठ निजजीवनीं कर्मयोगयुक्ता। स्वामी तुम्ही कर्मयोगयुक्तां।
भजनीं नित आळवितां, भक्तीच्या पंथा।।४।। ॐ जय सद्‌गुरु नाथा।।
प्रेममधुर तव वाणी शरणांगत भक्तां। विसांवा शरणांगत भक्ता।
शांतिक्षमामय तुमचा, आश्रय या जगता।।५।। ॐ जय सद्‌गुरु नाथा।।
मंगलमय तव चरणीं जे ठेविती माथा। निरंतर जे ठेविती माथा।
भयहर्ता तूं त्यांना, दाविसी मोक्षपंथा।।६।। ॐ जय सद्‌गुरु नाथा।।
चरणीं आश्रय द्यावा, नित्य मला नाथा। दयाळा नित्य मला नाथा।
विजय वैखरी पावन, गाउनी तव गाथा।।७।। ॐ जय सद्‌गुरु नाथा।।

।।अवधूत चिन्तन श्रीगुरुदेवदत्त।।

।। श्री प.प.श्रीमद्वासुदेवानन्दसरस्वती टेंबेस्वामीमहाराज कृत।।

## ।।अथ घोरकष्टोद्धरणस्तोत्रम्।।

श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव। श्री दत्तास्मान्पाहि देवाधिदेव।।
भावग्राह्य क्लेशहारिन्सुकीर्ते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते।।१।।
त्वं नो माता त्वं पिताऽऽप्तोधिपस्त्वम्। त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वम्।।
त्वं सर्वस्वं नो प्रभो विश्वमूर्ते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते।।२।।
पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं। भीतिं क्लेशं त्वं हराऽऽशु त्वदन्यम्।।
त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते।।३।।
नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता। त्वत्तो देव त्वं शरण्योऽकहर्ता।।
कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते।।४।।
धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं। सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम्।।
भावासक्तिं चाखिलानंदमूर्ते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते।।५।।
श्लोकपंचकमेतद्यो लोकमंगल वर्धनम्। प्रपठेन्नियतोभक्त्या स श्री दत्तप्रियो भवेत्।।६।।

।। इति श्रीमद् वासुदेवानन्द सरस्वती कृत घोरकष्टोद्धरणस्तोत्रं संपूर्णम्।।







## श्रीसमर्थ सद्गुरु नानामहाराजांचें प्रार्थनाष्टक

वंदू गुरूंच्या चरणारविन्दा। अगाध ज्याचा महिमा प्रबुद्धा।
न जाणते मी अजाण बाळ। मातेपरी तूं मजलागीं पाळ।।१।।
संसाररूपी भवसागरांत। तारावया एक गुरु समर्थ।
ज्याचा स्वयें सद्गुरु कर्णधार। त्याच्या आधारें भव होई पार।।२।।
हा मानवी जन्म असे वरिष्ठ। परी सद्गुरू पाहिजे तेथ श्रेष्ठ।
गुरू वीण नाहीं गती ज्ञान जीवा। गुरूवीण तो शीण हा होत जीवा।।३।।
तुझा मनीं एकचि ध्यास राहो। नेत्रीं तुझें रूप भरोनि राहो।
लीला तुझी वाणी रसाळ गावो। तूं तुष्टसी कर्म तुलाचि पावो।।४।।
आनंदरूपीं निमग्न देही। शिष्य प्रबोधिनी समर्थ पाही।
ज्ञानामृताची अधिकारवाणी। जेथें निवाले जड मूढ ज्ञानी।।५।।
नाना असे नांव जयांस देहीं। नानारूपें भक्त जयांत पाही।
नानापरी ओळख अंतरींची। नानाखुणा ग्रंथिं पहा प्रचीती।।६।।
असा गुरूचा महिमा अपार। चरित्र लीला विस्तार फार।
त्याच्या कृपेचें फळ अल्प सार। ज्यांचें तया अर्पण हे विचार।।७।।
तराणें जयाची असे जन्मभूमि। श्री दत्त उपासना नित्य नेमीं।
गुरू वासुदेवें कृपा पूर्ण केली। नमस्कार नानांस माझा त्रिकाळीं।।८।।

(सौ.सुशीला देव. रतलाम)

श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः

इति

# श्री मार्तण्ड महिमा

संपूर्णम्